
माणूस

शनिवार
२४ डिसेंबर १९७७
पंचाहत्तर पैसे



साठ वर्षांच्या
निष्ठावान शिक्षणकार्यातून
या महाविद्यालयाने
काय मिळवलं ?
काय घडवलं ?

प्राचार्यांच्या शब्दात
सांगायचं तर
"आपल्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण
केलेली अंतःप्रेरणा ही मोठी
मिळकत आहे.
काळ बदलला,
विद्यार्थी बदलले,
पण ही प्रेरणा......."

# साठ

पुण्याचे
सर परशुरामभाऊ
महाविद्यालय

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक तीस

२४ डिसेंबर १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


## ग. दि. मा.

ग. दि माडगूळकर यांच्याबरोबर साहित्य आणि चित्रपटप्रातातले एक संस्थान अतर्धान पावले आहे. एखाद्या संस्थानिकाला साजेसाच या क्षेत्रातला त्यांचा डौल आणि दिमाख होता. लहरी आणि स्वच्छंद; प्रशस्त आणि रगतदार. मराठी साहित्यातील दोन अव्वल परंपराचा वारसा त्याच्या प्रतिभेत एकरसून आलेला होता. सतवाङ्मय आणि शाहिरी काव्य या त्या दोन परंपरा होत. त्याच्या काव्यवृत्तीचे पोषण या परपरावर झालेले होते. त्याची शैली त्यामुळे सोपी, प्रासादिक आणि सर्वांना सहज आकर्षित करणारी ठरली. समाजाच्या सर्व थरात माडगूळकराचे गीत–काव्य आज पोचलेले आहे. उभ्या महाराष्ट्रात एक घर असे शोधून सापडणार नाही, की जे माडगूळकराच्या निधनवार्तेने हळहळले नसेल, जेथे ग. दि. मा. यांच्या एखाद्या गीताचा, एखादा सूर कधीकाळी दरवळून गेलेला नसेल ! साहित्यक्षेत्रात जसे फडके–खाडेकर–माडखोलकर याचे एक युग होते तसेच मराठी चित्रपटक्षेत्रातही माडगूळकर–राजा परांजपे – सुधीर फडके याचे एक युग होऊन गेले ही त्रिमूर्ती या चित्रपटक्षेत्रात झळकत होती तो कालखड मराठी चित्रपटाचा सुवर्ण कालखंडच होता. ही त्रिमूर्ती अलग झाली आणि मराठी चित्रपटसृष्टीलाही उतरती कळा लागली. फडकेखाडेकराच्या साहित्यातली अल्लड प्रेमभावना माडगूळकराच्या चित्रकथामुळे व गीतरचनेमुळे रजतपटावर समूर्त झाली आणि तिने तमाम रसिक महाराष्ट्राला मोहित केले. बालगंधर्वांमुळे मराठी माणसाच्या कानामनावर ख्यालगायकीचे सस्कार उमटले असे म्हटले जाते. माडगूळकराच्या चित्रकथानी आणि हलक्याफुलक्या गर्भरेशमी गीतांनी तोच चमत्कार मराठी साहित्याच्या क्षेत्रात चित्रपटाच्या द्वारा करून दाखविला. चद्राला कलेकलेने वाढावे लागते, उगवावेमावळावे लागते; पण माडगूळकराच्या गीतांचे चादणे मात्र दशक–दोन दशकाहून अधिक काळ अखंड बरसत होते उन्हात हसणारे गोड चादणे ! त्या तिथे, पलिकडे पण फार दूर–अप्राप्य नाही अशा प्रियेसाठी अधीर व्हायला लावणारे हे मधुर चांदणे ! त्रिमूर्ती अलग झाली आणि मराठी चित्रपटाचे हे चांदण्याचे दिवसही सपले. महाराष्ट्राच्या समाजजीवनात नवीन उलथापालथ झाली, हेही एक कारण असावे. काचेला तडा जावा तसा या चित्रपटामुळे सुखावलेल्या मराठी मध्यमवर्गीय कुटुंबजीवनालाही तडा गेला. चंद्र उंच उंच इमारतीआड, गिरण्याच्या धुराड्याआड दिसेनासा झाला' आणि जीवनकलहाच्या वाढत्या धगीमुळे प्रीतीची नाजुक वेल करपून गेली. गल्लाभरू हिंदी चित्रपटाचे आक्रमणही वाढले आणि मराठी चित्रपटाचा हा चदेरी स्वप्नकाल इतिहासजमा झाला; पण माडगूळकर इतिहासजमा झाले नाहीत. कारण त्याची गीतप्रतिभा ही जमिनीतून वर आलेली, पाळंमुळं खोलवर रुजलेली अशी होती. चित्रपटक्षेत्र अतरले तरी या गीतप्रतिभेने त्यांना तारून नेले आणि शेवटी गीतरामायणाने तर त्याना इतके उच नेले की, चित्रपटक्षेत्रातले, कथाकाव्यप्रातातले त्याचे अगोदरचे भव्य यश लहानसेच वाटावे. राजकीय–सामाजिक क्षेत्रात जशी एखादी महत्त्वाची घटना घडावी, तिचे परिणाम फार काळपर्यंत, दूरवर जाणवत राहावेत, तशी गीतरामायणाची निर्मिती ही सास्कृतिक–साहित्यक्षेत्रातली एक महत्त्वपूर्ण घटना ठरली. रामकथा तोवर पुराणिकानी पुरेशी निर्जीव व निःसत्त्व करून ठेवलेली होती. रामनवमीलाच जेमतेम तिची आठवण यावी इतकी; पण माडगूळकराचे कुश–लव रामायण गाऊ लागले आणि अष्टसात्त्विक भावना जणू फारफार वर्षांनी शब्द सापडून रामकथा समूर्त, सजीव होऊन घर अन् घर उजळू लागली. माडगूळकराच्या चित्रकथाचा, प्रेमगीताचा आस्वाद फक्त तरुण मनाने घेतला होता; पण गीतरामायणाने आबालवृद्धाना वेड लागले. माडगूळकरांना वाल्मिकीच्या पदावर लोकांनी नेऊन बसवावे हा त्याचा केवढाथोर सन्मान होता ! कुठल्याही पद्मश्री, पद्मभूषण वगैरे सन्मानापेक्षा लाख पटीनीमोठा. 'जोगिया'मुळे अगोदरच ते मोठे झालेले होते; पण या मोठेपणात तात्कालिक लोकप्रियतेचा भाग अधिक होता. गीतरामायणाने मात्र त्यांना महाराष्ट्राच्या सास्कृतिक जीवनात अढळपद प्राप्त करून दिलेले आहे. अशी जनसमूहाच्या सास्कृतिक जीवनावर पगडा बसवणारी निर्मिती क्वचितच होत असते व प्रतिभावंतानाही तिच्यासाठी व्रतस्थ व्हावे लागते. माडगूळकराच्या कवितेतील गायिकेचा जोगियाही एखाद्याच वेळी रगतो. कारण त्या दिवशी ती व्रतस्थ राहते असे कवीने म्हटलेले आहे–

ही तिथी पाळते व्रतस्थ राहुनी अंगे ।
वर्षात एकदा असा जोगिया रगे ॥

कशावरून माडगूळकराचा असा एखादा जोगिया पुन्हा रंगला नसता ?

मैफल अर्धवट टाकूनच त्याना जावे लागलेले आहे.

म्हणून हळहळ जास्त वाटते. —सं.

# साठीचा उंबरठा ओलांडताना स. प. महाविद्यालय

## काही विचार – काही आठवणी

सर परशुरामभाऊ कॉलेजला साठ वर्षं पूर्ण झाल्याबद्दल त्या कॉलेजचा हीरक–महोत्सव मगळवार, दि. २७ डिसेबर १९७७ रोजी भारताचे पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे

गेल्या साठ वर्षांच्या काळात या कॉलेजने अनेक स्थित्यतरं पाहिली, कॉलेजच्याही रूप-स्वरूपात, जडण-घडणीत अनेक स्थित्यतरं होत गेली. हा साराच इतिहास मोठा रंजक आहे; परंतु यावरोबरच एस्. पी. कॉलेजचं एक मूळ वैशिष्ट्य म्हणजे, या कॉलेजला लाभलेली जागेची देणगी. मध्यवस्तीत असूनही कॉलेजने सुमारे पंचवीस एकर जमीन व्यापली आहे. अर्थात कॉलेजला जुन्या काळातही एकदम एवढी जमीन कशी मिळाली, याविषयी प्रसिद्ध क्रिकेट–समीक्षक श्री. बाळ ज. पडित यानी सांगितलेला इतिहासही कॉलेजच्या यशस्वी वाटचालीच्या इतिहासाइतकाच महत्त्वपूर्ण आहे, नोद घेण्यासारखा आहे.

श्री. बाळ पंडित याचे आजोबा श्री. बाबामहाराज हे जेव्हा अत्यत आजारी पडले तेव्हा त्यांनी त्याचे जवळचे स्नेही श्री. लोकमान्य टिळक यांना आपल्याला वारस मिळवून द्यायला सागितले. लोकमान्यानी त्याना वारस मिळवून दिला. त्याच नाव ठेवलं गेल जगन्नाथमहाराज; परंतु हे वारसप्रकरण वादग्रस्त झाल. स्वत: लोकमान्यांनी बाबामहाराजाची बाजू खटल्यात चालविली. प्रकरण लडनच्या प्रिमी कौन्सिलपर्यंत गेलं. या सगळ्यामध्ये लोकमान्याना अमाप पैसा खर्च करावा लागला. त्याना शारीरिक आणि मानसिक क्लेशही सहन करावे लागले. या वेळी जगन्नाथमहाराज बावीस वर्षांचे तरुण होते. 'लोकमान्यांनी आपल्यासाठी घेतलेले कष्ट त्यांना जाणवत होते. म्हणून एकदा ते लोकमान्यांना म्हणाले,

'या सर्व प्रकरणात माझ्यासाठी जो खर्च केलात तो तुम्ही माझ्याकडून घेतला पाहिजे!' यावर लोकमान्य टिळक म्हणाले, 'मी तुला माझा तिसरा मुलगा मानलं आहे. तेव्हा तुझ्याकडून मी कोणताही खर्च घेणार नाही!'

हा संवाद दोनदा झाला. तिसऱ्यादा जेव्हा जगन्नाथमहाराजांनी हा विषय काढला तेव्हा लोकमान्य उसळून म्हणाले,

'देणारच असशील तर तुझी जमीन न्यू पूना कॉलेजला दे!' आणि जगन्नाथमहाराजांनी क्षणाचाही विलब न लावता म्हटलं, 'दिली!'

आत्ताच्या एस्. पी. कॉलेजचं त्या वेळचं नाव न्यू पूना कॉलेज असं होतं आणि त्याचे वर्ग सध्याच्या नूतन मराठी विद्यालयाच्या पहिल्या भागात (पुलाअलीकडचा भाग) चालत असत. जगन्नाथमहाराजांनी लोकमान्याच्या शब्दाखातर जी पचवीस एकर जागा दिली त्याच जागेत आज एस्. पी. कॉलेजची भव्य वास्तू उभी आहे.

अर्थात हा माणूस वडिलोपार्जित असलेली जमीन अशा तऱ्हेने शब्दाच्या एका फटकाऱ्यात देऊन टाकतोय म्हटल्यावर जगन्नाथमहाराजांच्या नातेवाइकानी आणि इतर स्नेहीमंडळीनी भलताच गहजब केला; जगन्नाथ महाराजांना या निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. याची कारणं दोन होती. एक तर, नाही म्हटल तरी एवढी मोठी जागा इतक्या सहजतेने आणि निःस्वार्थीपणाने देऊन टाकणं हे त्या सामान्य माणसांना पटण्यासारख नव्हत आणि दुसरं म्हणजे त्या वेळी जगन्नाथमहाराजांच्याही डोक्यावर अडीच-तीन लाखांचं कर्ज होत. त्यामुळे साहजिकच आप्तेष्टांचा दृष्टिकोन असा की, ही जागा अशा तऱ्हेनं दान करून टाकण्यापेक्षा कर्ज फेडण्याच्या दृष्टीनं तिचा उपयोग करावा; परतु जगन्नाथमहाराज आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत. वडिलासमान मानलेल्या लोकमान्यांना दिलेल्या शब्दाची किमत त्यांना सर्वांत जास्त वाटत होती. ३१ मे १९१८ साली जगन्नाथमहाराज आणि शिक्षणप्रसारक मंडळीचे सेक्रेटरी श्री आपटे याच्यामध्ये करार झाला. या करारानुसार ही पचवीस एकराची जागा न्यू पूना कॉलेजला ९९ वर्षं आणि सालिना दीड हजार रु. खंड अशा बोलीवर मिळाली!

जगन्नाथमहाराजाना नातेवाईकानी अर्थातच दूषणं दिली; पण त्यांना स्वत:ला या कृत्याचा पश्चात्ताप तर कधी वाटला नाहीच, उलट समाधानच वाटलं. कारण यामुळे ते लोकमान्यांच्या ऋणातून अंशत: उतराई झाले आणि दुसरं म्हणजे, शिक्षण प्रसाराच्या कामी जमीन कारणी लागल्याचा आनंद महाराजाना झाला. अर्थात् हे सगळं करीत असताना महाराजानी नावाची किंवा प्रसि-

द्धीची अपेक्षा कधीच ठेवली नाही. त्यामुळेच त्यांचं व्यक्तिमत्त्व म्हणजे त्यागाच एक आदर्श प्रतीक बनून राहिलं.

एस्. पी. कॉलेजच्या हीरक महोत्सवानिमित जगन्नाथमहाराजांचा एक अर्ध पुतळा कॉलेजच्या दर्शनी भागात बसविण्यात येत आहे. महाराजाचे चिरंजीव श्री. बाळ पडित यानीच हा पुतळा कॉलेजला दिला आहे. हा पुतळा देण्यामागचा उद्देश असा की, एकाच वेळी दोन स्वार्थत्यागी व्यक्तिमत्त्वाच दर्शन विद्यार्थ्यांना घडावं. एक म्हणजे लोकमान्य टिळक. त्यांचा पुतळाही कॉलेजच्या दर्शनी भागातच आहे. बाबामहाराजांना दिलेला शब्द लोकमान्यानी असामान्य स्वार्थत्याग करून पुरा केला आणि त्याच्या या कृत्याला समातर असा त्याग जगन्नाथमहाराजांनी लोकमान्यांना दिलेल्या शब्दाला जागून आणि कॉलेजसाठी एवढी मोठी जागा देऊन केला. अशा तऱ्हेने कॉलेजच्या दर्शनी भागातील हे दोन अर्ध पुतळे इथून पुढल्या विद्यार्थ्यांना त्यागाची, की जो भारतीय परंपरेचा सर्वांत मोठा विशेष आहे, सतत आठवण करून देत राहतील.

अशा या ऐतिहासिक जागेमध्ये झालेली स. प. महाविद्यालयाची स्थापना ही महाराष्ट्राच्या तत्कालीन सास्कृतिक व शैक्षणिक जीवनातली एक विशेष महत्त्वाची घटना होती. ती काही केवळ एका शिक्षणसस्थेची सुरुवात नव्हती. ती एका ठोस चळवळीची, एका सुविहित विचाराची मुहूर्तमेढ होती. आणि म्हणून या सस्थेच्या सहा दशकाच्या अस्तित्वामागच्या अंत प्रेरणाचा थोडक्यात विचार करणे आवश्यक आहे.

चार दृश्य–अदृश्य शक्ती स. प. महाविद्यालयाच्या स्थापनेमागे कार्यरत होत्या. याआधी ज्याच्या दातृत्वाचा उल्लेख आला आहे ते कै. जगन्नाथमहाराज पडित ही यातली एक शक्ती. आणि त्यांनी देऊ केलेल्या जमिनीवर महाविद्यालयाची इमारत बांधण्यासाठी ज्यानी दोन लाख रुपये देणगी दिली ते जमखंडीचं राजघराणं ही दुसरी शक्ती. (विशेष म्हणजे या दोन्ही शक्तींचं नात महाविद्यालय अजूनही टिकवून आहे. कै. जगन्नाथमहाराज पडितांचा अर्धपुतळा महाविद्यालयाच्या आवारात उभारला जात आहे तर महाविद्यालयाच्या विद्यार्थि–सभागृहाला जमखंडीचे कै. सर शंकरराव पटवर्धन याचे नाव दिले जाणार आहे. यानिमित्त रु.५०,००० ची देणगी श्रीमती लीलावतीदेवी पटवर्धन यांनी दिली आहे. हे दोनही समारंभ दि. २६ डिसेंबर रोजी ना. मोहन धारिया यांच्या हस्ते होणार आहेत.) महाविद्यालयाच्या व शिक्षण प्रसारक मंडळीच्या कार्याची स्फूर्ती ज्याच्यापासून घेतली ते कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व मार्गदर्शन ज्यांच्याकडून मागितले ते लोकमान्य टिळक ही महाविद्यालयामागची तिसरी शक्ती, आणि चौथी व अतिशय महत्त्वाची म्हणजे अर्थातच महाविद्यालयाची संकल्पना व पायाभरणी करणारे नू. म. वि. प्रशालेतील शिक्षक–कार्यकर्ते–ज्यात कै. प्रा. धारपुरे यांचं नाव प्रमुख आहे. १९१६ मध्ये २२५ विद्यार्थ्यांसह सुरू झालेलं महाविद्यालय वीस वर्षांतच हजारांची संख्या ओलाडून सुप्रतिष्ठित झालं, याचं श्रेय या चार शक्ती आणि महाविद्यालयाचे प्रथमपासूनचे सवर्धक-प्राध्यपक यानाच आहे. विद्यार्थिसख्या झपाट्याने वाढली तसा वास्तु-विस्तारही होत गेला, करावा लागला. महाविद्यालय सुरू झाल्यानतर दहा वर्षांत शास्त्रशाखा सुरू झाली आणि साठ वर्षांनी, म्हणजे अपेक्षेपेक्षा बऱ्याच उशिरा, वाणिज्यशाखाही उघडली गेली. तीन विद्याशाखात सुमारे तीस विषयाचे शिक्षण कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील मिळून ३३०० विद्यार्थ्यांना देणाऱ्या या संस्थेचा आजचा व्याप सर्वांच्या नजरेसमोर आहेच.

अर्थात साठ वर्षांच्या वाटचालीतल्या या यशावर आत्मसतुष्ट होऊन निष्क्रिय बनण्याची प्रवृत्ती कुणाचीच नाही. उलट स्वायत्त महाविद्यालयाच्या ( autonomous college ) दर्जा मिळविण्याच्या दृष्टीनं प्रगती करण्याचं महत्त्वाकांक्षी ध्येय स. प. महाविद्यालयानं अंगिकारलेल आहे. याची पूर्वतयारी म्हणून जे आहे त्यात सुधारणा करणं व जे नाही त्याची उभारणी करणं या दृष्टीनं उपयुक्त अशा योजना आखल्या जात आहेत, कार्यान्वित होत आहेत. विद्यापीठ अनुदान मडळाकडून 'कोसिप' (शास्त्रशाखा सुधारणा प्रकल्प) व 'कोहसिप' (मानव्यविद्याशाखा सुधारणा प्रकल्प) या दोन योजनांखाली निवडण्यात आलेल्या देशभरच्या चाळीस महाविद्यालयात स. प. महाविद्यालयाचा समावेश आहे आणि या दोन योजनान्वये गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत महाविद्यालयाला सुमारे साडेचार लाखाच विशेष अनुदान मिळाले आणि आणखी दोन लाखाचं अनुदान 'फॉलो–अप' कार्यक्रमासाठी पुढील दोन वर्षांत अपेक्षित आहे. संस्थाविस्ताराच्या अनेक सकल्पित योजनाही तयार स्वरूपात मजुरीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत. पदव्युत्तर शिक्षणकेंद्र ही यातली एक महत्त्वाची योजना, साडेचार लाख रुपये खर्चाची. महाविद्यालयात सध्या पाच विषय पदव्युत्तर स्तरावर शिकविले जातात. त्यांच्या अध्यापनाची वेगळी व उत्तम सोय व्हावी यासाठी हे केंद्र नव्यानं बांधण्याची कल्पना आहे. एवढ्याच खर्चाची आणि महत्त्वाची दुसरी योजना स्वाध्यायवर्ग केंद्राची आहे. पचवीस विद्यार्थी व एक शिक्षक बसू शकतील अशा पंचवीस लहान वर्गखोल्या बांधून नव्या अभ्यासक्रमातील स्वाध्याय पद्धतीला ( tutorial system ) प्रोत्साहन देण्याची इच्छा त्यामागे आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या 'Quality Institutions' नावाच्या योजनेला प्रतिसाद देऊन काही विषयांसाठी खास गुणवत्तेचे प्रपाठक (readers) नेमण्याची इच्छा महाविद्यालयाने प्रदर्शित केली आहे. हे प्रपाठक त्या त्या विषयातील अध्ययन–अध्यापन–सशोधनाला विशेष उत्तेजन देऊ शकतील. याखेरीज महाविद्यालयातील सध्याचा पोहण्याचा तलाव अद्ययावत करणे, वसतिगृहात सुधारणा करणे, अतिथिगृह व उपहारगृह उभारणे आणि ग्रथालय-विस्तार यांचा समावेश सकल्पित योजनामध्ये होतो. यापैकी ग्रथालय विस्ताराची योजना विद्यापीठ अनुदान मडळाकडून मंजूर होऊन आली असून थोड्याच अवधीत प्रत्यक्ष बाधकाम सुरू होईल, तर त्या पाठोपाठ पदव्युत्तर केंद्र व स्वाध्याय केंद्राच्या इमारतीची योजना निकडीने हाती घेण्यात येईल. इतर योजना मात्र निधी उपलब्ध होण्याच्या प्रमाणात यथावकाश हाती घेणे शक्य होईल. या व अशा विकास-प्रकल्पाच्या खर्चाचा काही भाग स्वावलंबनाने उचलता येण शक्य व्हावं, या इच्छेनं सुमारे सव्वापाच लाख रुपयांचा हीरक-महोत्सवनिधी जमा करण्यात महाविद्यालयाचे अधिकारी–कार्यकर्ते यशस्वी

झाले आहेत. हे विकास-प्रकल्प सफल होत जातील तसतसे स्वायत्त महाविद्यालयाचे ध्येय जवळ येत जाणार आहे. स्वतःचे अभ्यासक्रम आखणे आणि अंतिम परीक्षाही स्वतःच्या घेणे, अशा प्रकारची ही स्वायत्ततेची कल्पना जोखमीची असली तरी पुणे विद्यापीठाची चाकोरी थोडी-फार सोडून व काही प्रमाणात संलग्नता कायम राखून ही जबाबदारी उचलण्याची मनीषा महाविद्यालयाने उराशी बाळगली आहे.

हीरकमहोत्सव पूर्ण करणाऱ्या स. प. महाविद्यालयाच्या भूतकालीन व भावी यशाचा आलेख मांडताना त्यामागच्या काही मूलभूत विचाराचा प्रपंच अप्रस्तुत ठरणार नाही. हे महाविद्यालय का स्थापन करण्यात आलं? आणि साठ वर्षं कार्य केल्यानंतर त्यानं काय साधलं? समाजाला त्यापासून काय मिळालं? असे अनेक प्रश्न विचारता येतील. महाविद्यालयाच्या स्थापनेमागे तीन / चार प्रमुख उद्दिष्टं होती. एक: 'मराठी' शिक्षणाचा प्रसार. दोन: राष्ट्रीय शिक्षण देणं आणि तीन: स्वस्त व लोकप्रिय शिक्षण देणं. तिसऱ्या ध्येयाविषयी गैरसमज होण्याची शक्यता, तेव्हा अगोदर खुलासा करायला हवा. महाविद्यालयाच्या स्थापनाविषयक कागदपत्रात वापरलेले मूळ शब्द Cheap & popular education असे आहेत. यातल्या दोन्ही विशेषणांना आता विकृत अर्थ प्राप्त झालेला आहे; पण तत्कालीन संदर्भात ही दोन्ही विशेषणं स्तुत्यच ठरावीत. अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोचवायचं तर ते खर्चिक असून चाललं नसतं कारण शिष्यवृत्त्या वा सरकारी सवलती फारशा उपलब्ध नसत. 'लोकप्रिय शिक्षण' याचा अर्थ लोकांचं–लोकांसाठी असलेलं शिक्षण असा घ्यायचा आहे. अर्थात यातलं स्वस्ताईचं उद्दिष्ट पुरं करणं आता महाविद्यालयाच्या हातात नाही. कारण शिक्षणाच्या अर्थकारणावर नियंत्रण आहे ते मुख्यतः विद्यापीठाचं आणि शासनाच. मराठी शिक्षणाच्या प्रसाराची आघाडी मात्र स. प. महाविद्यालयानं अखंड लढवीत ठेवली आहे. या महाविद्यालयाशी परिचित वा संबधित असलेल्यांना तर संस्थेच्या अंतर्गत व्यवहारातील-कारभारातील मराठीचे प्रभुत्व माहीत असणारच; पण विविध विषयांचे व विद्याशाखातले शिक्षण पदवीपूर्व व पदव्युत्तर स्तरावर मराठी माध्यमातूनही दिलं जावं, याचा आग्रह पुणे विद्यापीठाकडे धरणाऱ्यात स. प. महाविद्यालय अग्रेसर होतं. एवढंच नव्हे तर 'मराठीचे विद्यापीठ' निर्माण व्हावे या दृष्टीनेच पुणे विद्यापीठाच्या स्थापनेसाठी सर्वस्वानं झटणाऱ्यात स. प. महाविद्यालयाचा वाटा फार मोठा होता, हे अनेकांना माहीत नसेल.

महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात सहा दशकं काम केल्यानंतर स. प. महाविद्यालयाने काय कमावलं आणि काय घडवलं याच्या शोधातच प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांची भेट घेतली. 'महाविद्यालयानं आपल्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेली अंत प्रेरणा ही मोठी मिळकत आहे. विद्यार्थी बदलतात, पण हा सद्भाव, ही अंतःप्रेरणा सतत निर्माण होत राहिली आहे. यामुळेच स. प. महाविद्यालयाचे आजी–माजी विद्यार्थी वेगळे उठून दिसतात आणि महाविद्यालयालाही एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व प्राप्त झालं आहे. स. प. चं व्यावहारिक यश, परीक्षाचे निकाल उत्कृष्ट आहेतच; पण तेच आम्ही सर्वस्व मानीत नाही. ग्रांथिक चाकोरीतून बाहेर पडून सुजाण व जबाबदार नागरिक निर्माण करण्याचं ध्येय महाविद्यालयान सतत समोर ठेवलेलं आहे.' असं प्राचार्यांनी सांगितलं. हे महाविद्यालय समाजजीवनापासून कधीच अलिप्त राहिलेलं नाही, हे त्यांनी सांगितलेलं दुसरं वैशिष्ट्य. १९२० व १९४२ च्या असहकार–चले जाव चळवळीपासून आणीबाणीतील सत्याग्रहापर्यंतच्या अनेक राजकीय–सामाजिक आंदोलनात या महाविद्यालयाचे आजी–माजी विद्यार्थी व व सेवक आघाडीवर राहिलेले आहेत. अनेक कर्तृत्ववान सामाजिक व राजकीय कार्यकर्ते महाविद्यालयाने देशाला दिलेले आहेत. विद्यार्थि–जीवनातच राष्ट्रीय विचारधारा बाणविण्याची आणि समाजजीवनाशी सुसंवाद साधण्याची परंपरा या संस्थेत जुनीच आहे. कालमानानुसार जरूर तो बदल विद्यार्थ्यांच्या बाह्यरूपात व वागण्यात झाला तरी ही वैशिष्टये कायम राहिली आहेत. या दृष्टीने 'राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार' करण्याचं संस्थापकांचं उद्दिष्ट महाविद्यालयाने नजरेआड केलेलं नाही, असं निश्चितपणे म्हणता येईल. याचबरोबर आवश्यक ते बदल संस्थेत निश्चितपणें घडत आहेत. कॉलेजचा एकेकाळचा तथाकथित मध्यमवर्गीय पेहराव आता अजिबात बदलला आहे. 'ब्राह्मणी, सदाशिवपेठी कॉलेज' ही महाविद्यालयाची जुनी प्रतिमा मुळातच चुकीची होती आणि आता तर तसा संशय घेण्याचीही परिस्थिती शिल्लक राहिलेली नाही,' असं प्राचार्य मंगळवेढेकर यांनी निक्षून सांगितलं. समाजाच्या सर्व थरांतले विद्यार्थी आता महाविद्यालयात आहेत आणि शिक्षक–विद्यार्थी संबंध पूर्वीपेक्षाही अधिक जिव्हाळ्याचे आहेत. स. प. महाविद्यालयाशी तीस वर्षांहूनही अधिक काळ संबधित असलेल्या प्राचार्य मंगळवेढेकर यांनी विद्यार्थी–शिक्षक–उपप्राचार्य–प्राचार्य अशी चतुर्विध भूमिका आजपर्यंत पार पाडली आहे 'सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांशी आलेले व टिकलेले आत्मीयतेचे संबंध आणि त्यांना कांही चागलं देताना, शिकविताना झालेला आनंद या माझ्या आयुष्यातल्या दोन अविस्मरणीय आठवणी आहेत,' असे महाविद्यालयाबरोबरच स्वतःही साठीच्या उंबरठ्यावर आलेल्या प्राचार्यांनी अभिमानानं सांगितलं.

तर साठीच्या घरातल्या स. प. च्या हीरकमहोत्सवाचा समारंभ पुढल्या आठवड्यात साजरा होणार आहे. सहा दशकाच्या निष्ठावान शिक्षणकार्यानंतर संस्थेच्या भवितव्याबद्दल काय म्हणता येईल? प्राचार्य मंगळवेढेकर यांच्याच शब्दात स्पष्ट सांगायचं तर 'दिवस कठीण आहेत.' शैक्षणिकदृष्ट्या येणारा काळ कठीण वाटतो. कारण स. प. किंवा अन्य कोणत्याही शिक्षणसंस्थेची आर्थिक परिस्थिती जसजशी बिघडत जाईल तसतसा सरकारी हस्तक्षेपाचा धोका वाढत जाईल. म्हणून स्वतंत्र आणि प्रसन्न वातावरणात शिक्षणकार्य करायचं असेल तर शिक्षणसंस्थांनी स्वतःची गंगाजळी उभारून स्वयंपूर्ण व्हायचा प्रयत्न करायला हवा. शिक्षणसंस्था व्यापारी धोरणानं चालवल्या जाता कामा नयेत. शिक्षणाचा कस, गुणवत्ता टिकवून धरायची तर शिक्षणसंस्थांचं नियंत्रण सर्वस्वी शिक्षकांकडेच

पृष्ठ ३० वर

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ तेच कलाकार.... तेच नाटक... प्रेक्षक उदासीन

काय गंमत आहे पहा आज ! ज्यांच्या हाती शेष काँग्रेस पक्षाची सूत्रे आहेत, ते रेड्डी–चव्हाण तोंडाने सांगत आहेत, आम्हाला फूट नको. अनेक प्रश्नांवर इंदिराजी त्यांच्या विरोधात उभ्या आहेत; पण त्याही तोंडाने म्हणत आहेत, मी कायम एकीचाच पुरस्कार केला आहे. राजकीय रंगमंचावर रंगणाऱ्या या नाटकामधील मुरब्बी कलाकारांना नाटकाच्या तिसऱ्या अंकाची अखेर माहीत नाही असे थोडेच आहे ? पण हे सगळे खिलाडी प्रवासाचा वेग आणि दिशा नेमकी माहीत असूनही नाटकातले नाटक रंगवून उदासीन प्रेक्षकाची टवटवी कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेले आठ–पंधरा दिवस वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर चितारले गेलेले दोलायमान आलेख लक्षात घेतले तरी विनाशाकडे निघालेल्या या पक्षाची चाल सर्वसाधारण माणसाच्याही लक्षात येते. तोंडाने, नाही...छे...मुळीच नाही...शक्यच नाही,...असा कितीही गजर चालला असला तरी प्रवाहाला वेगच असा जबर आहे की, चार हात उलटे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या वसंतराव नाइकांची दमछाक झाल्यावाचून राहणार नाही. वसंतदादा शहाणे. ते लवकर प्रवाहाबाहेर निघाले. इतकेच नाही तर पुढील वळणावर निर्माण होणारे संभाव्य चित्रही त्यांनी उभे केले. नाईक आणि मीर कासीम नाका-तोंडात पाणी जाईपर्यंत वाट पाहणार असले तरी गोष्टी आता अशा थराला येऊन पोचल्या आहेत की, कदाचित हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत काँग्रेसमधील फाटाफुटीची प्रक्रिया पूर्ण झाली असेल !

गेल्या आठ–पंधरा दिवसांमध्ये या विषयावर जे लिखाण प्रसिद्ध झाले त्यावरून नजर फिरवली तर वृत्तपत्रांनी या फाटाफुटीला हातभार लावण्यासही कमी केले नाही. आवेदनपत्राची चाल मागे घेण्यात आली तेव्हाच महाराष्ट्र टाइम्सने ही सगळी तात्पुरती मलमपट्टी असल्याचे सांगितले होते आणि अग्रलेखातून काँग्रेस शुद्धीकरण-मोहिमेचा सूर त्यांनी सतत लावून धरला. त्याच गटाच्या टाइम्स ऑफ इंडियाचे धोरण मात्र वेगळे दिसते. दि. १७ डिसेंबरच्या आपल्या अग्रलेखामध्ये त्यांनी संत यांची हकालपट्टी करण्याची काँग्रेस अध्यक्षाची सूचना खुळचटपणाची असल्याचे नमूद केले आहे. आवेदनपत्रप्रकरणी पीछेहाट झाल्याने बाई नरम आल्या आहेत. त्यांना आता दुखवू नये असे त्यांना वाटते. अमृतबझारपत्रिका, हिंदू, स्टेटस्मन यांसारखी देशाच्या विविध भागांत प्रसिद्ध होणारी वृत्तपत्रे नजरेखालून घातल्यावर एक गोष्ट जाणवते की, या 'फाटाफूट' नाटकातला आपला वाटा पेपर-वाल्यांनी पुरेपूर उचलला आहे. या सगळ्या प्रकारात सामान्य वाचकाला जे प्रश्न पडतात त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रपंच येथे करणार आहे.

काँग्रेसचे वरिष्ठ नेते बदललेल्या परि-स्थितीमध्ये आणि शहा आयोगासमोर दररोज पंचनामा चाललेला असूनही इंदिराजींना इतके का जपतात ? देवराज अरस यांचा इतका उर्मटपणा का सहन केला जातो ? या दोन्ही प्रश्नांच्या उत्तराची चावी म्हणून आगामी निवडणुकांकडे अंगुलिनिर्देश करता येईल. बाईंच्या राजकीय भवितव्यावर डांबर फासले गेले आहेच आणि शहा आयोगाच्या अंतिम अहवालातून निर्माण होणाऱ्या खटल्यातून त्या निभावणे कठीणच आहे हे त्यांच्यासह सर्वजण ओळखून आहेत. तरीही त्यांचे जे काही Following आहे त्याचा फायदा पक्षाला व्हावा असे आज पक्षाच्या सत्तास्थानी असलेल्या जोडगोळीला वाटते. समजा, उत्तर प्रदेश वगैरे वरू राज्यांत ज्या वेळी निवडणुका झाल्या त्याच वेळी त्या महाराष्ट्रात आणि दक्षिणेतील दोन राज्यां-मध्ये झाल्या असत्या तर चव्हाण काय किंवा रेड्डी काय, बाईंपासून केव्हाच दूर झाले असते. येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या संदर्भातील पक्षाचे राजकारण आणि पक्षांत-र्गत फाटाफूट यांचे फार मोठे साटेलोटे आहे. शहा आयोगासमोर साक्षीला न जाण्या-बाबतचा काँग्रेसचा निर्णयही याच संदर्भामध्ये बघितला पाहिजे. व्यक्तिगत स्वार्थाचे राज-कारण सगळ्याच पक्षांमधील मातब्बर मंडळींनी वेळोवेळी केले आहे. मागील दाराने येऊन जुन्या मुंबई राज्याच्या मुख्यमंत्री-पदाची खुर्ची बळकावणारे मुरारजीभाई किंवा अशाच खुर्चीपायी पक्षाला सोडचिठ्ठी देणारे चरणसिंग यांचाही त्याला अपवाद नाही; पण आज देवराज अरस ज्या पद्धतीचे राजकारण खेळत आहेत त्या पद्धतीचे आणि इतक्या हिणकस पातळीचे सत्तापिपासू राजकारण स्वातंत्र्योत्तर काळा-मध्ये पहावयास मिळाले नाही. अर्थात त्यांच्याही डोक्यावर ग्रोव्हर आयोगाची टांगती तलवार आहेच. ती डोक्यात कोस-ळण्यापूर्वी त्यांना पुन्हा लोकमताचा ठसा उमटवून घेऊन सत्तारूढ व्हायचे आहे. आज अरस यांना सोडूनही चालत नाही आणि त्यांना बरोबर घेऊन चालायचे तर स्वतःच्याच पायात साखळदंड बांधून घ्यायचे, असा हा विचित्र प्रकार आहे.

इंदिराजी आणि त्यांचे पाठीराखे यांची राजकीय क्षेत्रामधील पत आज काय मोलाची आहे, हे काय चव्हाण–रेड्डी यांना ठाऊक नाही ? दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या एका साप्ताहिकाने चव्हाण खाजगी बैठकीमध्ये असे म्हटल्याचे नमूद केले आहे की, 'आता पक्ष जगवायचा असला तर वेगळी वाट धरलीच पाहिजे. ज्या चुका झाल्या त्या दुरुस्त केल्या पाहिजेत आणि शुद्धीकरण झालेल्या संघटनेची नव्याने उभारणी केली

पाहिजे.' आता शुद्धीकरण झालेली संघटना याचा साधा स्वच्छ अर्थ असा की, आणीबाणीचे खापर ज्यांच्या माथी आहे अशा मंडळींना वगळून उभारलेली संघटना. स्वतः चव्हाण भले आणीबाणी-पर्वामध्ये बाईंच्या बरोबर असतील; परंतु सामूहिक जबाबदारीचा भाग सोडला तर चव्हाण आत राहूनही निर्लेप राहिले. अशा पद्धतीने शुद्धीकरण झालेला पक्ष उभा राहिला तर त्याला निश्चित भवितव्य आहे. काँग्रेसने वाडवडिलार्जित पुण्याईच्या बळावर तीस वर्षे मनमानी केली तशी जनता पक्षाने करावी असे कोणाही लोकशाहीप्रेमी माणसाला वाटणार नाही. हा शुद्धीकरण झालेला पक्ष पर्यायी पक्ष म्हणून उभा राहू शकला तर चव्हाणाना त्या पक्षामध्ये मानाचे स्थान जरूर मिळेल, ही पुढची वाटचाल डोळ्यासमोर ठेवून चव्हाण आजचे राजकारण खेळत आहेत. महाराष्ट्रातील निवडणुकीच्या संदर्भात चव्हाण तोल गेल्यासारखे बोलतात. कारण त्यांची व्यक्तिगत प्रतिष्ठा पणाला लागली आहे. नुसत्या प्रतिष्ठेची त्यांनी कधीच कदर केली नाही; परंतु इथे प्रतिष्ठेबरोबरच राजकीय भवितव्यही मतदाराच्या मुठीत बंद झाल्यासारखे आहे. या मुठीत दडलेले दान आपल्याला अनुकूल पडावे म्हणून कधी अनुनय, कधी अधिकार, कधी धोकादायक भविष्य याचे दाखले देत ते मतदाराला आपलासा करण्याच्या प्रयत्नात आहेत.

### नाइलाजाने वेगळे घर

इंदिराजींना आज वेगळे घर करण्याची हौस नाही; पण जुन्या घरात त्यांना पहिले स्थान तर सोडाच, पण सर्वसाधारणपणे ज्येष्ठ नेत्याला जे मानाचे स्थान असते, तेही उरलेले नाही. आपले घर सुटले की आपण उघड्यावर पडलो, हे त्या ओळखून आहेत. त्यामुळे ताण निर्माण करायचा; पण तुटेपर्यंत कोणत्याच बाबतीत लावून धरायचे नाही, हे त्यांचे सर्वसाधारण धोरण होते. शहा आयोगावर बहिष्कार टाकण्यात त्यांनी यश मिळविले ही पण एक अचीव्हमेंट मानावी लागेल. त्यांना फायदा झालाच तर रेड्डी–चव्हाणामुळेच होईल त्यांच्यामुळे इतरांचे काही भलेबुरे होण्याचे दिवस आता सरले आहेत; आता गोष्टी त्यांच्या एकट्याच्या हातात नाहीत. टाइम्स म्हणतो की, 'देवराज अरस यांनी असा रेटा लावून धरला आहे की, त्यांना बाहेर पडणे भाग पडावे. कर्नाटकचे वाहतूकमंत्री दिल्लीमधील घटनांबाबत बंगलोरमध्ये भाष्य करतात, हे अजब मानावे लागेल. आजवर असे कधी झाले नव्हते. संत यांना मंत्रिमंडळातून वगळावे, असे सुचविणारी, रेड्डी यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना केलेली तार म्हणजे एक घाईगर्दीमध्ये लगावलेला तडाखाच आहे, असे वाटत नाही. भल्याभल्यांची वाट लावणारी इंदिराजीसारखी धूर्त राजकारणी, कोणी अरस सांगतो किंवा कोंडीत पकडल्यासारखी परिस्थिती निर्माण करतो म्हणून पक्षत्याग करील हे संभवत नाही. त्यांचे आजवरचे राजकारण पाहिले तर त्या प्रथम अरस यांना काँग्रेस सोडायला सांगतील. त्यांनी प्रादेशिक पक्ष काढावा म्हणून उत्तेजन देतील. राज्यपालपद सोडून आंध्रचे राजकारण खेळण्यासाठी आणण्यात आलेल्या चेन्ना रेड्डी यांना आंध्रमध्ये काम करण्याचा आदेश मिळेल– नव्हे मिळालाही आहे. बाईंचा पाठपुरावा करणारे मंत्री ज्या दिवशी बाजूला झाले त्याच दिवशी या कामाला प्रारंभ झाला. म्हणजे बाई काँग्रेसमध्ये आणि त्यांच्या अनुयायांचे प्रादेशिक पक्षाचे झेंडे बंगलोर आणि हैद्राबादमध्ये अशी ही चाल संभवते. नव्हे बाईंना नेमके असेच व्हावे असे वाटते; पण अरस केवळ स्वतःचे भवितव्य धोक्यात घालायला तयार नसल्याने बाईंना बाहेर पडावेच लागेल आणि त्या बाहेर पडल्या की प्रादेशिक पक्षाची कल्पना बाजूला पडून नवा राजकीय पक्ष किंवा १९६९ साली उभी राहिली तशी खरी इंडियन नॅशनल काँग्रेस उभी राहील. प्रादेशिक पक्षाबद्दल कोणी विचारलं तर बाई फटकारतात, मी काय प्रादेशिक पातळीवरील राजकारण करते ? असा पक्ष बाईंच्या नेतृत्वाखाली उभा राहिला तर ६९ सालानंतर जे संघटना काँग्रेसचे झाले तेच याही पक्षाचे होईल. ज्याला काही निखळ निष्ठा आहेत असा एकही नेता बाईंच्या मागे-मागे नाही. जे जमा होतील किंवा झाले आहेत ते सारे 'की जय'चा नारा लगावणारे आणि नारा तरी कोणाच्या नावाचा ? तर ज्याला जनमानसामध्ये स्थान नाही, अशा इंदिराजीच्या नावाचा. एक-दोन निवडणुकामध्ये पुन्हा सपाटून मार खाल्ला म्हणजे हे चमच्यांचे कडबोळेही कोलमडून पडेल आणि सारा दु:खद इतिहास बाईंच्या सोबतीला राहील. काँग्रेसमध्ये फूट पडली तरी इंदिराजींच्या गटाला काही भवितव्य आहे काय ? असा प्रश्न काल-परवापर्यंत त्यांच्याबरोबर असलेल्या सिद्धार्थ शंकर रे यांना विचारला असता ते म्हणाले, लोकशाहीच्या नावाखाली परिस्थिती अति चिघळली आणि लोकशाहीच्या लोभस आवरणाखाली आपले काहीही भले होऊ शकत नाही. असा विचार तळातल्या माणसाच्या डोक्यात आला तरच कदाचित पुन्हा तो या इंदिरा पक्षाकडे वळेल; पण सर्वसाधारण परिस्थितीमध्ये इंदिराजींचा पाठपुरावा करणाऱ्या फुटीर पक्षाला भवितव्य नाही. काँग्रेसची छत्री डोक्यावर आहे तोपर्यंत थोडी तरी सावली पडेल, आता ही छत्रीच मोडून फेकून दिली तर दुर्दैव म्हणायचे ! ! ◻

## ◻ विजयालक्ष्मी काही विचार

श्रीमती विजयालक्ष्मी पंडित– कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांची भगिनी, इंदिराजींची आत्या. लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत या नावाचा भरपूर उपयोग करून घेण्यात आला. आपल्या भाचीच्या पदरामध्ये तिच्या पापाचे मोल घालून बाईंनी त्या वेळच्या लोकशाहीवादी काँग्रेससाठी रान उठविले; पण जनता पक्ष सत्तेवर आल्यावर या आत्याबाईंची कोणाला फारशी आठवण झाली नाही. बदललेल्या परिस्थितीमध्ये महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या अनेक प्रश्नावर त्यांनी मतप्रदर्शन केले आहे. जरा बदल म्हणून युनोच्या आमसभेत अध्यक्षपदापासून अनेक मोठी पदे भूषविणाऱ्या या बाईंचे विचार नोंदण्यासारखे वाटवात.

**जनता पक्ष :** सत्तेवर नसताना लबीचौडी आश्वासने देणे सोपे असते, सत्ता हाती आल्यावर या आश्वासनांची अंमलबजावणी करणे अवघड असते आणि आश्वासने पूर्ण करायची म्हटली तरी त्यासाठीही पुरेसा

अवधी लागतोच. तो जनता पक्षाला दिला पाहिजे. जनता राजवटीमधील एक महत्त्वपूर्ण फरक म्हणजे, आता वातावरण मोकळे आहे आणि ही फार महत्त्वपूर्ण बाब आहे. दारिद्र्यनिवारण, भ्रष्टाचारविरोधी मोहीम यांसारख्या गोष्टींबाबत काँग्रेस आणि जनता पक्षामध्ये फारसा फरक नाही. निर्णय घेणे आणि त्याची अमलबजावणी करणे, यांना गती येणे महत्त्वाचे आहे. 'गती' हा शासकीय हालचालीबाबत परवलीचा शब्द झाला पाहिजे.

**जयप्रकाश नारायण** : आपल्या सगळ्यांनाच याच्याबद्दल नितांत आदर आहे. ते दुसऱ्या क्रांतीचे जनक आहेत. तरीही मला असे वाटते की, पतप्रधानपदाच्या निवडीमध्ये त्यांनी रस घेणे बरोबर नव्हते. त्यांनी राजकीय सल्ला देऊ नये आणि पूर्ण निवृत्ती स्वीकारावी असे मला वाटते. 'हे पहा माझे काम मी माझ्या वकुबाप्रमाणे केले आहे. त्याबद्दल जनतेला समाधान वाटते, याचा मला आनंद वाटतो. आता पुढचे काम तुमचे.' असे म्हणून त्यांनी निवृत्ती स्वीकारली असती तर मला वाटते–जास्त बरे झाले असते.

**काँग्रेसमधील फाटाफूट** : काँग्रेसमध्ये फूट पडणारच आणि त्याची जबाबदारी माजी पंतप्रधानावरच पडणार. ब्रह्मानंद रेड्डी हेही राजकारणी आहेत आणि त्यांच्या पद्धतीने ते काम करीत आहेत. निदान पक्षामध्ये तरी महत्त्वपूर्ण स्थान मिळावे यासाठी माजी पंतप्रधानांचा आटापिटा चालू आहे; परंतु चव्हाण-रेड्डी सहजी माघार घेणार नाहीत. आपली चाल त्यांनी निश्चित केली आहे. काँग्रेसची फाटाफूट ही आता फार मोठी घटना मानता येणार नाही. आणीबाणीने या पक्षाची प्रतिमा कलंकित केली आहे आणि शहा आयोगाच्या कामकाजाचे जे वृत्त रोज प्रसिद्ध होत आहे त्याचाही पक्षावर विपरित परिणाम होईल. पक्षात फूट पडणे या गोष्टीला आता महत्त्व नसून फूट पडल्यानतर पुढे काय ? याला विशेष महत्त्व आहे.

**इंदिरा गांधी** : त्याचा व्यक्तिमहात्म्य वाढविण्यावरचा विश्वास अजूनही कायम आहे. काय वाटेल ते करून सत्तेवर आलेच पाहिजे, यासाठी त्यांचा आटापिटा चालूच आहे पक्षाचे नेतृत्व नसेल तर गटाचे नेतृत्व करण्याचीही त्याची तयारी आहे आत्ताचे त्याचे राजकारण मला भावत नाही. काहीही न करता वर्ष-सहा महिने त्या स्वस्थ बसल्या असत्या तर ते त्याना जास्त फायदेशीर ठरले असते. आज इंदिरेचा खरा हितचिंतक कोणीही नाही, नाही कोणी खरा मित्र. नेहरूंनी तिला तयार केले असे म्हणणे बरोबर नाही. एक तर जवाहरलालचा तसा पिंड नव्हता आणि कोणाचा चेला म्हणून तयार होण्याची तिची वृत्ती नव्हती. जवाहरलाल आदर्शवादी सहृदय होते, तर ही म्हणजे दुर्गेचा अवतार ! कठोर प्रहार करणारी.

**दारूबंदी** : लोकानी मद्यपान कसे करावे हे आपल्या लोकाना माहितीच नाही. मद्यपान ही एक 'सोशल हॅबिट' आहे असे मला वाटते. माफक मद्यपानाचा मी पाठपुरावा करते. मोरारजीभाईंबद्दल मला अतीव आपुलकी आहे. मद्यपानबदीसाठी वेळ पडलीच तर मी माझे प्राण खर्ची घालीन, असे ते म्हणतात. म्हणोत बापडे ! पण मला स्वतःला असे वाटते की, त्याचे प्राण फार मौलिक आहेत आणि मद्यपानबदीसारख्या मामुली गोष्टींवर प्राणांची बाजी लावणे काही खरे नाही. काही लोकानी कायद्याचा बडगा घेऊन नीतिमत्तेचे रक्षण करण्याचा प्रकारच मला विचित्र वाटतो; पण दारूबंदी म्हटली की, ते आलेच आणि मोकळ्या वातावरणामध्ये हे बसत नाही, असे मला वाटते. दारुबदीबरोबर फैलावणारा आणखी एक रोग म्हणजे भ्रष्टाचार. एकाच्या अमलबजावणीसाठी हे दुसरे स्वीकारावेच लागणार. मद्यपानाचे दुष्परिणाम समजावून सांगावेत; परंतु कायद्याचा बडगा उगारू नये.

**स्वतःच्या निवृत्तीबद्दल** : राजकीय लठ्ठालठ्ठीमध्ये मला आता रस नाही. मी लंडनहून आल्यावर लोकसभेमध्ये प्रवेश केला तेव्हाचे वातावरण आणि आत्ताचे वातावरण यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. अर्थात त्या वेळीही मी मोठी क्रियाशील राजकारणी नव्हते. जवाहरलालजींनंतर शास्त्रींनी मला कधीच महत्त्व दिले नाही किंवा शासकीय दौऱ्यांसाठीही माझी कधी निवड केली नाही. इंदिरेने तर मला सहेतुकच मागे ठेवून दिले. उगाच कोपऱ्यात कुठे तरी बसण्यापेक्षा निवृत्ती बरी, म्हणून मी घोषणा करून निवृत्ती स्वीकारली. इंदिरा ही मला मुलीसारखी. तिच्याबद्दल मला दुस्वास कधीच नव्हता; पण ती मात्र माझ्याबाबतीत फाजील दक्षता घेत असे. पिढीचे अंतर असलेली मी तिच्याबरोबर–अथवा तिच्याविरुद्ध असे काय करणार ? पण तिने ही वस्तुस्थिती आणि नाते या दोन्ही गोष्टी लक्षात घेतल्या नाहीत. ◻

## ◻ निवडणुका आणि संप

महाराष्ट्रामधील सगळ्यात गरमागरम खबर म्हणजे राज्यकर्मचाऱ्याचा सप. सप सुरू झाल्यावर जशी भूमिका घ्यायची असते तशीच ती दोन्ही बाजूनी घेतली आहे. कर्मचाऱ्याचे नेते कर्णिक आपल्या मागण्यांसह घट्ट उभे आहेत. कर्मचाऱ्यांची त्यांना उत्तम साथ आहे लाक्षणिक संपानतर संपवाल्यांना वसतदादानी जे उत्तर दिले त्यावरही टीकेची झोड उठली होती. सपवाल्याची सघटना मजबूत आहे हे खरे असले आणि त्याच्या मागण्यांमध्ये तथ्य असले तरी राज्याच्या आर्थिक शक्तीचा आणि कर्मचाऱ्यावर किती पैसा खर्ची टाकायचा याचा काही मेळ असणे जरूर आहे. परिस्थिती संपापर्यंत आली की, देण्यासारखे होते ते देऊन झाले आहे, असे प्रत्येक सरकार सागते, तर अजूनही देणे कसे शक्य आहे हे सपवाले पटवून सागत असतात. जे कर्मचाऱ्याना द्यायचे ठरविले आहे त्यातील चोवीस कोटी रुपये अजून बाकी आहेत त्याची आठवणही दिली जाते. सघटित कर्मचाऱ्यानी केलेल्या या सपाला अन्य सघटित कर्मचाऱ्याचा, कामगारांचा पाठिंबा मिळणार हो तर स्पष्ट गोष्ट आहे; पण सर्वसाधारण जनतेचे पडसाद वाचकाच्या पत्रव्यवहारामध्ये उमटत असतात आणि हे दान काही संपवाल्यांना फारसे अनुकूल नाही. आवश्यक सेवा खडित झाल्याने नागरिक आधीच संत्रस्त असतात. दुधाची, पाण्याची शाश्वती नाही. रस्त्याच्या कचरापट्ट्या झालेल्या आणि हे कुणामुळे तर या सप-

पृष्ठ २९ वर

# घटनादुरुस्ती

## जनता पक्षात दोन प्रवाह

वा. दा. रानडे

आणीबाणीच्या काळात श्रीमती इंदिरा गांधींनी आपल्या हाती सर्व सत्ता केंद्रित केली व ती अबाधित राखण्यासाठी बेचाळिसावी घटना-दुरुस्ती बिल पास करून घेतले. या लोकशाहीविरोधी दुरुस्तीतील काही कलमे रद्द करण्यासाठी बेचाळिसावी घटना-दुरुस्ती बिल कायदामंत्री शांतिभूषण यांनी १६ डिसेंबरला लोकसभेत मांडले. वास्तविक बेचाळिसावी घटना-दुरुस्ती पूर्णपणे रद्द करण्याचे आश्वासन जनता पक्षाने आपल्या निवडणूक-जाहिरनाम्यात दिले होते. मग तसे बिल न मांडता केवळ काही कलमातच दुरुस्तीचे बिल का मांडले ?

जनता पक्षाच्या खासदाराचेच या बिलाने समाधान झालेले नाही. लोकसभेतील जनता-पक्षाचे उपनेते श्री. श्यामनंदन मिश्र आणि श्री. पु. ग. मावळंकर यांनी जोरदार शब्दांत या असंतोषाला वाचा फोडली. त्यांचा विरोध बिलातील तरतुदींना नव्हता, तर बिलात ज्या पद्धतीने दुरुस्ती केली जात आहे त्या पद्धतीस होता. बेचाळिसावी घटना-दुरुस्ती संपूर्णपणे रद्द करणारे बिल का मांडले नाही ? आज चार कलमे, पुढच्या अधिवेशनात चार कलमे अशी हप्त्याहप्त्याने दुरुस्ती का ? असा या दोघांचा सवाल आहे.

या प्रश्नावर जनता पक्षात दोन मतप्रवाह आहेत. एका गटाची भूमिका अशी की, संसदेच्या दोन्ही सभागृहात जनता पक्षाचे दोनतृतियांश बहुमत जोपर्यंत होत नाही तोपर्यंत घटना-दुरुस्तीची घाई करण्यात काही अर्थ नाही. कारण आपल्याला पाहिजे तसे बिल मांडले तरी काँग्रेस ते राज्यसभेत आपल्या बहुमताच्या जोरावर फेटाळून लावणार. मग ज्याचे अपयश उघड दिसत आहे ते बिल मांडून काय उपयोग ? त्यापेक्षा काँग्रेस-नेत्यांशी विचारविनिमय करून त्यांची मान्यता मिळेल तेवढीच कलमे रद्द करण्या-संबंधी बिल मांडावे असा एक विचारप्रवाह. कायदामंत्री शांतिभूषण यांनी ज्या अर्थी अशा स्वरूपाचे बिल मांडले त्या अर्थी तो मंत्रिमंडळाचाच निर्णय आहे. याउलट एस्. एन्. मिश्र–मावळंकर यांची भूमिका अशी की, काँग्रेसच्या पसंती–नापसंतीला पक्षाने एवढे महत्त्व कशासाठी द्यावयाचे ? निवडणुकीच्या वेळी दिलेले आश्वासन पुरे करण्यासाठी बेचाळिसावी घटनादुरुस्ती संपूर्णपणे रद्द करणारे बिलच मांडावयास हवे होते. बेचाळिसाव्या घटना-दुरुस्तीतील ज्या कलमाचे समर्थन काँग्रेस पक्षाला करायचे असेल ते त्याला खुशाल करू द्या. काँग्रेस पक्षाची लोकशाहीविरोधी भूमिकाच त्यामुळे जनतेपुढे उघड होईल आणि ज्या कलमांना काँग्रेसचा पाठिंबा मिळेल त्या कलमासह बिल पास होईलच. उलट हप्त्याहप्त्याने बेचाळिसावी घटनादुरुस्ती रद्द करणारी बिले सरकारने आणावयाची ठरविले तर बेचाळिसावी घटना-दुरुस्ती संपूर्णपणे रद्द करण्याची जनता पक्षाची भूमिका कायम आहे की नाही अशी शंका जनतेच्या मनात येण्याचा संभव आहे.

या दोन भूमिकांत कोणती भूमिका बरोबर ? मिश्र–मावळंकर यांनी मांडलेलीच भूमिका वास्तविक मंत्रिमंडळाने घ्यावयास हवी होती. काँग्रेस पाठिंबा देत नाही म्हणून या प्रश्नावरील आपल्या मूळ भूमिकेस जनता पक्षाने मुरड घालण्याचे किंवा त्याबाबतीत मदगती धोरण स्वीकारण्याचे काहीच कारण नाही. आपल्या भूमिकेमुळे असा समज निर्माण होत आहे, असे दिसून येताच सरकार बेचाळिसावी घटना-दुरुस्ती रद्द करण्याच्या दिलेल्या आश्वासनापासून मागे हटणार नाही. पुढच्या अधिवेशनात यासंबंधी अधिक व्यापक बिल मांडण्यात येईल असे स्पष्ट अभिवचन देणे कायदामंत्री शांतिभूषण यांना भाग पडले.

वास्तविक मी यापूर्वी अनेकदा सुचविल्याप्रमाणे नवी घटना-समिती निवडून संबंध घटनेचाच नव्याने विचार करणे अधिक योग्य ठरेल आणि त्यात एक महत्त्वाची दुरुस्ती राज्यसभेच्या निवडणुकीबाबत किंवा अधिकाराबाबत असायला हवी. राज्यसभा कधी विसर्जित होत नाही. दर दोन वर्षांनी तिचे एकतृतियांश सभासद निवडले जातात व त्यांची मुदत सहा वर्षे असते. लोकसभेच्या निवडणुकीत जे जनमत प्रतिबिंबित झाले ते राज्यसभेत प्रतिबिंबित होण्यास सहा वर्षांचा फेरा पुरा व्हावा लागतो. तोपर्यंत लोकसभेची दुसरी निवडणूक होते. लोकसभेत जनता पक्षाचे बहुमत पण राज्यसभेत मात्र काँग्रेसचे बहुमत हा वस्तुस्थितीशी विसंवाद आहे. तो दूर करण्यासाठी राज्यसभेची निवडणूक-पद्धती बदलायला हवी. लोकसभा व राज्यसभा यांची मुदत सारखीच असावी व निवडणूक एकाच वेळी व्हावी. निवडणुकाची घोषणा राष्ट्रपतींनी करताच दोन्ही गृहांचे विसर्जन व्हावे. निवडणुका घेऊन नवी संसद अस्तित्वात येईपर्यंतच्या काळात काही असाधारण परिस्थिती उद्भवल्यास तिला तोंड देण्यासाठी मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींनी वटहुकूम काढावा; पण नवी संसद भरताच त्याला ताबडतोब मान्यता घेतली जावी. राज्यसभेच्या निवडणूकपद्धतीत वरीलप्रमाणे बदल करणे लोकशाही तत्त्वास अनुसरूनच होईल. याबाबतीत दुसरी पर्यायी सूचना म्हणजे घटना-दुरुस्तीबाबत राज्यसभेला निर्णायक अधिकार असू नये. घटना-दुरुस्तीवर राज्यसभेने मतप्रदर्शन करावे; पण लोकसभेच्या दोनतृतियांश बहुमताने व्यक्त केलेले मत हेच या बाबतीत निर्णायक मानले जावे. अर्थविषयक तरतुदीच्या बिलाच्याबाबतीत राज्यसभेचे अधिकार ज्याप्रमाणे मर्यादित करण्यात आलेले आहेत, त्याप्रमाणे घटना-दुरुस्तीबाबतही ते मर्यादित करण्यात यावे. दोन गृहांत संघर्षाचे प्रसंग त्यामुळे येणार नाहीत. अधिक मूलभूत विचार करावयाचा म्हणजे राज्यसभा हवीच कशाला ? ती खरोखर काही उपयुक्त कार्य बजावीत आहे का ? गेल्या पंचवीस वर्षांतील तिच्या कार्याचा आढावा घेऊन या प्रश्नावर निर्णय घेण्यात यावा. राज्यपातळीवर दोन्ही ठिकाणी दोन गृहांची काहीही आवश्यकता नाही. घटनातज्ज्ञ, खासदार, राजकीय नेते, विचारवंत यांनी या दृष्टीने आपल्या घटनेत कोणत्या दुरुस्त्या हव्यात याचा विस्तृत आराखडा तयार करून व्यापक स्वरूपाची घटना-दुरुस्ती किंवा जरूर पडल्यास नवी घटनाच तयार करावी.

काँग्रेसमधील फुटीला घटना-दुरुस्ती हे आणखी एक निमित्त मिळणार आहे. चोविसाव्या घटनेतील काही दुरुस्त्या रद्द करण्यास सुद्धा काँग्रेस नेत्यांनी मान्यता द्यावी हे इंदिरा गांधींना रुचलेले नाही. रोज दोन-तीन राज्यांतील काँग्रेस खासदारांना आपल्या निवासस्थानी निमंत्रित करून बहुसंख्य खासदार आपल्या बाजूला आहेत का, याची त्यांनी चाचपणी केली. बहुमत आपल्या बाजूला असल्याची खात्री झाली तर ब्रह्मानंद रेड्डींना अध्यक्षपदावरून दूर करण्याप्रमाणेच यशवंतराव चव्हाणांना संसदीय काँग्रेस-पक्षाचे नेतेपदावरून दूर करावे व नवा नेता निवडावा अशी मागणी इंदिरा-समर्थक करण्याचा संभव आहे. □

परराष्ट्रीय घडामोडी

# पोर्तुगाल : प्रायोगिक लोकशाही

चन्द्रशेखर पुरन्दरे

दि. ८ डिसेंबरला भल्या पहाटे पावणेसहा वाजता पोर्तुगालचे सेनोर मारो सोअरेस यांच्या नेतृत्वाखालील सोशॅलिस्टांचे सरकार कोसळले. अवघ्या सोळा महिन्यातच फारसे कर्तृत्व करायला वाव न मिळता हे मंत्रिमंडळ एका बऱ्यापैकी क्षुल्लक कारणामुळे कोसळले. पन्नास वर्षांच्या गुलामगिरीनंतर प्रथमच लोकशाहीचा प्रयोग चालू असताना असा अकाली पडदा पडल्याने परत एकदा लोकशाही या राज्यपद्धतीच्याच यशस्वितेविषयी शंका उत्पन्न झाली म्हणून याचे महत्त्व International Monetary Fund, ( IMF ) या संस्थेकडून कर्ज घ्यावे किंवा नाही, घेतल्यास काय अटीवर घ्यावे, किती मुदतीचे घ्यावे यावर तब्बल चव्वेचाळीस तास चर्चा झाली. पोर्तुगालच्या राष्ट्रीय लोकसभेमध्ये कोणत्याच पक्षाचे निर्णायक बहुमत नाही. प्रमुख चार पक्ष. पहिला संख्याबलाने जास्त सोअरेसचा- सोशॅलिस्ट पक्ष, दुसरा सेंट्रिस्ट सोशल डेमोक्रॅट्स्, तिसरा कॉन्झर्वेटिव्ह सेंटर डेमोक्रॅट्स् आणि चौथा कम्युनिस्ट. यातील डेमोक्रॅटस्नी IMF कडून ठरलेल्या अटींवर कर्ज घेण्याच्या विधेयकाला पहिल्यापासूनच विरोध केला होता. चाळीस जागा असलेला कम्युनिस्ट पक्ष हा सोअरेसच्या सरकारचे भवितव्य ठरविण्यास प्रामुख्याने कारणीभूत होता, परंतु एकूण पाच कोटी डॉलर्सचे कर्ज घ्यायला त्याचा विरोध होता. कम्युनिस्टांचा नेता कुन्हल याने आपली भूमिका अखेरपर्यंत संदिग्ध ठेवली; परंतु मूळ विधेयकामध्ये कोणतीही दुरुस्ती करण्यास सोअरेसने नकार दिला आणि १०० विरुद्ध १५९ मतांनी विधेयक फेटाळले गेले. एकूण जी १०० मते विधेयकाच्या बाजूने पडली ती सुद्धा सोशॅलिस्टांच्या मूळ ताकदीहून कमी होती. म्हणजेच विधेयकाला पक्षांतर्गत विरोध झालेला होता. त्याच दिवशी दुपारी सोअरेसने मंत्रिमंडळाचा राजीनामा अध्यक्ष अँण्टोनिओ रॅमलो इनेस यांच्याकडे सुपूर्द केला.

हे सरकार जेव्हा अधिकारारूढ झाले तेव्हा उर्वरित तीन पक्षांनी व्यापक देशहित ध्यानात घेऊन त्याला सहकार्य करायचे ठरविले होते; पण आता हे सरकार कोसळल्याने पेचप्रसंग उभा राहिलेला आहे.

अधिक खोलात गेले असता, आर्थिक आघाडीवरील प्रचंड पीछेहाट हेच या मागचे कारण दिसते. मुळात पन्नास वर्षांच्या फ्रँकोखालच्या स्पेनसारख्याच राजवटीच्या दीर्घ निद्रेतून दीड वर्षापूर्वी पोर्तुगाल लोकशाहीकडे वळला. १६% बेकारी, चलनफुगवटा ३०% अशा आर्थिक परिस्थितीत पोर्तुगाल आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस सुधारण्याऐवजी बिघडतच आहे. फ्रँकोच्या स्पेनमध्ये सुद्धा जे किमान उद्योगीकरण झाले तेही पोर्तुगालमध्ये नाही. रेव्हेन्यूमध्ये फक्त १०% वाढ आणि ३५० कोटी डॉलर्सची परराष्ट्रीय कर्जे, या ओझ्याखाली ते राष्ट्र दबून गेले आहे.

या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी काही प्रचंड उद्योगांची एकदम उभारणी करण्यात आली; पण ते जो माल तयार करतात, तो बहुताशी प्रायव्हेट सेक्टरमध्ये आहे. बहुतेक युरोपियन राष्ट्रांनी ज्या संमिश्र अर्थव्यवस्थेचा ( मिक्स इकॉनॉमी) चा स्वीकार केलेला आहे त्याचाच पोर्तुगालनेही स्वीकार केला. त्यामुळे त्याची फळे हाती येण्यास काही कालावधी जावा लागणार आणि तेवढा तरी निभेल की नाही, याची सरकारला शाश्वती नाही. एकूण निर्यातीच्या ९०% निर्यात प्रायव्हेट सेक्टरमधून होते आणि मग तदनुषंगिक सर्व प्रश्न उभे रहातात.

याहीबाबतीत राजकारण घुसलेले आहे. सध्याची चलनवाढ रोखण्यासाठी व तुटीची अर्थव्यवस्था कशीबशी का होईना, सावरण्यासाठी पोर्तुगालला आज १०० ते १५० कोटी डॉलर्सची मदत पाहिजे. त्याची IMF कडे १५० कोटी डॉलर्सची मागणी होती. त्यातील ८० कोटीच मंजूर झाली; पण IMF ज्या तेरा देशांच्या जिवावर उभी आहे त्यांनी अमेरिकेच्या दडपणाखाली पोर्तुगालशी खेळणे सुरू केले. पहिला हप्ता पाच कोटी डॉलर्सचा द्यायचा आणि जर तो IMF सांगेल त्या अटींवर मंजूर केला तर पुढचा ७५ कोटी डॉलर्सचा हप्ता द्यायचा, अशी विभागणी ठरली आणि या पहिल्याच पाच कोटी डॉलर्सच्या कर्जावरून सरकार कोसळले. इतर युरोपियन देशांची 'घरचे झाले थोडे' अशी परिस्थिती असल्याने त्यांच्याही बगला वरच आहेत. शिवाय जोपर्यंत राजकीय चित्र स्पष्ट होत नाही, तोपर्यंत कोणतीही परकीय मदत मिळणे अशक्य आहे

अर्थातच या सर्व गोष्टींची जाणीव पोर्तुगालच्या चार प्रमुख पक्षांना असल्याने त्यांनी पुन्हा सरकार स्थापण्याविषयी बोलणी सुरू केली आहेत. सोअरेसच्या नेतृत्वावर सर्वांचे एकमत आहे, पण तो बाकी कोणत्याच पक्षाला विश्वासात घ्यायला तयार नाही. त्याचा सोशॅलिस्ट पक्ष आणि कम्युनिस्ट हे एकत्र आल्यास काहीसे स्थिर सरकार होऊ शकेल; पण कम्युनिस्टांना अर्थव्यवस्थेत हव्या असणाऱ्या सवलती द्यायला सोअरेस तयार नाही. कम्युनिस्टांचे आणि इतर दोन डेमोक्रॅट पक्षांचे विळ्या-भोपळ्याएवढे सख्य असल्याने त्या दोन डेमोक्रॅट पक्षांचे सरकारही तेवढेच अस्थिर रहाणार.

पोर्तुगालच्या राज्यघटनेप्रमाणे अध्यक्ष कौन्सिल ऑफ रिव्होल्यूशन या मिलिटरी सल्लागार समितीच्या व संसदेतील प्रमुख पक्षनेत्यांच्या सल्ल्यानुसार पंतप्रधान नियुक्त करतो ही सल्लागार समिती म्हणजे जुन्या मिलिटरी राजवटीची निशाणी आहे. अध्यक्ष इनेसपुढे त्यामुळे पुढील पर्याय आहेत.

१) संयुक्त सरकार बनविण्यासाठी सोअरेसला पाचारण करणे. ( त्याची असमर्थता आताच सांगितली. )

२) सर्वपक्षीय असे एक सरकार बनविणे. ( पण असे सरकार बनविणे म्हणजे दोन दिशांना दोन तोंडे असल्याने निष्क्रियतेला आवाहन करणे होय. )

३) अपक्षीय तज्ज्ञांच्या सल्ल्याने राज्यकारभार चालविणे. ( हे राजकीय पक्षांना पटणारे नाही. )

४) नवीन निवडणुका घेणे. हाही पर्याय स्तुत्य नाही. कारण, खर्चाचा प्रश्न वगळताही थोड्या-फार फरकाने जर या प्रमुख चार पक्षांना अशाच प्रमाणात जागा मिळाल्या तर निवडणुकीनंतरही निर्णायक बहुमत कोणालाच नसल्याने हीच रस्सीखेच चालू राहील

कॉन्झर्वेटिव्ह डेमोक्रॅटचा नेता फ्रेटा दो अमरल म्हणाला त्याप्रमाणे अध्यक्ष काहीच करू शकत नाही; पण अध्यक्षानेच काही तरी केले पाहिजे; अशी परिस्थिती सध्या पोर्तुगालमध्ये निर्माण झाली आहे. ☐

आर्थिक टिपणे :

# रिझर्व्ह बँकेची नवी योजना!

नारायण वैद्य । माजी उपमहापौर, पुणे

लहान शेतकऱ्यांना बँकांकडून जी कर्जे दिली जातील ती भरून काढण्यासाठी एक जादा सहाय्यक योजना ('Additional Refinancing Window') रिझर्व्ह बँकेने सुरू केल्याचे त्या बँकेचे गव्हर्नर डॉ. आय् जी. पटेल यानी सागितले. १२ डिसेंबरला मुबईत भरलेल्या बँकाच्या प्रमुख संचालकाच्या सभेत ते बोलत होते. तसेच लघु-उद्योग आणि कृषि-उद्योग यामध्ये भांडवली गुतवणुकीचा वेग वाढविण्यासाठी केलेल्या उपाययोजनेचा तपशीलही त्यांनी सागितला. केवळ जादा मागणी असलेल्या किंवा प्राधान्यविभागालाच (प्रायॉरिटी सेक्टर) कर्ज मिळावे असे नव्हे, तर त्याचबरोबर समाजातल्या आणि उद्योगातल्या दुर्बल घटकांनाही विना अडथळा कर्जपुरवठा व्हावा ह्या हेतूने रिझर्व्ह बँकेने ही पावले उचलली आहेत. रिझर्व्ह बँकेने आपल्या पत-पुरवठा धोरणामधे कोणताही मूलभूत बदल केलेला नाही. अशा तऱ्हेने पत-पुरवठा करून दर आठवड्याला त्याचा सर्व्हे घेतला जाईल व त्यानुसार या योजनेत काय बदल करावयाचे ते ठरविले जाईल.

समाजातल्या दुर्बल घटकांना सहाय्य करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने आखलेल्या योजनेचा तपशील असा :–

१. लहान शेतकऱ्यांना बँकानी कर्ज देण्याबाबत पुढाकार घेतल्यास रिझर्व्ह बँक सक्रीय सहाय्य देईल १ जानेवारी १९७८ नंतर लहान शेतकऱ्यांना प्रत्येकी २,५०० रुपयांपर्यंत जी कर्जे दिली जातील ( मग ती कमी, मध्यम वा दीर्घ मुदतीची असोत ) तेवढी रक्कम रिझर्व्ह बँक सबधित बँकांना कर्ज म्हणून ९ टक्के दराने देईल. रिझर्व्ह बँकेच्या इतर बँकाना पत-पुरवठा करण्याच्या नेहमीच्या रकमेपेक्षा ही रक्कम जादा असेल.

२. क्रेडिट गॅरंटी योजनेखाली येणारे लघु-उद्योग व स्पेशल गॅरंटी योजनेखाली येणारे स्व–तांत्रिक उद्योग, तसेच रस्तेवाहतुकीच्या व्यवसायातील लहान उद्योजक आणि मागासलेल्या विशिष्ट जिल्ह्यातील किंवा क्षेत्रातील लघुउद्योग याना ११ टक्के दराने कमीत कमी ३ वर्षे मुदतीचे कर्ज, बँकांनी भाडवली गुतवणुकीसाठी दिल्यास त्याची भरपाई ९ टक्क्यानी रिझर्व्ह बँक करील आणि हा कर्ज पुरवठा नेहमीपेक्षा जादा असेल.

३. कृषिविभागामधे गुतवणुकीला प्रोत्साहन मिळावे म्हणून लहान पाणी-पुरवठा योजना व भू-विकास यासाठी कमीत कमी ३ वर्षे मुदतीचे व १०.५ टक्के दराचे जे कर्ज दिले जाईल, तसेच ॲग्रिकल्चरल रिफायनान्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने निर्देशित केलेल्या शेतीसंबंधित विविध कामासाठी शेतकऱ्यांना कमीत कमी ३ वर्षे मुदतीचे जे कर्ज दिले जाईल. ती रक्कमही रिझर्व्ह बँक ९ टक्के दराने जादा कर्ज म्हणून संबधित बँकाना देईल.

हे कर्ज शेतकऱ्याला विनाविलंब मिळावे अशीही इच्छा डॉ. पटेल यांनी व्यक्त केली आहे.

१९७७–७८ मधील सर्वसाधारण वाढ समाधानकारक आहे. आणि या वर्षीचा (Growth Rate) ५ टक्के पडेल असा अंदाज आहे. गेल्या वर्षी तो केवळ २ टक्के होता, परंतु गेल्या वर्षी औद्योगिक क्षेत्राचा त्यामध्ये खूपच मोठा वाटा होता, तितका तो या वर्षी दिसत नाही. तरी सुद्धा Growth Rate मात्र २ टक्क्यावरून ५ टक्क्यांपर्यंत वाढतो आहे याचे महत्त्वाचे कारण देशभर सर्वदूर कृषिउद्योग आणि तत्सम उद्योग देशाच्या आर्थिक वाढीमध्ये महत्त्वाची भर घालीत आहेत. ही भर घालण्याचे काम देशातले मूठभर बडे जमीनदारच करीत आहेत असे नव्हे, तर सर्वत्र खेडोपाडी पसरलेला लहान शेतकरीही यात भर घालीत आहे. हा रेट पुढील वर्षीही कायम ठेवायचा असेल (आणि त्यात वाढ अपेक्षित असेल ) तर बेकारी-निर्मूलन, अधिक रोजगार उपलब्धता आणि दारिद्र्य दूर करणाऱ्या विविध योजना यांची सागड समाजातल्या या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांशी घालून त्यांना सहाय्य करण्याची जी नवीन योजना रिझर्व्ह बँकेने आखली आहे ती स्तुत्य आहे.

रिझर्व्ह बँकेकडे पत-पुरवठा करण्यासाठी जादा रक्कम आज उपलब्ध आहे किंवा परकीय चलन गंगाजळीचा साठा वेगाने वाढतो आहे एवढेच या उदार पत-पुरवठा धोरणाचे कारण नव्हे. जनता-पार्टीच्या आर्थिक धोरणाबाबतच्या प्रकटनात समाजातल्या दुर्बल घटकांना सहाय्य करण्याची जी दिशा अभिप्रेत आहे त्यानुसारच रिझर्व्ह बँकेने हे पाऊल उचलले आहे हे उघड आहे.

हौसिंग ॲंड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ( हुडको ) ने ग्रामीण भागात घरबांधणीच्या कार्यक्रमाला अधिक उत्तेजन आणि प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. आतापर्यंत हुडकोचे घरबांधणी-कार्य मुख्यत्वे करून शहरी भागात चालविले जात असे. प्रत्येक प्रांतातील एक गाव घरबांधणीसाठी दत्तक घ्यावयाचे आणि तेथे नॅशनल बिल्डिंग्ज् ऑर्गनायझेशनच्या नमुन्याबरहुकूम घरे बांधावयाची असे काही

वर्षांपूर्वी हडकोने ठरविल्याचे ऐकिवात होते. आता घरबांधणीसाठी जागा तयार करणे व त्यावर प्रत्यक्ष बांधकाम करणे यासाठी ग्रामवासीयाना कर्ज देण्याची तयारी हडकोने दाखविल्याचे कळते.

गृहनिर्माण आणि बांधकामखात्याच्या केन्द्रीय मंत्रालयाने १९७६-७७ चा जो वार्षिक अहवाल सादर केला त्यात १९७१ च्या शिरगणतीचा आधार घेऊन असे म्हटले आहे की, ५ व्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला देशात १ कोटी ५६ लक्ष कुटुंबाना राहण्यासाठी घरेच नाहीत – यात शहरी भागातील ३८ लक्ष कुटुंबे आणि ग्रामीण भागात १ कोटी १३ लक्ष कुटुंबे आहेत.

जनता-पार्टीने ग्रामीण विकासावर भर दिलेला आहे हे खरे; परंतु ज्याप्रमाणे बेकारी निवारणाच्या १० वर्षांच्या योजनेसाठी सरकार जसे प्रयत्नशील आहे, तसे केन्द्र सरकारने ग्रामीण घरबांधणीचा निश्चित कालावधीने मर्यादित असलेला विशिष्ट कार्यक्रम हाती घ्यावयास हवा. इंडस्ट्रियल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेन्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या संस्थेने हौसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कॉर्पोरेशन स्थापन केली आहे. ग्रामीण व शहरी भागात घरबांधणीचा धडक कार्यक्रम हाती घ्यावयाचा असे ह्या संस्थेने ठरविले आहे. परंतु आपला देश इतका मोठा आहे की, देशभर ग्रामीण व शहरी भागात घरे बांधून ती जनतेच्या हवाली करण्याचा कार्यक्रम किती वेगाने केला तरी घरे देणे शक्य दिसत नाही. जागांचा विकास करून पाणी, ड्रेनेज, लाइट इत्यादि आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्याचे हडकोने जे ठरविले आहे त्याबाबत महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू आणि मध्यप्रदेश यांनी विशेष औत्सुक्य दाखविले आहे. यात एक गोष्ट बरी आहे की, ज्या कुटुंबाची महिना उत्पन्न ३५० रुपयापर्यंत आहे. त्यांनाच या हडको योजनेचा लाभ मिळेल.

परंतु प्रश्न इतका मोठा व बिकट आहे की, केवळ सरकारी स्तरावरील उपाययोजना तोकडी पडेल प्रत्येक प्रश्न सोडविण्यासाठी सरकारी कंपनी, त्यासाठी सरकारी पैसा आणि आर्थिक नुकसान झाल्यास ते मात्र जनतेचे, असा गेली ३० वर्षे कॉंग्रेस सरकारचा खाक्या होता. काही दिवसापूर्वी केन्द्र सरकारचे गृहनिर्माण आणि बांधकाममंत्री श्री. सिकंदर बख्त यांनी राज्यसभेमध्ये सांगितले की, गृहबांधणीच्या व्यवसायात खाजगी व्यावसायिकाना, त्यानी मोठ्या प्रमाणावर घरबांधणीचा कार्यक्रम हाती घ्यावा म्हणून प्रोत्साहन दिले जाईल.

घरबांधणीचा कार्यक्रम शहरात असो वा ग्रामीण भागात असो, सरकारी असो वा खाजगी असो, सीमेंट हा त्यातला सर्वात महत्त्वाचा व अत्यावश्यक घटक होऊन बसला आहे. विकासाच्या कामाची गती कमी करून चालणार नाही. धरणे, कालवे, रस्ते, कारखाने आणि प्रचंड इमारती यांना दररोज हजारो टन सीमेंट लागते, विक्रीची किंमत परवडणारी नसल्यामुळे या धंद्यात नव्याने भांडवल गुतवण्यास फारसे कोणी पुढे येत नाही. कच्चा माल भरपूर आहे कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री देशात तयार होऊ शकते, तरी सुद्धा सीमेंटचे उत्पादन करणारे कारखाने १९७१मध्ये ४८ होते ते १९७६ मध्ये जेमतेम ५३ झाले. विद्युतपुरवठ्यामध्ये मोठी कपात असल्यामुळे ( आणि कोळशाचा पुरवठा समाधानकारक नसल्यामुळे ) या वर्षीचे १ कोटी ९० लक्ष टन उत्पादनाचे लक्ष्य गाठले जाणार नाही असे स्पष्ट दिसत आहे. मागणी आणि पुरवठा यामधील सध्याचे अंतर २० लक्ष टनाचे आहे. ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम येथून पुढे सर्व बाजूनी वेग घेणार असेल तर १९८० पर्यंत मागणी आणि पुरवठा यामधील तफावत ३० लक्ष टनापर्यंत जाईल. म्हणून ग्रामीण भागातील घरबांधणीचा कार्यक्रम वेगाने पुढे न्यावयाचा असेल तर सीमेंटचा पुरवठा केला पाहिजे, नाही तर दुसरा पर्यायी घटक शोधला पाहिजे. गावोगावी चुन्याच्या घाणी पुन्हा चालू कराव्या लागतील, असे आज तरी दिसत आहे. प्रत्येक गावामध्ये बांधकामासाठी लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन व व्यापार करणाऱ्या ( वाळू, दगड, खडी, मळलेला चुना, इमारती लाकूड, फळ्या, कौले इत्यादि ) लघु उद्योजकाना बँकांनी रिझर्व बँकेच्या नव्या योजनेत (Additional Re-Financing Window) समाविष्ट करून घ्यावे अशी एक सूचना आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे घर म्हणजे विविधोपयोगी ( Multipurpose ) वास्तू होय. गुरांचा गोठा, कोंबड्यांचे खुराडे, धान्याचे गोडाउन, बी–बियाणे, खत, अवजारे ठेवण्याची जागा, गवताच्या साठवणीची सोय, बैलगाडी इत्यादि व्यवस्था शेतकऱ्याला स्वतःच्या घरातच करावी लागते. असे घर बांधण्यासाठी लागणारे कर्ज सुद्धा बँकांनी या नव्या योजनेतून द्यावे अशी दुसरी सूचना आहे.

शेतकरी हा ग्रामीण विकासाचा कणा असेल तर त्याचे घर आणि शेती हा एक घटक मानून त्यासाठी पतपुरवठा केला जाणे आवश्यक आहे. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०



**आंध्र–वादळ**

# मदतकार्य अधिक जोमाने पण शिस्तीने चालायला हवे

निखिल वागळे

प्रत्येक शहरात, गावात एखादी तरी स्मशानभूमी असते; पण सबंध गावाची, शहराचीच स्मशानभूमी झाल्याचे विदारक दृश्य विरळंच. वादळग्रस्त आंध्रप्रदेशचे दृश्य सध्या तरी असं आहे.

एक विस्तीर्ण, विदीर्ण मसणवटा.

अर्थात या स्मशानभूमीत जळणारी प्रेतं अन् त्यांचा शिसारणारा वास एवढाच एकसुरीपणा नाही. मानवी जीवनाच्या अनेक पैलूंचे दर्शन येथे घडते.

निसर्गाच्या प्रचंड तडाख्याने कोलमडून पडलेला मानव, या कोलमडून गेलेल्या जिवाला उभं राहायला मदत करणारी माणसं, या साऱ्यांचा आत्मविश्वास, धैर्य कमावण्यासाठी चाललेली धडपड, मानवतेचं नाव घेतानाच मानव्याचा खून करणारा माणूस, राजकीय स्वार्थासाठी कोणत्याही गोष्टीला तयार झालेले विविध पक्ष, हे सारं दृश्य आंध्रमधलं आहे. वादळग्रस्त खेड्यांमध्ये सहाय्याचे काम करताना हे सर्व बघायला मिळतं आणि प्रसंगी मन खिन्न होतं, तर प्रसंगी उल्हसितही होतं.

वादळाचा आणि सागरी लाटांचा तडाखा बसलेले मुख्य जिल्हे तीन. कृष्णा, गुंटुर आणि पूर्व गोदावरी. यांपैकी पूर्व गोदावरी जिल्ह्यातले नुकसान तुलनेने नगण्यच. गुंटुरमध्ये प्रामुख्याने वित्तहानि झालेली आहे. वादळवाऱ्याच्या प्रचंड झोतामुळे नारळी, केळी वगैरे पिके पार जमीनदोस्त झालेली. गावकऱ्यांच्या उपजीविकेचे साधनच अशा रीतीने नष्ट झाल्यामुळे आज त्यांच्यापुढे प्रचंड प्रश्नचिन्हच उभे राहिले आहे. अशीच प्रचंड प्राणहानी झाली कृष्णा जिल्ह्यात. याशिवाय इतर सर्वसाधारण नुकसान आहेच. दिवी तालुक्यातील अवनिगड्डा हे शहर सर्व मदतीचे केंद्रस्थान. विजयवाडा, हैद्राबाद या शहरांवरून आंध्रमधील वादळाचा काहीच अंदाज येत नाही. सुस्त अजगरागत पडलेली ही शहरं. स्वतःच्या मस्तीत असलेली इथली जनता. वादळग्रस्तांना सहाय्याचा हात द्यावा एवढीही संवेदनशीलता इथे आढळत नाही. रोषणाई, समारंभ, सारं नेहमीप्रमाणे चाललेलं आहे. वादळग्रस्त खेडुतांच्या मदतीसाठी धावताहेत महाराष्ट्र, कलकत्ता, दिल्लीतले लोक आणि आंध्रमधील त्यांचे शहरी बांधव मात्र उदासीन आहेत, हे दृश्य धक्कादायक आहे. अर्थात कोणत्याही प्राणसंकटात आमची खेडीच धुऊन निघतात. शहरांवर त्याचा ढिम्म परिणाम होत नाही, ही आपली जुनी परंपरा. खेड्यांनी कष्टावं नि शहरांनी खावं, खेड्यांची मढी बनावीत अन् शहरांनी लोणी चाटावं, हे दृश्य किती दिवस चालणार ? हैद्राबाद, विजयवाड्यामधून नोकरशाहीच्या मदतीची सूत्रे हालतात, एवढाच त्यांचा आज या वादळाशी संबंध आहे. ही शहरी निर्दयता बड्या केंद्रीय नेत्यांच्या स्वागतासाठी मात्र पुढे आहे. जोपर्यंत स्वतःला चटका बसत नाही तोपर्यंत आमची शहरे अशीच सुस्त राहाणार असे दिसते. त्यामानाने परप्रांतीय लोकांची संवेदनशीलता उल्लेखनीय आहे.

## वीस फुटी लाट अन् लाल झोळ

विजयवाड्याहून अवनिगड्डयाकडे निघाल्यावर वादळाचा अंदाज येऊ लागतो. जसजसे अधिकाधिक आत जावे, तसतशी वादळाची तीव्रता वाढत जाते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना साठलेले गलिच्छ पाणी अन् या पाण्याच्या पलीकडे दोन्ही बाजूंना उजाड माळरानं बनलेली शेतं. या शेतांमध्ये उन्मळून पडलेली झाडं. कमरेत वाकलेले विजेचे खांब. रहदारीला अडथळा आणणारी उद्ध्वस्त तारांची वेटोळी. एखादे छप्पर उडालेले, एखादे पार जमीनदोस्त झालेले घर. घाण पाण्यात काही अंतरावर पडलेले, कुजलेले जनावराचे प्रेत. त्याचा वास मेंदूला जाऊन भिडणारा. काही ठिकाणी पडलेली झाडं कापून लाकडं गोळा करणारे, उन्मळलेली शेती कापून गवत म्हणून घेऊन जाणारे गावकरी दिसतात. आपला संसार बैलगाडीवर टाकून ती गाडी शहराकडे ओढून नेणारा गावकरी भेटतो. केवळ पोटासाठी, सारं उद्ध्वस्त झालं असताना मैलोन्‌मैल पायपीट करणारा सायकल-रिक्षावाला भेटतो. त्रयस्थ होऊन घेतलेली वादळी नुकसानीची छवी ही

अशी आहे. गावागावातून जाऊन काम करताना या साऱ्या विध्वंसामागे दडलेलं मानवी मनही कळतं.

एकोणीस नोव्हेंबरला दुपारी तीनच्या सुमाराला या विध्वंस-पर्वाला सुरुवात झाली. प्रथम जोरदार पाऊस सुरू झाला. त्यानंतर पावसाबरोबर वाऱ्यानेही झोडपायला आरंभ केला आणि नंतर २० फूट उंचीच्या, २०० कि. मी. वेगाच्या लाटांनी थैमान घातले. समुद्रकिनाऱ्यापासून ६ मैल आत या लाटेची उंची ताडाच्या झाडाएवढी होती, असे खेडुतांनी सांगितले. मग समुद्रकिनाऱ्यानजिक असलेल्या संगमेश्वरम्‌सारख्या खेड्यात हे थैमान किती भयाण असेल!

या लाटेच पाणी जोरदार प्रवाहात गावात शिरायचे. अनेक ठिकाणी भोवरे निर्माण व्हायचे. जे जे सापडेल ते गिळंकृत करायचे. या घणाघातात गावंच्या गावं नष्ट झाली. झावळ्यांनी सजवलेली घरे शिल्लक राहणे शक्यच नव्हते पण भक्कम विटांची घरेही उध्वस्त झाली. या घराचे जमिनीत रोवलेले, लाल-पिवळ्या रंगांची आंध्रची विशिष्ट नक्षी पायथ्याशी ल्यालेले दरवाजे उदास हसत होते, आमच्याकडे पाहून! या साऱ्या *तांडवामध्ये गावकऱ्यांनी झाडाचा आश्रय* घेतला, मंदिराच्या कळसांचा आश्रय घेतला. कित्येक तास अशा आधाराच्या सहाय्याने हे लोक लोंबकळत होते. कोणाचे वडील, आई, बहीण, भाऊ डोळ्यांदेखत वाहून गेले. दुःख करण्याची सोय नव्हती. जीव वाचवणे महत्त्वाचे होते. लाटेचे हे भयाण नृत्य रात्री एक वाजल्यानंतर थांबले, ते सर्व गावकऱ्यांच्या समोर भविष्याचे भीषण प्रश्नचिन्ह ठेवून.

या लाटेवर प्रचंड लाल झोळ दिसला असे समुद्रकिनाऱ्याजवळचे खेडूत सांगतात. हा लाल आगीचा पट्टा कित्येक तास चालू होता, असे जगलेले लोक सांगतात. आंध्र हा उष्ण हवामानाचा प्रदेश. उष्ण कटिबंधातल्या वेगवान वादळामुळे २०० हैड्रोजन बॉंबस् एवढी प्रचंड शक्ती निर्माण होते. सुसाट वाऱ्यामुळे समुद्राच्या पाण्यातले प्राणवायू व हैड्रोजन वेगळे झाले व त्यांनी पेट घेतल्याने हा लाल झोळ (आगीचा विशिष्ट पट्टा) दिसला, असे शास्त्रज्ञ सांगतात.

या आधी आंध्र प्रदेशात १८६४ साली वादळ झाले होते. त्यानंतर सागरी लाटा अन् सुसाट वारा यांचे हे तांडव प्रथमच. १८६४ च्या वादळात अदाजे ३५००० लोकांचे बळी पडले होते. आजच्या वादळातल्या मृतांच्या खऱ्या आकड्याचा अदाज ८५००० आहे. त्यावरून त्याची भयानकता आणि जोर याची कल्पना यावी. मृतांच्या या संख्येबद्दल बोलले जाते की, वेधशाळेने खेड्यांना वादळाची पूर्वसूचना देऊनही लोक गाफील राहिल्याने एवढी मोठी प्राणहानी झाली; परंतु वादळात घुऊन निघालेली गावे आणि तेथील गावकऱ्यांची आर्थिक स्थिती पहाता त्याच्यापैकी कितीजणाकडे रेडिओ असतील याबद्दल शंकाच आहे. पुन्हा काही शिक्षित गावकऱ्याच्या म्हणण्याप्रमाणे रेडिओने काही निश्चित बातमीच दिली नव्हती. मछलीपट्टम्‌सारख्या ठिकाणी सात-आठ फुटांच्या लाटा म्हणजे नेहमीचीच गोष्ट. त्यामुळे वीस फुटाची प्रचंड लाट ही गोष्ट येथील लोकांना अकल्पनीय (आणि भयावह) वाटणे सहज शक्य आहे.

इतर अनेकाप्रमाणेच आमचा तळ अवनिगड्डयातच होता. अवनिगड्डयाला पोचलो तेव्हा काहीसे निराशच झालो कारण गेल्या-गेल्याच तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला विचारले, '*तुम्ही कशाला आलात? सर्व* परिस्थिती ठीक आहे. सरकारी यत्रणा कार्यक्षम आहे. काही कामच उरलेले नाही!' अवनिगड्डयाच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्येही असेच पढवलेले उत्तर मिळाले. सरळ गावातल्या लोकाशी बोलण्यास सुरुवात केली. भाषेची अडचण होतीच. एखादा हिंदी येणारा मध्यस्थ गाठून लोकांना माहिती विचारली, सरकारी लोकाकडून मिळालेले उत्तर सागितले. *आम्ही महाराष्ट्रातून मदतीसाठी आलो* हे समजल्यावर त्याना फार आनंद झाला. त्यानी विविध गावांची माहिती सांगितली. नागायलका येथे ५००० निर्वासित असल्याचे कळले. अनेक गावात प्रेते तशीच पडून असल्याचे समजले. रा स्व. संघाचे आचार्य नावाचे गृहस्थ भेटले. त्यांनी कोणत्या गावात कामाची गरज आहे, हे समजावून सागितले. अवनिगड्डयात श्री. प्रभाकरजी हे सर्वोदयी नेते तळ देऊन होते. आंध्रचे शिक्षणमत्री कृष्णारावही येथेच होते. त्यानाही भेटलो.

वादळग्रस्त भागात वैद्यकीय मदतीशिवाय काहीही काम झालेले नव्हते. लस टोचण्याचे काम मात्र बहुतेक सर्व गावांमधून झाले होते. त्यामुळे साथीची फारशी भीति उरली नव्हती; परंतु प्रेते उचलण्याचे, अन्न-कपडे यांचे वितरण करण्याचे, पुनर्वसनाचे सर्वच काम बाकी होते. स्वत चे अपयश झाकण्यासाठी बाहेरून येणाऱ्या लोकाच्या डोळ्यांत धूळफेक करणाऱ्या सरकारी यत्रणेची विलक्षण चीड आली.

अवनिगड्डा शहरात उघडलेल्या चारही निर्वासित छावण्यामध्ये सावळा गोंधळच होता. सयोजक जागेवर नाहीत. निर्वासितांमध्ये भांडणे चाललेली, असा सारा प्रकार.

तेथून निघून आम्ही मंदपाकला या समुद्रकिनाऱ्यापासून सहा मैलावर असलेल्या गावी निघालो. रस्त्याच्या दोन्ही बाजूना घाण पाण्यात पडलेली प्रेतं, उन्मळून पडलेली झाडं, पाने झडून अस्थिपंजर राहिलेली झाडे, शिरच्छेद झालेल्या माणसागत दिसणारी, शेंडे उडालेली ताडाची झाडे. दृश्य तेच. अधूनमधून अस्ताव्यस्त पडलेली मानवी प्रेतेही दिसत होती. गावाकडे जाणारी सडक पार धुऊन निघाली होती. सैन्यातल्या जवानांनी खडी वगैरे टाकून सुधारण्याचा प्रयत्न केला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूना प्रेते *जळत होती. राखेच्या ढिगातून येणारा धूर* सर्वत्र कोंडला होता. जळणाऱ्या प्रेताच्या वासाने आता आमची नाके बधिर झाली होती. एखादी मोडलेली बैलगाडी, रिक्षा या ढिगाऱ्यात घुसून जळत होती. मध्ये भावदेवरपल्ली हे गाव लागले. पूर्णपणे उध्वस्त. ठिकठिकाणी गाई-म्हशींची प्रेते पडलेली. या गावात भारत सेवक समाज, आनंदमार्गी यांचे तळ होते. शिधावाटपकेंद्रही होते. *गावासाठी खास बांधून घेतलेले काही कालवे* फुटून त्याचे पाणी सर्वत्र पसरले होते.

## मानसिक धक्का

हे सर्व बघत जात असताना आम्हाला एक भयानक दृश्य दिसले. एक बाई, डबक्यात उपडी पडलेली. डबक्याचे हिरवट पिवळसर पाणी प्रेत फुगलं होत कातडी निघून आली होती. तिचे तुकडे पाण्यावर तरंगत होते. आम्ही हे प्रेत बाहेर काढण्याचे ठरविले. दोरीचे फास करून प्रेताच्या पसरलेल्या हातात टाकले. दुसरा फास पायात टाकून हळूहळू ओढीत ते प्रेत शेताच्या बांधापाशी

आणले. ते वर काढून जाळणे आवश्यक होते. फारच कठीण काम. शव पूर्णपणे विदीर्ण झालेले. थोडासा धक्का बसला तर एखादा अवयव तुटून यायचा धीर करून प्रेताच्या पोटाखाली काठी घातली. हळू हळू प्रेत काठावर आणून सरळ केले. बाई गरोदर असावी. प्रेत ओले असल्याने जळणे कठीण होते. थोडा वेळ थाबून प्रेताखाली व वर गवत, सुकलेल्या झावळ्या टाकल्या अन् भग्न मनाने प्रेताला अग्नी दिला — या डबक्याच्या शेजारीच, शेतात एका लहान मुलीचे प्रेत होते. चेहरा ओळखू न येण्यापर्यंत खराब झालेले. तोडात पाणी गेल्याने जबड्याने आ वासला होता. पांढरेशुभ्र हात भयाण दिसत होते. प्रेत सुक्या जमिनीवर असल्याने जाळण्यास त्रास झाला नाही.

आतापर्यंत गावकरी आमच्याभोवती जमले होते. या साऱ्या थैमानामुळे त्यांना फार मोठा धक्का बसल्याचे जाणवत होते. डोळ्यात एक वेडा — उदास भाव. दु ख विसरण्यासाठी कामाला लागावे तर कामच नाही. प्रेतं जाळायला हे लोक विलक्षण घाबरतात. कदाचित प्रेतामुळे जुन्या भयाण स्मृती जागवल्या जात असाव्यात.या साऱ्याना खायला हवे होते. कपडे हवे होते. कोणताही वितरण करणारा ट्रक गावात पोचला नव्हता. आमच्याजवळ देण्यासारखे काहीच नव्हते त्यांच्याशी बोलून, त्यांचे दु ख समजून घेऊन त्यांना आत्मविश्वास देण्याची गरज होती. या वादळातून उभे रहाण्यासाठी गावकऱ्याचा सहभाग व्हायला हवा होता. आमच्या हातवाऱ्याच्या भाषेत, तेलगू शब्दाच्या सहाय्याने त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. वस्तीकडे जाताना वाटेत एका बाईचे प्रेत झुडपात अडकून पडलेले दिसले. झुडपापर्यंत जाणे अशक्य होते. कारण सर्वत्र दलदल माजलेली, गावातले प्रशस्त असे घर जमीनदोस्त झालेले होते. उरलेल्या आसऱ्याला लोक राहिली होती. वाहून आलेली फुटकी गाडकी-मडकी रस्त्यावर पडली होती, आपल्या पोकळीत विषण्णता साठवून घेत. गाई-म्हशीच्या प्रेतावर कुत्री तुटून पडली होती. सध्या कुत्रा हा येथील सर्वांत भयानक प्राणी आहे. प्रेत खाऊन पिसाळलेला कुत्रा माणसाला चावला तर माणूस दगावण्याचा संभव असतो. सगळ्यात नवलाची गोष्ट म्हणजे, एवढ्या सर्व थैमानात कुत्रे वाचले आहेत. संपूर्ण प्रवासात आम्हाला केवळ दोन कुत्र्यांची प्रेतं दिसली. पक्षीसुद्धा वादळ-वाऱ्यात मेल्यामुळे गिधाडे येथे आलेली नाहीत हे सुदैव. एका ओढ्याच्या काठी देवाच्या तसबिरी पडलेल्या होत्या. एका खेडुताला मी त्याबद्दल विचारले. त्याने रागाने ती तसबीर उचलून ओढ्यात फेकली. प्रसंग मोठा लाक्षणिक होता. पण हाच माणूस थोड्या दिवसांनी याच देवाची या कृत्याबद्दल क्षमा मागणार होता; पुन्हा देवभोळा होणार होता हेही तितकेच खरे होते

गावातल्या घरातले प्रचड वजनाचे रगडे पाण्यात वाहून आलेले दिसत होते एका ठिकाणी बैलगाडीचे बैल मरून पडले होते. अर्धा भाग उद्ध्वस्त झाला होता. अन् चाक जाऊन उकिरड्यात उभे होते, तर दुसऱ्या बाजूच्या पाण्यातल्या उकिरड्यावर कमळे उगवली होती. खेडुतांना चागल्या भविष्याची आशा दाखवीत. बदकं पोहत होती स्वैरपणे आशा आणि निराशा याच्या सीमा एकमेकांना भिडल्या होत्या.

गावात एक तांदळाची गिरणी होती. दुर्गाप्रसाद राव हा इंजिनिअर तिचा मालक. या गिरणीत पाणी शिरले. सर्व धान्य वगैरे तरगू लागले. अजूनही धान्य भिंतीना, छपराला चिकटले आहे. या गिरणीत उचावर असलेल्या एका खोक्यात लहान मुलांना ठेवण्यात आल्याने ती वाचली. गिरणीच्या वरच्या मजल्यावर चढलेली माणसेही वाचली. गिरणी मात्र आतून खलास झाली. दुर्गाप्रसाद निराश झालाय; पण निराशेतही काही ना काही काम करण्याचा प्रयत्न करतोय. गिरणीच्या मागील बाजूला खाण-कामगार प्रेतं पुरीत होते. पुरलेल्या प्रेतावरून चालत थोडेसे गेलो तर जळत असलेल्या प्रेतांचा वास आला. इमारत शाळेची होती. वादळाआधी पाऊस आल्याने गावातली गुरे या शाळेत गेली आणि वादळामध्ये तिथेच थावली. त्याची प्रेत जाळली होती. संपूर्ण शाळेची इमारत पडली होती. या उद्ध्वस्तपणात दरवाजांच्या चौकटीचा सुनेपणा भर टाकीत होता. शाळा जर व्यवस्थित केली तर गावातल्या लोकाना थोडासा तरी आसरा मिळाला असता. सध्या तरी तिथे प्रेतंच पडली होती. शाळेकडून निघताना एका खांबावर एकटीच उरलेली 'इयत्ता २ री'ची पाटी माझ्याकडे पाहून विषादाने हसत होती !

दासरबालकस्वामी शाळेजवळ रहाणारा खेडुत. आपल्या तीन मुलांना घेऊन झाडावर चढला. दुसऱ्या झाडावर इनर तिघासह त्याची आई चढली. लाटेपासून बचावण्याच्या नादात हातातली मुलं वाहून गेली आता उरलेल्या मुलांसकट दिवस काढतोय. पुन्नराव हा ४१ एकर जमिनीचा मालक. वादळापायी कफल्लक झालाय सारं काही विसरून पुन्हा शेतीच्या कामाला लागावं तर खारं पाणी जमिनीत शिरल्यामुळे येत्या दोन वर्षांत तरी तेथे पीक येणार नाही. उपजीविकेचा हा प्रश्न सर्वांनाच भेडसावतोय.

परतताना एका ठिकाणी बरीचशी खेळणी, पत्ते, पदवीचा दाखला, प्लास्टिकची फुले इतस्ततः पडलेले दिसले. कोणाचे तरी घर असावे. एका ठिकाणी खाबावर लावलेले ध्वनिक्षेपक जबडा वासून उभे होते. लग्न वा कसला तरी समारंभ असतानाच सागरी लाटांची झडप पडली असावी. या सर्व लहान लहान घटना, वस्तू, लोकाचे बोल मनाला जाऊन भिडत होते स्वत.चे उदास मन जपतजपत पावलं परतीच्या वाटेला लागली.

## परतीच्या वाटेवर

मंदपाकलामध्ये ४००० लोकसख्येपैकी अंदाजे ४०० लोक जिवत आहेत, तर शेजारच्याच जॉर्जपाटा गावी ४१ माणसेच उरली आहेत. गावागावातून फिरताना मिळणाऱ्या या आकडेवारीतून सरकारी आकड्याची धादात असत्यता उघडी पडते.

संगमेश्वरम् हे गाव समुद्रकिनाऱ्याच्या अगदी जवळ. त्यामुळे सागरी लाटा अन् वादळाच्या प्रखर तडाख्यात सापडलेले. या गावापर्यंत जाण्याचा सर्व रस्ता धुतला गेलाय. खडी-विटा टाकून जवानानी कच्चा रस्ता केलाय. गावापर्यंत जाण्यासाठी ७–८ मैल चालावे लागते. रस्त्याच्या दोन्ही बाजूना समुद्राचे पाणी दूरवर आले आहे रस्त्यावरही मिठाचे कण चमकतात. वादळाबरोबरच या गावावर वीजही पडली. तिचा परिणाम म्हणून गावात प्रचंड खड्डे पडलेले. गावात घरे अस्तित्वातच नाहीत. केवळ शंकराचे एक मदिर उरले आहे. या मदिरावर चढून काही लोकांनी प्राण वाचविले. १५०० पैकी केवळ

२५–३० जण जिवंत राहिले आहेत. अजून-पर्यंत कसलीही मदत येथे पोचलेली नाही. खेडुतानी १३–१४ दिवस केवळ ताडगोळे खाऊन काढले. कुत्री आणि माणसे शून्य नजरेने हिंडताहेत. गावातली प्रेत लाटाबरोबर वाहून गेली. आम्ही येथून परत जाताना गावाकडे येणारी जिल्हाधिकाऱ्यांची गाडी पाहिली; पण ती अर्ध्या वाटेवरूनच परत गेली. सध्या-काळच्या वेळेला काही गावातले लोक बाहेरून अन्न वगैरे घेऊन गावाकडे परतत होते.

संगमेश्वरम्‌प्रमाणेच बसवडपालम्, गणेश-वरम्, कलगडदिवी, गुल्लापालम् या किनाऱ्यानजीकच्या गावांत वादळ होऊन १५ दिवस झाले तरी कसलीही मदत पोच-लेली नाही. भावदेवरपल्ली वा नागायलका-सारख्या मोक्याच्या जागी सर्व मदतीचे केंद्रीकरण झाले आहे.

कोडूरजवळच्या ओल्यापलम् गावी ऐन वादळात एक घृणास्पद प्रकार घडला सर्व खेडं उध्वस्त झालेलं. केवळ एक गावातलं मंदिर मात्र टिकून होतं. सहाजिकच वादळात गावकरी आश्रयाला तेथे गेले; परंतु मानवी स्वार्थाच्या, उच्च-नीचतेच्या मर्यादा या आपत्तीतही कोसळल्या नाहीत. या देवळात हरिजनांना प्रवेश चक्क नाकारण्यात आला. स्पृश्यास्पृश्यतेच्या भोंगळ समजूती या संकटा-तही दूर झाल्या नाहीत. याहून मानवतेचा अवमान तो काय?

उनापल्ली या गावी प्रेत गाडणाऱ्या खाण-कामगारांना एक हृदयद्रावक दृश्य दिसले. एका घरात नवरा, बायको व मुलगा अशा तिघाचाही एकाच पलंगावर अंत झाला होता. उल्लीपलम्‌चा एक कोळी माझ्या मित्राशी बोलताना म्हणाला, 'मुबईतल्या आमच्या बाधवानी तुम्हाला येथे पाठवल, त्याबद्दल धन्यवाद. त्याच्यावर असे संकट कदापि न येवो!'

चोडावरम् हे गावही सपूर्णतः उद्ध्वस्त झालेले. आम्ही गेलो तेव्हा जनता पक्ष, उजव्या कम्युनिस्ट पक्षाच्या गाड्या अन्न-धान्य, कापड वितरण करीत होत्या. एका पडलेल्या घराच्या जागेवर गाय आणि म्हैस मरून पडली होती. खाण-कामगार ती विदीर्ण प्रेतं तिकडेच पुरण्याच्या तयारीत होते. तिथल्या खेडुताने त्याना अडवले, 'ही माझ्या घराची जमीन आहे. येथे मढी पुरायची नाहीत.' त्याला समजविण्याचा सर्वांनी प्रयत्न केला, पण तो काही बधेना. अखेर त्याला तिथून हुसकावून लावावे लागले. गावकऱ्यांच्या भावना नाइलाजाने दुखावण्याचे असे प्रसग मनाला टोचत राहतात.

तीन नोव्हेंबरला कृष्णा नदीचा काठ गजबजलेला. तेरावा दिवस. सर्वांची रडारड चाललेली. बायकासकट सर्वांची मुंडन करून घेण्यात येत होती. एवढ्या गजबजाटात ब्राह्मण तेराव्याचे विधी उरकून घेत होते. एका बाजूला मृताच्या आठवणीचे अश्रू आणि दुसरीकडे विधीचा होम असे विचित्र दृश्य. आम्हाला मिळालेल्या प्रेताचे नातेवाईकही यात असतील का? एक वेडा विचार मनात डोकावला.

कोडूरजवळील चितकोला, मंदपाकला या गावी प्रेत पडलेली असल्याचे कळले. दुसऱ्या दिवशी तेथे जाण्याचे ठरविले. सपूर्ण साहित्यानिशी मदपाकला येथे गेलो. एकाच ठिकाणी वीस प्रेते जाळली. जवळ रॉकेल-डाबराचे मिश्रण असल्याने जाळण्यास त्रास पडला नाही. ही सर्व प्रेते राज्य पोलिसानी अगोदर अर्धवट जाळलेली होती. अशी अर्धवट जळलेली प्रेते, सागाडे रस्तोरस्ती दिसतात. कित्येक वेळा पुरलेल्या प्रेतावर टाकलेले बांबू काढल्याने ते प्रेत उचकटून वर येते. मग पुन्हा ते पुरण्याचा किंवा जाळण्याचा उद्योग.

या भागात मुख्य धोका दूषित पाण्याचा आहे. या खराब पाण्यात आजही खेडूत आंघोळी करतात. त्यात कपडे-भाडी धुतात. त्यामुळे रोगराई वाढण्याचा संभव येथे काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांकडे ठिक-ठिकाच्या पाण्यात टाकण्यासाठी ब्लीचिंग पावडर देण्यात आली आहे. वैद्यकीय मदत त्वरित पोचल्याने रोगराई फारशी नाही. हगवण, गॅस्ट्रो हे सर्वसाधारण आजार. गुंटूर व कृष्णा जिल्ह्यात आजवर कॉलऱ्याचे केवळ दोनच रोगी मिळाले. आपल्या मदती-साठी ठिकठिकाणचे डॉक्टर आले हीच गोष्ट खेडुताना फार मोठा दिलासा देते. आजा-राच्या बहुसख्य केसेस मानसशास्त्रीय आहेत. एका दृष्टीने डॉक्टराचे काम आता संपलेले आहे. आता गरज आहे ती स्वयसेवकाची. प्रेतं उचलण्यासाठी, खेड्यात झोपड्या बाधायला मदत करायला आणि अन्न व कपडे याचे योग्य वाटप करण्यासाठी

## विविध संघटनांचा मदतीचा हात

आंध्रमधील वादळाचे वृत्त जगभर पसरले आणि अनेक सघटनानी मदतीचा हात पुढे केला. त्यापैकी काही सघटनांचे कार्यकर्ते खरोखरच तन-मन-धन वाहून काम करताहेत, तर काही सघटना 'तापल्या तव्यावर पोळी भाजण्याच्या' वृत्तीने केवळ स्वतःचा स्वार्थ आणि प्रसिद्धी साधत आहेत.

आंध्रच्या वादळग्रस्त भागात सर्वांत प्रथम म्हणजे २० नोव्हेंबरला पोचले ते नक्षलवादी. स्वतःच्या कर्मभूमीत ही तत्परता अपेक्षितच होती; परंतु सरकारी नोकरशाही एवढी कृतघ्न की या परिस्थितीतही त्यानी उघडपणे काम करणाऱ्या श्रीनिवास राव या नक्षलवादी नेत्याला पकडण्याचा प्रयत्न केला. साहजिकच सर्व नक्षलवादी भूमिगत झाले. वरंगळ, खमामसारखी कार्यक्षेत्रे जवळ अस-ताना पोलिसाच्या हातावर तुरी देणे त्याना फारसे कठीण गेले नाही; परतु त्यानी काम थाबविले नाही. आजही हे लोक भूमिगत राहून काम करताहेत. दिनाक २३ नोव्हेंबरला आनदमार्गचे कार्यकर्ते येथे पोहोचले. एका हातात मशाल, दुसऱ्या हातात इंधनाचा डबा, भगवी कफनी अशा वेषात हे लोक प्रेतं जाळतात. भावदेवरपल्ली येथे याचा तळ आहे. रा. स्व. सघाने दोन गावापुरते आपले कार्यक्षेत्र आखले आहे. तेथे ते सर्व प्रकारची कामे करतात.

सर्वांत उल्लेखनीय गोष्ट म्हणजे राज-महेंद्री तुरुंगातले कैदी आणि खाण-कामगार. प्रेतं जाळण्यापूर्वी हे कैदी मृताच्या अंगावरचे दागिने काढून घेतात व ते जिल्हाधिकाऱ्यांच्या निधीत जमा करतात. माणूस मूलतः गुन्हेगार नसतो, परिस्थिती त्याला तसे करते हे पुन्हा

## …….'त्यांच्यावर असं संकट कधीही न येवो!'

एकदा पटले. हैद्राबादमधले खाणकामगार वादळाचे वृत्त ऐकून उत्स्फूर्तपणे आपला एक दिवसाचा पगार निधीसाठी देतात आणि सर्व साहित्यानिशी वादळग्रस्त क्षेत्रात जाऊन प्रेतं गाडण्याचं काम करतात, ही गोष्ट निश्चितच महत्त्वाची.

याशिवाय राष्ट्रसेवा दल, सी. पी. एम्., सी. पी आय्. चेही कार्यकर्ते आहेत. त्यांचे संख्याबळ कमी आहे; पण तेही पूर्ण शक्तिनिशी काम करताहेत.

रेडक्रॉसचे लोक मात्र एक कार्यालय थाटण्याव्यतिरिक्त काहीच करीत नाहीत. मिशनऱ्यांनी गावकऱ्यांना घरे बांधून देण्याचे काम हाती घेतलंय. स्वतः मदर थेरेसा जातीने सर्व कामात लक्ष घालताहेत.

कासा, रिलीफ कमिटी, राष्ट्रीय सेवा योजनेमधील मुलेही काम करताहेत.

जनता पक्षाने मात्र अपेक्षाभंग केलाय. 'जनता'चे कार्यकर्ते प्रत्यक्ष काही करताना फारच तुरळक दिसतात. ट्रकमधून गावा-गावातून कपडे, धान्य वाटण्याचे काम मात्र ते करताहेत. काँग्रेस कार्यकर्ते अजिबातच दिसत नाहीत. अर्थात त्यांच्याकडून ती अपेक्षाच नव्हती. सरकारी यंत्रणा म्हणजे काँग्रेसी यंत्रणा, असे जर समीकरण असेल तर गोष्ट वेगळी. स्वतः शिक्षणमंत्री कृष्णराव यांचे सर्व कुटुंब वादळात सापडले. ते स्वतः अवनिगड्डा येथून सर्व मदतकार्यावर लक्ष ठेवताहेत.

प्रभाकरजी हे सर्वोदयी कार्यकर्ते आपल्या मोठ्या लव्याजम्यासह अवनिगड्डयात ठाण मांडून आहेत प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांनी 'शवसेने'ची स्थापना केली आहे. तेथील सर्व वास्तव्यात या शवसेनेचा एकही कार्यकर्ता आम्ही पाहिला नाही. येत्या दोन-तीन आठवड्यात पुनर्वसनाचे दीर्घकालीन काम सुरू होईल. त्या अगोदर हैद्राबाद येथे काही कार्यकर्त्यांचे शिबीर होणार आहे. या प्रभाकरजींची पुनर्वसनाची एक योजना आहे. प्रत्येक गावामध्ये एक बैठी इमारत बांधायची. तेथे पोस्टापासून क्रीडाघरापर्यंत सर्व गोष्टी असतील. त्या भोवताली १०० घरांचे गाव वसलेले असेल. या योजनेनुसार प्रत्येक गावाला अदाजे ७५००० रु. खर्च येणार आहे. योजना आदर्श आहे; पण खर्च, परिस्थिती आणि श्रम यांचा विचार करता प्रत्यक्षात येणे कठीण आहे. एखादी योजना वास्तवाचा विचार न करता आखायची आणि मग अपयश आले म्हणून निराश व्हायचे, हा सर्वोदयी खाक्या येथेही दिसतो.

मदतकार्यात काही प्रमाणात राज्यपोलीसही आहेत; परंतु इतर कार्यकर्त्यांशी ते सहकार्य तर करीत नाहीतच, शिवाय त्यांना इंधनाची वगैरे गरज भासली तर तीही देत नाहीत. नियमावर बोट ठेवून इतरांचे काम कठीण करताना मात्र ते दिसतात. लष्कराचे काही जवान येथे आहेत. त्यांची कार्यतत्परता वाखाणण्याजोगी आहे. विहीर साफ करणे, घरबांधणीला मदत करणे, पुनर्वसनासाठी ते इतरांना सर्व प्रकारे सहकार्य देतात. राज्य व केंद्र शासनाचे भाडण न होता जर मोठ्या प्रमाणावर लष्कराने काम सुरू केले असते तर पुनर्वसनाच्या कामाला वेग आला असता.

याशिवाय काही श्रीमंत लोक कपडे, भाडी यांचे वाटप करताहेत; परंतु अत्यंत अव्यवस्थितपणे, गबाळेपणाने, त्यांच्या अशा उपकाराच्या वृत्तीमुळे लोकांमध्ये भिकारी वृत्ती किंवा चोरीची वृत्ती येण्याची शक्यता जास्त. कारण अशा प्रकारच्या वाटपामुळे काही जणांना अधिक मिळते, तर काहींना मिळतच नाही. त्यामुळे प्रसंगी खेडुतांमध्ये भांडणेही होतात.

## भ्रष्टाचाराची लागण

या सर्व मदतकार्यात कोणत्याही प्रकारची शिस्त नाही. प्रत्येक पक्ष स्वतःला वाटेल तसे मदतकार्य करतो. सरकारची तर तिसरीच दिशा! मग या सर्व कार्यात भ्रष्टाचार शिरला तर नवल वाटू नये. जर्मनीहून पाठविण्यात आलेली तीन लाखांची दुधाची भुकटी मधल्यामध्येच गायब झाल्याचे वृत्त आहे. भावदेवरपल्लीसारख्या गावात ( हा मंत्र्याचा मतदारसंघ आहे!) प्रत्येक खेडुताकडून १०० रु. वर सही घेऊन त्यांना केवळ ७० रु. मदत म्हणून देण्यात येतात. गावामध्ये रोज देण्यासाठी असलेला शिधा फक्त एक दिवसाआड वाटला जातो. बाकीचा बाहेर बाजारात नेऊन विकला जातो. कपड्याचे योग्य वाटप न झाल्याने अधिक कपडे मिळालेल्या गावकऱ्यांनी त्यांची विक्री सुरू केली आहे. सरकारी गाड्यांच्या पेट्रोलमध्ये, ड्रायव्हर्सना देण्यात येणाऱ्या पैशात होणारी हातचलाखी हे एक उघड गुपित आहे!

या सर्व गोष्टींमुळे महागाई वाढण्यास मदत झाली आहे. सध्या येथे मिठाचा भाव ३॥ रु. किलोवर गेला आहे.

मदतकार्यासाठी आलेल्या डॉक्टरांचाही यात हात असावा, असा संशय माझ्याजवळ एकाने बोलून दाखविला. बाहेरून येणारी महागातली महाग औषधे हे डॉक्टर स्वतःच्या खाजगी वापरासाठीही नेतात असे ही व्यक्ती म्हणाली.

आंध्रच्या वादळग्रस्त भागांना हळूहळू एक 'पिकनिक पॉइंट'चे स्वरूप येऊ लागले आहे. वादळ, दुष्काळ, अशा घटना घडल्या की तेथील परिस्थितीत जाऊन जायचे, सहानुभूतीचे चार शब्द उच्चारायचे ही आजची फॅशन आहे! ४ तारखेला रविवारी मंदपाकला येथे नेमके हेच दृश्य होते. नाकावर रुमाल धरून, डोळ्यांना गॉगल लावून असे अनेक जण स्कूटर, मोटारीतून धूळ उडवीत आले अन् गेले. वादळ-दुष्काळासारख्या गंभीर गोष्टीही आम्ही Show piece बनवणार आहोत काय?

येथून परतताना एक गमतशीर घटना आम्हाला समजली. जवानांबरोबर काम करताना एका कार्यकर्त्याच्या पायाला लागले. तेथूनच जाणाऱ्या एका डॉक्टराकडे औषध मागितले. त्याने उत्तर दिले, 'मी आता औषधे पॅक केली आहेत!' अन् त्याने वरच असलेली डोळ्याची ट्यूब पायाला लावायला दिली. शाब्बास रे डॉक्टर!

## पक्षीय राजकारण

आंध्रमधील वादळ ही एक राष्ट्रीय आपत्ती आहे. या प्रसंगी देशातल्या सर्व राजकीय पक्षांकडून मानव्याचा दृष्टिकोण स्वीकारला जाण्याची अपेक्षा होती. अशा प्रसंगी जनता व काँग्रेस या दोन्ही प्रमुख पक्षांनी जे राजकारणी डावपेच लढवले, त्यामुळे त्यांची पात्रता जनतेला कळली. एका बाजूला लोकाना अन्नाची भ्रांत पडली होती आणि दुसरीकडे राजकीय पक्ष स्वार्थांध बनले होते. स्वार्थांधतेपायी येथील वादळग्रस्तांचे मात्र हाल झाले आहेत.

आंध्रमधला जनता पक्ष अत्यंत कमजोर आहे. अजूनही तो पूर्णांशाने एकवटलेला नाही. सर्वत्र घटक पक्षाचे गट वेगवेगळे काम करतात. अशा परिस्थितीत जनता पक्ष

विधानसभा निवडणुका जिंकणे अशक्यच होते. वादळ झाले तेव्हा मुख्य मंत्री वेंगलराव दिल्लीत होते. त्यांनी लष्कराला बोलावले नाही. राज्य-पोलीस, सरकारी यंत्रणा कार्यक्षम नाही. पुन्हा वादळाची सत्य परिस्थिती दडपण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वादळग्रस्तांच्या हाल-अपेष्टांचे सर्व शिव्या-शाप राज्य-सरकारला बसताहेत. अशा परिस्थितीत पाच मंत्र्यांनी राजीनामे दिले. शिक्षणमंत्री कृष्ण राव यांचा राजीनामा न स्वीकारता त्यांना दोन खाती अधिक दिली गेली. हा माणूस रा. स्व. संघाचा पाठीराखा आहे. 'संघाच्या वादळ-सहाय्य-कार्याला राज्यात एवढी प्रसिद्धी मिळण्याचे तेही एक कारण आहे.' असे एका जनता-नेत्याने माझ्याकडे बोलून दाखविले. हाच नेता पुढे म्हणाला, 'जर वादळ झाले नसते तर जनता पक्ष अजून २५ वर्ष तरी सत्तेवर येणं अशक्य होतं. वेंगल रावने जर प्रथमच लष्कर बोलावले असते तरी सर्व श्रेय त्याला मिळाले असते. आता मात्र निवडणुकीतली 'जनता'ची संधी जास्त आहे!'

वेंगल राव हा माणूस अत्यंत ढोंगी. त्याने वादळग्रस्त भागाचा प्रत्यक्ष दौरा केल्याचे वृत्त आले आहे; परंतु वृत्तपत्रांमध्ये दौऱ्यामधील गावांची जी नावे आली आहेत तेथील गावकरी, कोणी दौऱ्यासाठी आलेच नाही असे सांगतात. वेंगल रावच्या या ढोंगीपणावर 'लिंक' या नियतकालिकाच्या छोट्याशा चुकीमुळे प्रकाश पडला आहे. या नियतकालिकाच्या ४ डिसेंबरच्या अंकाच्या मुखपृष्ठावर वेंगल रावचा वादळग्रस्त भागातल्या दौऱ्याचा फोटो छापला आहे; परंतु चित्रकाराच्या चुकीपायी वेंगल रावचा वेगळाच फोटो वादळग्रस्तभागाच्या फोटोवर चक्क चिकटवल्याचे ध्यानी येते. जर मुख्य मंत्र्यांनी खरोखर दौरा केला असेल तर असा खोटा फोटो का छापावा? त्यामुळे या दौऱ्याच्या सत्यतेबद्दल शंका येते.

'जनता' नेते कामापेक्षा अधिक प्रसिद्धीच्या मागे दिसतात. दिनांक २३–२४ नोव्हेंबरला सर्व नेते राष्ट्रपतींच्या बरोबर होते. त्यानंतर २८–२९ ला चंद्रशेखर व ३० ला पंतप्रधानांबरोबर होते. प्रत्यक्ष लोकांमध्ये मिसळून काम करण्याचा प्रयत्न कोणत्याही नेत्यांनी केला नाही. जे. वैनारायण गुंठे या विधानपरिषदेतल्या जनता-नेत्याने तर पंधरा दिवसांत काहीही काम झालेले नाही, प्रेतं तशीच पडली आहेत असे उत्तर अगदी बिनदिक्कतपणे मला दिले. राजकीय स्वार्थासाठी जनतेची अशी दिशाभूल करणे जनता-नेत्यांना शोभत नाही.

तेव्हा असे हे आंध्रचे वादळ आणि त्याचे मानवी–अमानवी पडसाद. साधारण ३०० चौ. कि. मी. चा प्रदेश सागरी लाटांनी व्यापला होता. भग्न असा हा आजचा आंध्रचा परिसर आहे. खाली धरती अन् वरती आकाश, अशी आज या खेडुतांची स्थिती आहे. डोळ्यांत साठवून न घेता येण्याइतकी ही भग्नता असताना, मी पाहिले तेच जग असे म्हणण्यात काय अर्थ? मदतकार्य अधिक जोमाने, शिस्तीने मात्र चालायला हवे. सरकार, इतर पक्षांनी नव्या उत्साहाने झटायला हवे तरच पुनर्वसनाचे काम सुलभ होईल.

मुंबईहून आंध्रला जायला निघतानाच टॅक्सीवाला म्हणाला होता, 'साहेब, माणूस चंद्रावर गेला हे खरे का हो?'

'का रे बाबा?'

'जर तो चंद्रावर गेला तर मग त्याला वादळ कसे आवरता येत नाही? निसर्गाच्या शक्तीवर तो लगाम कसा घालू शकत नाही?'

माझ्या बुद्धिवादी मनाने त्या वेळेला उत्तर देण्याचा प्रयत्न केला होता; पण हा त्याचा प्रश्न मला आंध्रभर अन् आताही सतावतो आहे. आंध्रमधले वादळ ही विज्ञानाची विषण्णता आहे. निसर्गाचे हे हे आव्हान जर विज्ञान स्वीकारणार नसेल तर मानवी प्रगती वांझ ठरेल. मग अशी अनेक वादळे येत राहतील अन् अनेक मानवी जीवही गवताप्रमाणे उडून जातील...

□





आपल्या लहानग्याला डेन-टॉनिक वेळीच दिल्याने दात येते वेळी होणाऱ्या त्रासापासून [illegible] आराम मिळेल व दात सुलभतेने येतील. [illegible] ठेवा. [illegible] डेन-टॉनिक द्या.

होमिओचे
डैन-टॉनिक

होमिओ लॅबोरेटरीज्
[illegible] शेजारी, [illegible], मुंबई-४

कथा

# ग्रीष्माच्या झळा

सारं ऐकून अलकाला भाबावल्यासारखं झालं. काय करावं, काय बोलाव, तिला समजत नव्हतं. ऐकताना तिचं सारं अंग शहारलं. क्षणभर वाटलं, मनोहरपासून दूर व्हावं, लांब व्हावं, कुठल्या कुठं दूर पळून जावं, अशी दाट इच्छा तिच्या मनात उचंबळून आली.

डॉ. श्यामकांत कुलकर्णी

चकाकणाऱ्या डांबरी रस्त्यावर दुपारी पाघळलेल्या डांबराच नवीन पॉलिश चढलं होत. त्यावर नजर ठरत नव्हती. तिथे मृगजळाच्या लाटा स्वैर संचार करीत होत्या. त्यावरून वाहात येणाऱ्या गरम हवेच्या झळा एखाद्या प्रचंड भट्टीच्या उच्छ्वासासारख्या वाटत होत्या. त्या शरीराला जागोजागी चटके देत होत्या. डोळे उघडे ठेवण दुरापास्त होत होतं. बंगल्याभोवतालच्या अरुंद बागा-बागांतून जमिनीला पडलेल्या भेगा दिवसेंदिवस रुंदावत होत्या.

ह्या उन्हाळा, ह्या ग्रीष्म ऋतू प्रत्येकाला अस्वस्थ करीत होता. पाण्याकरिता तगमग होत होती. अशा हवेत रोजची काम पार पाडणसुद्धा अवघड. मानेवर धोंडा ठेवल्याप्रमाणे वाटणारी. अस्वस्थ चित्ताने मनोहर डॉक्टराच्या ऑफिसकडे चालला होता. डॉक्टरांनी त्याला लवकर बोलावल होत. त्याची नेहमीची कन्सल्टेशनची वेळ होण्यापूर्वी ते आज रिपोर्ट देणार होते. तो घेऊन डॉ. वाबळयांना दाखवायचा होता. वाबळयाच्या दवाखान्यात त्याची आई परस्पर येणार होती. काय रिपोर्ट असणार होता? त्याला कुतूहल होतं. भलत-सलतं नसल म्हणजे मिळवलं, तो मनात म्हणत होता. एकीकडे डाव्या कानावरून हात फिरवत होता. तिथे किंचित ड्रेसिंग होते. कान पहिले दोन दिवस ठणकत होता. आता वेदना नव्हत्या, दुखत नव्हत, खुपत नव्हतं. कदाचित आज डॉक्टर ड्रेसिंग काढतील. तसा मनोहर आजारी नव्हता. त्याला काही झाल नव्हत. साधं पडसं, डोकेदुखी म्हणून तो नेहमीसारखा डॉ. वाबळयांकडे गेला होता. त्यानी तपासलं. औषध दिली; पण त्याच्या लक्षात आलं, दुसऱ्या दिवशी डॉ. वाबळयानी न राहवून त्याला विचारलं,

'तुला आणखी काही त्रास होतोय का? हाता-पायांना मुंग्या येतात का? गरम भांड्याला हात लावलेलं समजत का? कुठे पांढरे, लाल डाग पडलेत का? पोटावर, छातीवर, पाठीवर?'

त्याला यातलं काहीही होत नव्हत. डॉक्टराच्या प्रश्नांचा अर्थच त्याला समजत नव्हता. मग डॉ. वाबळयांनी त्याला कपडे काढायला सांगितलं. पुन्हा पुन्हा तपासलं. प्रश्न विचारले. कापसाचा स्पर्श, टाचणीनं टोचणं, पाण्यानं भरलेल्या काचेच्या नळया.

'गरम की थंड? हो की नाही? टोचतं का? कुठं? बोट वर करायच, टोचलं की!'

तो उत्तरं देत होता.

अखेरीअखेरीस डॉक्टर वाबळयांचा चेहरा गंभीर झाला. त्यानी त्याला बाहेर वेटिंग रूममध्ये बसवल ते आईला बोलावून प्रश्न विचारीत राहिले.

'घरात दुसऱ्या कुणाला त्रास आहे का काही? अंगावर, त्वचेवर डाग आहेत का कुणाच्या? हाताची बोटं कुणाची भाजलीत का?'

आईही बुचकळयात पडली होती.सगळया प्रश्नांना नकारार्थी उत्तर. कुणाला काहीच होत नाही, तर सांगणार काय?

अखेरीस डॉक्टरानी आईला सांगितलं, 'स्पेशालिस्ट डॉक्टरांकडे जा. मी पत्र देतो· ते करतील ती तपासणी करून रिपोर्ट आणा.'

'पण डॉक्टर, मनोहरला काय होतंय? कसली शका येतेय?'

'आज काहीच सांगत नाही. रिपोर्ट आणा. मग सागतो. माझी शका खोटी ठरली तर बरच झाल.'

त्यांनी दिलेल बंद पाकीट घेऊन दोघे स्पेशालिस्ट डॉक्टराकडे गेले. तिथं पुन्हा त्याच तपासण्या, पुन्हा प्रश्नोत्तरं. मनोहर वैतागून गेला. एवढी उलट तपासणी कशासाठी? त्यानं विचारलंही.

'डॉक्टर, काय करायचं ते पटकन करा; पण ही उलट तपासणी?'

'प्रत्येकाला कारण आहे. मग सांगतोच. मलाही वेळ नाहीय. चल, चढ त्या टेबलावर; पण एक साग, ही कानांची पाळी किंचित जाड वाटतात का तुला?' ते मग आईकडे वळले, 'तुम्हाला तसं वाटतं का?'

'हो, वाटतं खर.' आईच उत्तरली.

'कधीपासून जाड आहेत?'

'कदाचित सहा महिने; पण छे. महिनापधरा दिवसच. तुम्ही म्हणेपर्यंत माझ्या लक्षातही आल नव्हतं.'

डॉक्टर न बोलता कामाला लागले. मनोहरने डोळे मिटून घेतले. डॉक्टराच्या हातात छोटसं ब्लेड होतं. ऑपरेशनच्या वेळी वापरतात तसल. त्याच काम दहा-एक मिनिटात उरकल. त्यानी रिपोर्टकरिता चार दिवसांनी बोलावल.

मनोहर तो रिपोर्ट घ्यायला आता चालला होता. त्याला पाहताच स्पेशालिस्टनी विचारल, 'एकटेच आलात? तुमच्या आई नाही आल्या?'

डॉक्टरांच्या चेहऱ्यावर किंचित निराशा होती. त्यांना आईला काही सागायचं होतं वाटतं?

'मला सांगा. मी तिला निरोप सांगेन!'

'ह्या रिपोर्ट डॉ. वाबळयाना द्यायचा.. त्यांना मी फोनवर सागेनच. आईला सवड असेल तेव्हा मला भेटायला सागा!'

त्यानी बद पाकीट मनोहरच्या हातात ठेवले. डॉक्टर त्याला अधिक काही सागायला तयार नव्हते. पाकीट घेऊन मनोहर डॉ. वाबळयाकडे आला. तिथे आई होती.

डॉ. वाबळयानी पाकीट उघडले. रिपोर्ट

वाचला. पाच एक मिनिटे ते स्तब्ध, आढ्याकडे पाहात. 'मनोहर अन् त्याची आई; दोघाचे डोळे त्यांच्या चेहेऱ्यावर खिळलेले. अखेर आईनंच विचारलं त्याना समाधीतून जागं केल.

'डॉक्टर ... !'

'हू ! ...' डॉ. वाबळे पुन्हा थबकले. मग शांत आवाजात बोलू लागले. 'माझा अंदाज बरोबर ठरला; पण काळजीचे कारण नाही !'

ते मनोहरकडे वळले. 'तुम्ही जरा बाहेर बसा. मी आईशी बोलतो. मग तुम्हाला आत बोलावतो !'

एवढी गुप्तता कशाला ? मनोहर मनात म्हणत होता. कॅन्सर, ल्युकिमिया कशालाही मी डरणार नाही काय असेल ते मला सागा; पण तो निमूटपणे बाहेर गेला.

'रिपोर्ट म्हणतो'... मनोहर बाहेर गेला. अन् दार खटकन बद झाले तसे डॉक्टर किंचित उत्तेजित स्वरात सांगू लागले,

'त्याला लेप्रसी–कुष्ठरोग झालाय्. तुम्ही स्वतःला धक्का बसू देऊ नका ! सध्या या आजारात घाबरण्यासारखे काही नाही. दोन–तीन वर्षे औषधं घेतली की पूर्ण बरा होतो. मनोहरलाही याची कल्पना द्यायला हवी म्हणजे त्याचं चागलं सहकार्य मिळेल त्याला मी मागाहून सागेन किंवा तुम्ही कल्पना द्या !'

मनोहरची आई पहिल्या वाक्यानच पुरती खचली. मस्तकावर विजेचा आघात झाल्यासारखी. तिच्या डोळ्यासमोर अंधारी आली अन मग काही काळान तिला नजरेसमोर रस्त्यावरचे भिकारी दिसायला लागले. सडलेले पाय, तुटलेली बोटे, चेहेऱ्यावर मोठाले व्रण, नाकाच्या जागी उरलेली भोके, वाहात्या जखमा ! तिचे काळीज थरथरले. स्वतःच्या कोवळ्या पोरावर असल्या आजाराचा घाला ! मेंदू बधीर, सुन्न झाला; पण ती धीराची बाई होती. गेली पचवीस वर्षे तिने ससाराची धुरा स्वतःच्या खाद्यावर वाहिली होती. शामलाबाईंनी–मनोहरच्या आईने–तिथेच दुसऱ्या क्षणी निर्णय घेतला. ही गोष्ट गुप्त ठेवायला हवी. मोजक्या माणसांत ठेवायला हवी. मनोहर, त्या स्वतः अन् त्याचे वडील. बस्स. इतराना कळून देऊन चालणार नाही. आताशी कुठं बाविसावं वर्ष लागलेला मनोहर बी. कॉम. च्या शेवटच्या वर्षाला असलेला. त्याचं अजून सारं व्हायचय. उभं आयुष्य पुढ आहे पुन्हा बाकीची भावडं, मुली, त्याची लग्न.

'डॉक्टर, तुम्हीच सागा ! सांगाल ती, सागाल तशी औषधे घेऊ. तो औषधाला कंटाळा करणार नाही. काळजी काय घ्यायची, पथ्य काय करायच ते सागा !'

'आधी प्रथम घरातल्या इतराची तपासणी करायला हवी !'

घरात एक मोठा भाऊ दोन लहान बहिणी. श्यामलाबाईंनी तिघाना डॉक्टराकडे आणले. त्या तिघात दोष, विकृती नव्हती. आई–वडिलांना आजार नाही

'मग याला ससर्ग झाला कोठून ? याचा संसर्ग दीर्घ काळ असायला लागतो रुग्णाच्या अतिजवळ खूप दिवस, कित्येक महिने, वर्षे राहिल्याने हा रोग होतो !' डॉक्टर म्हणाले.

'मनोहर सहा महिन्यापूर्वी कुष्ठधामात महिनाभर स्वयसेवक म्हणून काम करायला गेला होता. तिथे संसर्ग झाला असेल का ?'

'महिनाभराचा सपर्क खरं म्हणजे पुरेसं स्पष्टीकरण नाही आणि तिथे असा काय संपर्क येणार ?'

'पण त्याला अस वाटतं !' श्यामलाबाईंनी सांगितल.

केव्हा तरी डॉक्टरांनी मनोहरला आजाराची कल्पना दिली होती मग याबद्दल पुन्हा पुन्हा प्रश्न विचारले होते

मनोहरला आईसारखे फारसे काही वाटले नव्हते. धक्का जवळ जवळ नाहीच.

'हात्तेच्या ! तिथं महिनाभर काम केल सार्वजनिक उठाठेव अगाशी आली; पण औषधं तर आहेत ना आजारावर ? कॅन्सरसारखं तर नाही ना ? मी औषधं घेईन !' तो आशावादी होता. त्याचा उत्साह पाहून श्यामलाबाईंनाच धीर आला; पण रात्री–अपरात्री तो झोपलेला असताना, त्याच्याकडे पाहून त्यांच्या पोटात तुटायचं. एवढ्या लहान वयात असा अघोरी आजार ! पुन्हा सार पोटात ठेवायच, कुणा-कुणाला कळू द्यायचे नाही, समजू द्यायचं नाही. शेजारी–पाजारी, कुणाला सशय येऊ द्यायचा नाही. अगदी मोठ्या भावाला अन् लहान बहिणीनाही समजू द्यायच नाही उगाच कर्णोपकर्णी गोष्ट व्हायची कळल तर शेजारी–पाजारी, नातलग, न बोलता घराला वाळीत टाकणार, सशयाने पाहणार, सगळ्याना टाळू पाहाणार. भाडीवाली, धुणीवाली साऱ्या बद होणार. हे सार ओझ, दडपण श्यामलाबाई वागवायच्या अन् त्याच्या जोडीला मनोहर. त्यातून त्याचं बिऱ्हाड म्हणजे दोन खोल्याचा चाळीतला ससार. गुपचुप सकाळी, दुपारी, रात्री मनोहर बेडरूमच्या कोपऱ्यात जाऊन गोळ्या घ्यायचा. कपाटात बाटली लपवून ठेवलेली. खिडकीत पाण्याचा तांब्या आणि फुलपात्र. लता नेहमी आवराआवर करताना तांब्या–भाडे जागच्यावर, स्वयपाकघरात नेऊन ठेवायची अन् श्यामलाबाई तिला रागवायच्या, 'खिडकीतच राहू दे. तिथेच ठेव !'

'आई, ह्या गोळ्या कसल्या ?' केव्हा तरी गोळ्याची बाटली प्रदीपने पाहिली अन् विचारले. बाटलीवर ना लेबल ना काही खूण.

'टॉनिकच्या आहेत. मनोहरकरता.'

'पण इतक्या ? आणि किती दिवस घेतोय तो ?'

'मला काय माहीत ? डॉक्टर सागतात–तो घेतो. मला काय त्यातलं कळतंय ?'

'अग आई, या दिवसात आपण इतकं अडाणी राहून कसं चालेल ? खडसावून डॉक्टरांना विचार, कसल्या गोळ्या ? कशाकरिता ? तुला जमत नसेल तर मनोहरला साग ! असल काय कामाचं ?' प्रदीपचं पांडित्य !

'अरे, सगळं विचारून झालय'

कितीदा तरी श्यामलाबाईंनी डॉक्टराना खोदून खोदून विचारलं.

'डॉक्टर, घरात इतरांना संसर्ग नाही ना व्हायचा ?'

'नाही. नाही !'

'मनोहरची ताट-वाटी वेगळी ठेवू का ? पण मग ते छपवणार कसे? त्याचा टॉवेल?'

'ताट-वाट्या नाही, तरी एरवीही आपण धुऊन, स्वच्छ करूनच वापरतो टॉवेल मात्र त्याचा त्याच्यापुरताच ठेवा. इतरानी वापरू नका. कुणाच्या फार जवळ, शारीरिक जवळीक नको लहान मुल लांब ठेवा. मुलाचा मुका घेणे वगैरे नको. नाही तरी तो आता मोठा मुलगा आहे. वेगळाच झोपत असणार?'

'हो !'

'आणि वाटलच तर सगळ्याच्याच ताट-

वाटघा मोलकरणीने धुऊन आणल्या म्हणजे गरम पाण्यात बुचकळून काढा. म्हणजे तुम्हाला शकेला जागा राहणार नाही !'

ती तीन वर्षं श्यामलाबाईंनी कमरेत वाकून, डोक्यावर मोठं ओझं घेऊन काढली. मनमोकळं बोलायचं ते फक्त डॉक्टर वाबळे यांच्याकडेच. त्यांचे यजमान, त्या सांगतील ते ऐकत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागत. सहकार्य देत. 'पण डॉक्टर बघताहेत सगळं. ठीक होईल.' या पलीकडे ते आपल्या डोक्याला ताप देत नसत. सारी काळजी, दक्षता, सगळा भार श्यामलाबाई वाहात होत्या. मनोहर फारसा बोलायचा नाही. त्याचा चेहेरा नेहेमीच शात, निर्विकार. कधी फार बोलणं नाही, हसणं नाही. तो अभ्यास मन लावून करी. बी. कॉम. तो प्रथम श्रेणीत पास झाला आणि पुढच्या वर्षी बँकेत नोकरीलाही लागला. 'निदान इथे तरी दैवाने कृपा केली.' श्यामलाबाईंना तेवढंच हायसं वाटलं.

□

तीन वर्षांच्या अखेरीला त्या कुटुंबाने काळावर मात केली. श्यामलाबाई आता पन्नाशीत आहेत. मनोहरच्या दुखण्याने त्या लवकर थकल्या. त्यांचे केस लवकर पांढरे झाले. चेहेरा सुरकुतला. कंबर वाकली ती वाकलीच! जरा जास्तच अन् अवेळी, पण तीन वर्षांनी केलेली मनोहरची स्कीन टेस्ट लागोपाठ दोनदा निगेटिव्ह आली डॉक्टरासकट सगळे आनदात बुडाले. गोळ्या घेणं बद झालं. ठरलेल्या दोन वर्षापेक्षा अधिक खबरदारी म्हणून सपूर्ण वर्षभर अधिक उपचार म्हणूनही गोळ्या घेऊन झाल्या. अखेर आता मनोहर खडखडीत बरा झाला, अस डॉ. वाबळ्यांनी सागितल. पॅथॉलॉजिस्टन सांगितलं, स्कीन स्पेशॉलिस्टनं सांगितलं. मुलावरचं सकट टळलं. श्यामलाबाईंना आकाश ठेंगणं झालं. स्वत.चं सुख कुठे ठेऊ, कुणाला सांगू, असं झालं; पण अर्थात आनदही लपवूनच ठेवायचा होता, चोरूनच साजरा करायचा होता. डॉक्टर, मनोहर अन् हे यांच्या पलीकडे ही वार्ता कुणाला सांगायची नव्हती. प्रदीप, लता, छाया यापैकी कुणाला संकट आले अन् गेले याचा पत्ता नव्हता. जोराचा झंझावात सुटला होता अन् शांत झाला होता, याची त्यांना चाहूलही नव्हती. दु:खाच्या ओझ्यासारखं हे आनंदाचं ओझंही शातावाईंना आपलं आपणच सांभाळायचं होतं; पण त्यांना एक रुखरुख मात्र अजूनही होती.

मनोहरचा चेहेरा तीन वर्षांपूर्वी जो दुर्मुखला तो अजून दुर्मुखलेलाच होता. मित्रांना टाळायची सवय त्याने लावून घेतली होती ती आता त्याच्या अंगवळणी पडली होती. ऑफिस सुटल की तो घरी यायचा. चहा घ्यायचा. एकटाच फिरायला जायचा. दोन-तीन तासांनी अधार पडल्यावर परतायचा

'मनोहर, कुठे गेला होतास? काय केलस ?', काहीही विचारलं तरी तो तुटक, तेवढ्यापुरतच बोलायचा. प्रदीप अन त्याच्यामधे तर कायमचीच दरी निर्माण झाली होती. श्यामलाबाईंना आता याचीच काळजी वाटे. या आजाराआधी हा किती हसायचा, बडबडायचा! लताची येता-जाता चेष्टा करायचा. छायाच्या गाण्याला नावे ठेवायचा. सगळ्या गोष्टीत उत्साहाने भाग घेई. सगळीकडे नेहेमी याचा पाय पुढे. उन्हाळ्यात आईस्क्रीम-पार्टी करायला हाच. हिवाळ्यात लोणावळा, कार्ल्याची ट्रीप आखायला हाच. चाळीच्या गणेशोत्सवात वर्गणी गोळा करायला हाच सगळ्यांच्या पुढे. पण आता...! याच्या साऱ्या आशा–आकांक्षा जणू करपून गेल्यात—हो मनात कुढत तर नाही ना? कदाचित.. लग्न कराव का? मग कदाचित सुधारेल नाही तरी आता मुली मनोहरला सागून येत असतात. नाही नाही तरी किती काळ म्हणणार ? मनोहरची बँकेतली परीक्षा झाली होती. नोकरी कायम होती. बढती मिळाली होती.

श्यामलाबाई डॉक्टरांकडे गेल्या. नेहमीप्रमाणे

'डॉक्टर, मनोहरचं लग्न करायला काही हरकत नाही ना ?'

'अजिबात नाही आता इतर निरोगी पुरुषात आणि त्याच्यात काहीच फरक नाहीय. चार लोकासारखं वैवाहिक आयुष्य त्यानं जगायला आमची काहीच हरकत नाही.' डॉक्टरांनी त्यांचं मत दिलं.

त्या वर्षी मनोहर चतुर्भुज झाला. अलका कुठल्याशा ऑफिसात नोकरी करीत होती. लग्नानंतरही तिची नोकरी चालूच होती. अलका दिसायला बऱ्यापैकी, दहाजणीत एक आहे. मनोहरच्या पसंतीची. श्यामलाबाईंच्या पसंतीची, निवडीची. वर्षभराने मनोहरला मुलगा झाला. प्रदीप अन् त्याची बायको दुसरीकडे राहायला गेलेत. मनोहर जुन्या जागेतच आई-वडिलांबरोबर राहतो. अलकेची आता इच्छा आहे 'आपण दोघेही मिळवते आहोत. ओनरशिप ब्लॉक घेऊन आपणही वेगळा ससार थाटावा. काय हरकत आहे ?'

'एवढी काय घाई आहे ?' मनोहरचं मिळमिळीत उत्तर असतं.

मनोहरचा मुलगाही आता वर्षाचा झालाय. मनोहरला फ्ल्यू झाला. गावात साथ आली तेव्हा डॉ. वाबळ्याचच औषध. त्याच दिवशी श्यामलाबाई आवर्जून डॉक्टरांना भेटायला आल्या.

'डॉक्टर, हा मनोहर अजून मधून मधून डोक्यात राख घालून घेतो. कधी कधी मला म्हणत राहतो, जुना आजार अजून कुठे तरी शरीरात शिल्लक असेल. या लहान बाळाला माझा संसर्ग व्हायचा. त्याला तो कधी हातही लावीत नाही.'

'आता आजार पुरता बरा झालाय. आता ससर्गाची भीती नाही; पण नाही तरी पुष्कळ मुलाना बापाचा लळा नसतोच. नाही घेतल त्यानं, तर बिघडल कुठे ? ती आईकडे नाही तर आजीकडेच असतात दिवसभर.'

'अजून त्याला भीति वाटत असते. या गोळ्यांचा दुष्परिणाम शरीरावर झाला असला तर ? त्याचे दुष्परिणाम काय काय होतात हो ? तो तीन वर्षे एकसारख्या गोळ्या घेत होता. तो म्हणतो, माझ्या शरीरात रक्तच तयार होत नाही. अशक्त वाटत. कशातही त्याला उत्साह नसतो आज-काल.'

'आपण गोळ्या बंद करूनही आता दोन-तीन वर्षे झालीत. तेव्हा दुष्परिणामांची शक्यता अजिबात नाही क्वचित गोळ्या सुरू असताना होऊ शकतो. तेव्हा तसा काही झाला नव्हता. आपण त्याच रक्तही किती तरी वेळा तपासलंय. हवं तर पुन्हा तपासू. अॅनिमिया वगैरे त्याला काहीही झालेलं नाही.' डॉक्टर म्हणाले.

'पण त्याची एकसारखी पिरपिर चालू असते. म्हणत राहतो, हा आजाराचा परिणाम. हा गोळ्यांचा परिणाम. माझ्यामागचं

शुक्लकाष्ठ चालूच आहे. तो आजारी होता तेव्हा खरंच अधिक शहाण्यासारखा वागला. आता सध्या नवीनच काढलंय. म्हणतो माझ्यात पुरुषत्वच राहिलेलं नाही. जोम उरला नाही.'

'पण वर्षभरात लग्नानंतर मुलगा झाला, हा पुरावा नाही का ?'

'पण तो वाद घालतो माझ्याशी. पुन्हा असला वाद, असलं बोलण त्याच्या बायकोच्या—अलकेच्या कानावर जाता उपयोगी नाही. तिला कसला संशय आलेला दिसत नाही, पण मधेच विचारते, 'कसलं बोलण चाललय एवढा वेळ ? एकटं एकटं आईशी कसलं हितगुज करता ? अन् मी आले की, लगेच गप्पा बंद का ?' अन् आता तर त्याने कहरच केलाय.' श्यामलाबाई थाबल्या.

डॉक्टर प्रश्नार्थक मुद्रेने पाहत राहिले.

'गेले कित्येक दिवस मनोहर अन् अलका वेगळेच झोपतात. हा तिच्याकडे जायलाच तयार नसतो. म्हणतो, 'मला नपुंसकत्व आलंय, या गोळया घेऊन घेऊन.'

डॉक्टरांचा चेहरा आता गंभीर बनला.

'तुम्ही त्यालाच एकदा माझ्याकडे पाठवा. मी त्याला विचारतो. समजूत घालतो. हा सगळा खुळेपणा आहे. मनाचे खेळ आहेत. नीट समजावले की, तो चागला वागू लागेल.'

श्यामलाबाई घरी परतल्या. त्यानी मनोहरला दुसऱ्या दिवशी डॉक्टर वावळघांकडे पाठवून दिले.

'मला माझ्या अंगात रक्तच नाही, असं वाटतय. बहुतेक त्या गोळयाचा परिणाम आहे हा. मी कुठे तरी वाचलं होत, त्या गोळयानी ॲनिमिया होऊ शकतो. हिमॉलिसिस-पेशीचा, तांबड्या पेशीचा शरीरात नाश होतो. कदाचित रक्त तयार होण्यावरही परिणाम होतो.' मनोहरने त्याना सागितलं.

'पण ते कुठे तरी दिसायला हवं ना ? तुला त्रास होईल. दम लागेल, फिक्कट दिसशील. निदान रक्तपरीक्षेत दिसेल. हे रिपोर्ट तू ठणठणीत आहेस, असं दाखवतात. रक्त चागलं आहे. काही व्हायचं असतं तर ते मागेच झालं असतं, औषधं सुरू होती तेव्हा. आता काहीच कारण नाही.' डॉक्टरांनी समजावायचा प्रयत्न केला; पण त्याला काही केल्या हे पटत नव्हतं. त्याचे मुद्दे तो पुढे मांडत होता.

'मला अंगात रक्त फिरतंय असं वाटतच नाही. विलक्षण थकवा वाटतो. कुणाशी बोलावसं वाटत नाही. कुठे बाहेर जावं असं वाटत नाही. ऑफिसातही मी प्रत्येकापासून लांबच राहतो. उगीच माझ्यामुळे कुणाला आजार व्हायला नको. शक्यतो संपर्क टाळतो. लांबूनच नमस्कार !'

'अरे, पण तू आता खडखडीत बरा झाला आहेस. बरा होऊन चांगली दोन वर्षं झालीत. ते सारं आता इतिहासजमा झालय.'

'पण मला बरं झाल्यासारखं वाटतच नाही डॉक्टर ! कुठं तरी, काही तरी चुकलंय. रिकरन्स तर नसेल ना ?'

'आपण दोनदा त्वचा तपासून घेतली. पॅथॉलॉजिस्ट कॉन्फिडटली सांगतात. तुझ्या मनात निष्कारण भीति घर करून बसलीय. ती भीति काढून टाक ! सारं माझ्यावर सोपव. तू निश्चित रहा !'

'आणि डॉक्टर, मला वाटतं, मी नपुसक झालोय. या औषधामुळे इच्छाच होत नाही. अलकाजवळ जाणं मला अशक्य होऊन बसलंय. मी शक्यतो तिलाही टाळू पहातोय. त्यामुळं तीही चिडते, असमाधानी दिसते. वेडीवाकडी उत्तरं देते. मी सहसा बोलत नाही. पण कधी-कधी आमची भाडणं होतात !' तो भडभडा ओकून टाकीत होता.

'तुला स्वत:शीच विचार करायची सवय लागलीय, त्याचे हे परिणाम ! तुला लग्न होऊन जेमतेम वर्ष होतय, तो मुलगा झालाच ना ! जननशक्तीवर काही परिणाम झाला असता तर हे कसं शक्य होतं ? चार-चौघांसारखं सगळया बाबतीत वागायला तुझ्यात काहीही कमीपणा नाही, आडकाठी नाही. मानेवर निष्कारण बसलेली ही भीति, हा न्यूनगंड काढून टाक ! अलकाला यातलं काही ठाऊक नाही ना ?'

'नाही. आम्ही कुणी काही सांगितलेलं नाही. कसं माहीत असणार ?'

'तू मानसशास्त्रज्ञाकडे जातोस का ? कदाचित त्यांचा सल्ला तुला उपयोगी पडेल. ही भीति जायला हवी !'

'सध्या तरी नको डॉक्टर, पुढे बघू ! तसं आता मला कशाचंच काही वाटत नसतं. त्यांच्याकडेही जाईन !'

त्यांची मुलाखत संपली. मनोहर घरी आला. संध्याकाळचे सहा वाजले होते. घरी अलका त्याचीच वाट पहात होती. तिने चहाचा कप आणला. पोह्याची बशी त्याच्या पुढयात ठेवली. कुणी सांगितले नाही तरी तो डॉक्टराकडे गेला असावा, हे तिनं तेव्हाच ओळखलं होत. हे तिच्या सवयीचं झाल होतं. कधी सासूबाई अन् मनोहर, कधी मनोहर एकटाच, तर कधी एकटया सासूबाईच ! सारखे डॉक्टराचे उबरठे झिजवित असतात, हे गेली अडीच वर्षं तिला चागल ठाऊक झाल होतं; पण समजलं नव्हत, का ? कोण आजारी आहे ? काय झालंय ? ती अधारात होती. तिने सगळयाना आडून-पाडून, नतर स्पष्ट विचारून पाहिलं होतं; पण कुणीच सरळ सांगत नसे. लता म्हणे, 'हे गेली पाच वर्षं डॉक्टरकडे असे जातात. मलाही माहीत नाही कशासाठी ते. पण दादा नेहेमी कसल्याशा गोळया घ्यायचा !'

श्यामलाबाई तर तिला रागावल्याच होत्या. नसता चौकसपणा कशाला म्हणून आधी तिला वाटले. आजार सासूबाईंचा असावा—कॅन्सरसारखा. पण तसं दिसलं नाही. लताच्या बोलण्यानतर तिला खात्री पटली. मनोहरसाठीच हे दोघे डॉक्टरकडे जातात; पण मग मला का नाही सागत ? चोरून चोरून का ? मी तरी त्यांची बायकोच आहे ना ? त्याची सुख-दु:ख माझीच नाहीत का ? नाही तरी सासूबाई किती दिवस पुरणार आहेत ? मलाच नको का ह्यानी अन् सासूबाईंनी विश्वासात घ्यायला ? कसला आजार झालाय ह्याना ? अलकानं मनोहरला एक—दोनदा छेडल होतं; पण तो उलट चिडलाच- 'काय धाड लागलीय मला ! दिसतय ना तुला स्वत:ला, मी चांगला धडधाकट आहे ते !' अलका बिचारी गप्प बसली; पण गेले वर्षभर ती पाहतेय, बाळालाही मनोहर सहसा घेत नाही. पापेही घेण नाही. त्याच्याशी खेळणं नाही. त्याच काही सुद्धा कोडकौतुक करणं नाही !'

'बाळाला कधी घेत नाहीत हे.' अलकाने श्यामलाबाईंनाच म्हटलं.

'अग, त्याला लहान मुलांचा कंटाळाच आहे लहानपणासून.' त्या उत्तरल्या होत्या.

'पण आपलं बाळ. पहिलं-वहिलं...' पण अलकाचे हे शब्द श्यामलाबाईंच्या चेहेऱ्याकडे

नजर जाताच ओठातल्या ओठातच राहिले होते. अन् आताशा तर आणखीनच कहर. मनोहर सरळ सरळ तिला टाळू पहात असे. फिरायला येत नसे. सिनेमाला नको म्हणे. रात्रीही दूरच. वाचतच बसायचा बराच वेळ. तिला गाढ झोप लागेपर्यंत. गेले कित्येक दिवस हे सुरू होतं. कसला आजार झालाय मनोहरला? मानसिक की काही तसला गुप्तरोग वगैरे? माझ्यापासून दडवायला हवा असा, पण मग...

गुप्तरोग कोणी आईलाही सागणार नाही. आता एकदा आपणच याचा सोक्ष-मोक्ष लावायला हवा. अलकाने मनाशीच ठरविलं होते. अखेर शेवटी, कदाचित आजच.

'आज अगदी कटाळा आलाय. फिरायला जाऊ या. चला. खूप खूप हिंडू. लाबवर जाऊ. फार दिवसात बाहेर गेलो नाही आपण. तसंच सिनेमाला जाऊ. बाहेरच जेऊ या!' अलका मनोहरला म्हणाली.

चहाचा घोट घेता घेता तो थबकला. तिच्याकडे पाहातच राहिला.

'आज एवढं काय आहे? मी कंटाळलोय. इथंच गप्पा मारू. बस इथे. ये!'

'अ हं. आज सिनेमा. नटराजला छानपैकी पिक्चर आहे.' अलका जरा थांबली, अन् अनपेक्षितपणे म्हणाली, 'आता कुठे डॉक्टरां-कडूनच आलात ना? काय म्हणाले ते? बरं आहे ना?'

ही विचरत्येय काय? हिला काय ठाऊक? कुणी सागितलं, की अदाजानेच? मनोहर दचकला. त्याच्या चेहेऱ्यावरचे बदल अलकाने टिपून घेतले.

'कुठचं काय? तुला कुणी सागितल, मी डॉक्टराकडे गेलो होतो म्हणून?'

'सागायला कशाला हव? तुम्ही नेहेमी जाता. काय होतय काय तुम्हाला?' अल-काने पुन्हा विचारलं.

'अरे ती म्हणतेय तर जाऊन या ना, कोपऱ्यापर्यंत.' आतून श्यामलाबाईंचा आवाज आला. त्या अलकाला म्हणाल्या, 'पुन्हा पुन्हा काय विचारीत बसतेस ग?'

आईने सागितलं तेव्हा मनोहर उठला; पण असलं फिरायला जाणं अलकाला नको होतं. तिला सगळं विसरून त्याला बरोबर घेऊन लांब दूर दूर जायच होत. इथे ह्या आठवणी, हे विचार घेऊन जायचे नव्हते. दोघे फिरा-यला गेले; पण लांबून लांबून चालत राहिले. नवख्यासारखे. नुकतीच ओळख झालेल्या बुजऱ्या युगुलासारखे. ती मनात खंतच करत राहिली. आईने सांगितलं, म्हणून हा आला. माझ्यासाठी नाही.

रात्री. त्या रात्री...

श्यामलाबाई आणि साऱ्याची बाहेर निजानीज झाली तेव्हा अलका पुन्हा मनोहर-कडे वळली. त्याने झोपेचं सोग केव्हाच घेतलं होतं.

'ए...' तिने हलकेच त्याला ढोसलं. त्याने तोंडावरून पाघरूण ओढलं.

'असं काय करतोस? सोंग घेतोस. मी तुला नकोशी झालेय.' ती रडवेली झाली. हुदका अस्फुटसा फुटत होता; पण मनोहर दूरच.

'मला झोप येतेय. तिथेच बरी आहेस तू!' बाळ बाहेर आजीजवळच झोपला होता.

'असं का छळता आहात? टाळता आहात. कसला आजार झालाय तुम्हाला?' ती पुन्हा विचारते.

मनोहरची झोप पार उडाली. मलाही बोलता येणार नाही का? विचारू हिला सुद्धा? बाळ कुणाचा म्हणून? मला होणं शक्यच नाही. मला नाही वाटत हा माझा. मला मूलच होणं नाही; पण हिला ते कसं सागणार? छे! गप्पच बसलेले बरं!

'पुन्हा पुन्हा डॉक्टरांकडे का जाता? अन् मागे गोळ्या कसल्या घेत होता? कसला आजार झालाय? आणि लपवून का ठेवता माझ्यापासून? कुठे बाहेरच्या नादाने... काही तसला आजाराचा प्रकार...'

'अलका मीही विचारू...? तुला काय वाटतं, मला बोलता येत नाही? वाटेल ते बकतेस. सांग बरं मग...बाळ कुणाचा? घे शपथ. मला नाही वाटत तो माझा आहे!' मनोहरने बॉबगोळा टाकला अन् एकीकडे तो अक्षरशः रडायला लागला. असला काही अलकावर आळ घेणे त्यालाही डाचत होतं. अलकावर त्याचं मनापासून प्रेम होतं. तिच्या-वर असा आरोप करायचा? ही शका? पण त्याला त्या गोळ्या घेतल्यामुळं तसंच वाटतं. मला मूल होणं अशक्य आहे म्हणून.

अलका हे ऐकून पुरती हादरली. आवाक् झाली. तिची वाचाच बसली.

'मनोहर... काय बोलतोस? तुझ्या जिभेला काही हाड?' ती रडायला लागली. त्वेषाने तिने पाठ फिरविली. भिंतीकडे तोंड करून ती हमसून रडायला लागली. 'असला आरोप...? घाणेरडा... माझ्याबद्दल. काही नसताना!'

खरंच चुकलं आपलं. मनोहरला वाटल. कसला आघात केला आपण हिच्यावर? कसल्या शकेपायी? हिला सगळं सांगायला हवं सुरुवातीपासून. निष्कारण एकमेकांचे गैरसमज. काय बोललो आत्ता हे मी, मनोहर पुन्हा पुन्हा हळहळत राहीला. स्वत:ला झिडकारत राहिला. अखेर त्याने हिय्या केला. अलकाच्या पाठीवर हात ठेवला. तिने तो घुश्यात झिडकारला.

'अलका, ऐक तर खरं...' तो बोलायला लागला. तिच तोंड भिंतीकडेच होतं. त्याचा एकही शब्द तिला ऐकायचा नव्हता. इत:पर-सकाळी सरळ उठायचं. आईकडे जायचं. ती ठरवत होती. या अशा आरोपानंतर..

मनोहरने बरोबर पाच वर्षांपूर्वीचा धागा पकडला. तो कुष्ठधामात स्वयसेवक म्हणून गेला होता. नंतर डॉ वाबळचानी आजाराचं निदान केलं. तीन वर्षं औषधं झाली, ते सांगितलं टेस्टस् निगेटिव्ह आल्या, हेही सागितलं, अलकान केव्हा तरी तोड वळवल. ती त्याच्याकडे लक्ष देऊन ऐकायला लागली होती अन् मग आताची ही अगतिक भीति. पुन्हा भेडसावणारी छाया. आजार अजून आहे का? अगात रक्तच तयार होत नाही. सारं शरीर आतून पोखरलंय. पुरुषत्व अगात राहिलंय, असं मला वाटतच नाही. डॉक्टर खात्री देतात. तसलं काही नाही. काही नाही. मी ठाम बरा झालोय; पण हे विचार छळत राहतात. सोडत नाहीत. मी काय करू? अलका...

'कदाचित बाळाला संसर्ग होईल म्हणून मी त्याला हात लावत नाही ग. त्याच्या-पासून दूर दूर राहतो. माझी सावली त्याच्यावर नको ग.' तो अडखळत हुंदके देत सांगत होता.

'त्या गोळ्या तीन वर्षं घेतलेल्या. त्यामुळे माझ्या शरीरात रक्तच तयार होत नाही. हे सारे म्हणतात; पण मला नाही पटत. माझं पुरुषत्व गेलंय. म्हणून मी दूर राहतो तुझ्या-पासून. एकीकडे तुझ्या दृष्टीनं बरंच आहे ते. तुला माझा संसर्ग नाही; पण तुझ्या मनात

तिसऱ्याच शंका घर करून आहेत.'

सारं ऐकून अलकाला भावावल्यासारखं झालं. ती चकित झाली काय करावं, काय बोलावं, तिला समजत नव्हतं. ऐकताना तिचं सर्वांग शहारलं. क्षणभर वाटलं, मनोहरपासून दूर व्हावं लांब व्हावं. कुठल्या कुठं दूर पळून जावं, अशी दाट इच्छा तिच्या मनात उचंबळून आली. कुष्ठरोग...लेप्रसी. रस्तोरस्ती हिंडणारे भिकारी. हात-पाय सडलेले, अपंग. तिच्या नजरेसमोर उभे राहिले. फेर धरून नाचू लागले. छी छी ...ती, तिचं बाळ असंच आईकडे माहेरी जावं. ती पुढचा मार्ग दाखवील; पण मग मनोहर ? त्याचं काय ? तिनं समोर पाहिलं. आतुरतेनं, उत्कंठेनं तो तिच्याकडे पाहात होता. त्याच्या डोळ्यात आशा होती. मनोहरला सोडून जायचं ? घटस्फोट ? ती या विचारानच कळवळली. छे ! पण यात त्याचा तरी काय दोष ? चुकून आजाराच्या तडाक्यात सापडला. आधीच इतके दिवस या आगीत होरपळतोय. नाही, नाही, त्या शंका त्याला छळत आहेत. मग आपण काय करायचं ? अशा परिस्थितीत त्याला सोडायचं ? एकाएकी तिचा निर्णय ठरला. तिला एकदम हलकं वाटलं. ती अभावितपणे मनोहरच्या जवळ सरकली.

'अरे, मला मागेच सांगायचस. मला ह्यातही भागीदार करून घ्यायचंस. तुझ्याबरोबरीनं, हे ओझं मीही डोक्यावर पेललं असतं. तेवढच तुला हलकं वाटल नसतं का? तुझा ताण कमी नसता का झाला ?' अलका बोलून गेली. मोठ्या कष्टाने, प्रयासाने; पण तेवढ्यानं तिलाही बर वाटलं. मनोहरला ते ऐकून एकदम मोकळं, हलकं, फुलासारख वाटल.

'अलका!' आनदाने तो म्हणाला.

'काहीही असलं तरी आता आपण कायमचे एकमेकाचे आहोत. तेव्हा दोघानी मिळूनच ह्यातून मार्ग काढायचा अन् तसं म्हणशील तर सगळं आधीच संपल आहे. आजार बरा झालाय. तुझी ही भीति मनातलीच आहे.'

'डॉक्टर तसच म्हणतात.'

'अलका, मला माफ कर. मी नाही, नाही ते म्हणालो तुला मघाशी. क्षमा करशील ना...?' लहान मुलासारखा त्याचा व्याकुळ स्वर.

'अं हूं. ते मात्र काही-बाहीच म्हणालास हं.'

'पण चुकल म्हटलं ना, अलका !'

तिला राहावेना. कृत्रिम लटका राग आणायची ही वेळ नव्हतीच. गेली कित्येक वर्षं तो ज्या छायेत वावरत होता, ज्या झळानी भाजून निघत होता त्याची अलकाला कल्पनाच करवत नव्हती. आपण इतक्या जवळ होतो आणि आपल्याला कशाचाच थागपत्ता नव्हता तरीच तो असा वागे; पण मला याआधीच सांगायच, पण हा असला आजार. सागणार तरी कसं ?

तो अजून आर्जवी नजरेन तिच्याकडे पाहात होता अलका खुदकन् हसली.

उशीरा का होईना, पण दीर्घ कालावधीनतर अखेरीस आकाशात मेघानी दाटी केली होती. त्यांना उभ राहायला जागा नव्हती. असख्य जलधाराच्या रूपाने, अनिवार वेगाने ते खाली धाव घेत होते. □


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

**प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे**

किंमत वीस रुपये

**प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर**

**पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

[ टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील ग्राहकांनी वरील पुस्तक व 'आर् डॉक्युमेंट' ही कादंबरी कार्यालयातून घेऊन जावी. ]

पुस्तके

# कॅलिडोस्कोप

**एका व्यक्तिमत्त्वाचं प्रभावी दर्शन**

'कॅलिडोस्कोप' ही अच्युत बर्वे यांची नवी कादबरी. अच्युत बर्वे यांना मराठी वाचक ओळखतो, तो एक समर्थ कथाकार म्हणून; पण आपल्या ह्या दुसऱ्याच कादंबरीद्वारे ते कादबरी हे माध्यमही सहजतेनं हाताळताना दिसतात.

'कॅलिडोस्कोप'च्या केंद्रस्थानी आहे ते एक बहुरंगी आणि बहुढंगी व्यक्तिमत्त्व. एकनाथ पाडुरंग तथा भाऊसाहेब रहाळकर हेच त्या व्यक्तिमत्त्वाचं कादंबरीतलं नाव; पण एवढयावरच तिचं वर्णन सपत नाही. ह्या माणसाला असंख्य पैलू आहेत. तो एक समर्थ लेखक आहे, यशस्वी नाटककार आहे, कथाकार आहे, कादबरीकार आहे. त्याच्या नाटकाचे असंख्य प्रयोग होत असतात. तसंच त्याच्या पुस्तकांच्या एकावर एक आवृत्त्या निघत असतात. लेखक ह्या नात्यान तो नामवंत आहे आणि नामवंताला मिळणारं वाचकाचं प्रेमही त्याला उदंड लाभलंय. त्याबरोबरच भाऊसाहेब रहाळकर हा माणूस एक निष्णात वकीलही आहे. वकिलीचा व्यवसाय तो मर्यादित अर्थानं करीत असला तरी, फौजदारी गुन्हेगारांना हातोहात सोडवण्यात त्याचा लौकिक आहे. प्रसंगी कोर्टालाही आपल्या अमोघ युक्तिवादानं निरुत्तर करण्याएवढी तरल बुद्धिमत्ता त्याला लाभली आहे. जुनी पुस्तकं-पोथ्या गोळा करून त्याचा संग्रह करण्याची ह्याला छंद आहे. म्हणजे रहाळकर हा माणूस खूप कोणी तरी आहे. त्याचं व्यक्तिमत्त्व सामाजिक आहे आणि म्हणूनच प्रसिद्धीचा प्रखर झोत ह्याच्या अवघ्या जीवनावर पसरलाय.

रहाळकर हा एवढाच माणूस नाही. याहूनही तो बराच काही आहे. अच्युत बर्वे यानी रंगवलेला रहाळकर मूलतः एक भोगवादी माणूस आहे. जीवनातले विभिन्न उपभोग त्यानं मनस्वीपणे अनुभवलेयत त्याच्या चतुरस्र जीवनाच्या असंख्य संदर्भात अनेकानेक स्त्रियांशी त्याचे अनेक अर्थांनी सबंध आलेयत. कुठल्याही स्त्रीच्या मागे तो लघळ होऊन चालत गेला नाही. तसा त्याचा पिंडही नाही; पण ह्या असंख्य स्त्रिया, सुदर, मादक, विवाहित, अविवाहित, नाटयक्षेत्रातल्या, त्याबाहेरच्या, त्याच्या अशील असलेल्या, नसलेल्या ह्याच त्याच्या राकट, बलदंड, वेधक, प्रवाही, मनस्वी, कलाकार, व्यक्तिमत्त्वावर भुलून त्याच्याकडेच चालत आल्या आहेत आणि मग स्वाभाविकच त्यानं त्या भोगलेल्या आहेत. स्वाभाविकच रहाळकर हे व्यक्तिमत्त्व सामाजिकदृष्टया प्रखर उपहास आणि प्रखर स्तुती ह्या परस्पर विरोधी प्रवृत्तीच लक्ष्य होऊन राहिलं आहे. अच्युत बर्वे याची ही कादंबरी ह्या भोगवादी माणसाचं हे उपभोगमय आयुष्य तपशीलवार रंगवताना दिसते.

ह्या कादबरीची मांडणी बर्व्यांनी अत्यत वेधकपणे केली आहे. भन्नाट व्यक्तिमत्त्वाचा माणूस आपल्या प्रवाही आयुष्याच्या अखेरच्या टप्प्याला येऊन पोहोचला आहे. हॉस्पिटलातल्या बेशुद्धावस्थेत तो अगतिकपणे लोटला गेलाय. त्याची अखेर ही निश्चित होऊन चुकलीय आणि त्याच्या या मृत्युसमीप अवस्थेची बातमी वाचून त्याच्याशी कमीजास्त संबंधित असलेली प्रत्येक व्यक्ती तो नसण्याच्या कल्पनेने थरारलीय. ह्यात त्याच्यावर प्रेम करणारी कुलीन विवाहित स्त्री आहे. उत्तरा नावाची एके काळी त्याने ठेवलेली नटी आहे, त्याचा असिस्टंट म्हणून मोठा झालेला कुणी वकील आहे. त्याच्या बुद्धिवैभवाने, कायद्याच्या ज्ञानाने प्रभावित आलेली बार-रूममधली मडळी आहेत, त्याच्या दोषांसकट त्याच्यावर जीव टाकणारी त्याची पोटची पोरगी आहे, त्याच्या व्यवहारीपणाने पोळलेला कुणी नागपुरी मित्र आहे, दारूतला दोस्त असणारा कुणी जुन्या पुस्तकांचा विक्रेता आहे, त्याने दुखावलेला एखादा प्रतिष्ठित समीक्षक आहे, त्याची सर्व पुस्तकं प्रसिद्ध करून नावाला आलेला एक प्रकाशक आहे, हलक्या जिभेने वावरणारा त्याचा नेहमीचा लेखनिक आहे, त्याच्या मोठेपणावर जळणारा कोकणातला कुणी गाववाला आहे, त्याला ताज्या तरुणी पुरवणारा कुणी साहेबराव आहे. विल्सन कॉलेजातला त्याला ठाऊक नसलेला कुणी ख्रिश्चन वर्गमित्र आहे कोडलं आयुष्य जगणारी त्याची पत्नी आहे. आणखीही अनेक जण आहेत. रहाळकराच्या अखेरच्या दुखण्याची बातमी वाचून त्यांच्या मनात माजलेली खळबळ, मग रहाळकराच्या सहवासातील जाग्या झालेल्या आठवणी, त्याच्या ह्या घटनेवरच्या बऱ्या-वाईट प्रतिक्रिया अच्युत बर्व्यांनी प्रत्येक प्रकरणात प्रभावीपणे माडल्या आहेत आणि स्वाभाविकच अखेरच्या पर्वात ह्या साऱ्याच्या केंद्रस्थानी असलेल्या रहाळकरचा मृत्यु अटळपणे घडवून आणला आहे.

हे सारं चित्रण करताना, घटनाची मांडणी करताना बर्व्यांनी मोजकेच शब्द वापरले आहेत. रहाळकरच्या व्यक्तिमत्त्वातला विरोधाभास त्यांनी नोंदविला असला तरी त्याच विरोधाभासाचं विश्लेषण त्यांनी कोठेच माडलेल नाही. इतकंच नव्हे तर सर्व व्यक्तींच्या अनुभवांच्या नोंदीतूनच रहाळकराच्यातल्या परस्परविरोधी प्रवृत्तीचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न बर्व्यांनी केला आहे.

रहाळकर नावाच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचं नीटस चित्रण अच्युत बर्वे 'कॅलिडोस्कोप'मधून करतात. तो त्यांच्या दृष्टीने एक मोठा नाटककार आहे, कथाकार आहे, बहुरंगी लेखक आहे, एक मोठा वकील आहे. हे सारं जरी असलं तरी वाचकाच्या मनावर त्याची प्रतिभा उमटते ती केवळ एका भोगवादी माणसाची आणि बर्व्यांनी बऱ्याचशा सयमाने आणि क्वचित प्रसंगी भडकपणाने मांडलेल्या प्रसगामधून ही प्रतिभा अधिकच गडद होत जाते.

अच्युत बर्वे यानी 'कॅलिडोस्कोप'ची भाषा जाणीवपूर्वक घडवत नेली आहे नागपुरी, पुणेरी आणि कोकणी माणसाच्या तोंडी ते तेथली तेथली भाषा-वैशिष्टयं सहजतेनं जाणवून देतात. इतकच काय, विविध नावं, प्रसंग ह्यातून देखील एक प्रादेशिक जाणीव, वातावरण सहजतेने निर्माण करत जातात. 'कॅलिडोस्कोप'ची घडण करताना अच्युत बर्वे लेखक, पत्रकार आणि इतर अनेक व्यक्ती आजच्या सामाजिक जीवनातून

उचलताना दिसतात; पण हे करतानादेखील रहाळकर आणि आजच्या सदर्भातली माणसं त्यातली तफावत वाचताना सतत जाणवत राहते.

'कॅलिडोस्कोप' ही रहाळकरचीच कादंबरी आहे. त्याच्या अतृप्ततेची कादंबरी आहे. त्याच्या तृप्ततेची आहे. हा माणूस कुठं तरी प्रामाणिक आहे, तितकाच कुठं तरी तो ढोंगीही आहे. त्याच्या मनात आपल्या कर्तृत्वाची खोल जाणीव आहे, तितकीच आपल्या मर्यादांची बोचही आहे. तो चांगला तितकाच वाईटही आहे. नैतिक बंधने झुगारण्याइतका तो बेछूट, तितकाच केव्हा तरी ती पाळण्याइतका सावधही आहे. वर वर धीट वाटतानाच तो आतल्याआत भित्रा आहे. बाहेरख्यालीपणा करतानाच ससार सांभाळणारा व्यवहारी माणूसही आहे. त्यामुळेच त्याच्या मृत्यूच्या जाणीवेने अनेकजण व्यथित झाले, थोडे-फार निर्धास्त झालेत, तर काही थोडे आनंद मानण्याइतके निरर्गलही बनलेयत. अच्युत बर्व्यांनी ह्या परस्पर विरोधी, विसंगती, भव्य, बहुगुणी, झगमगत्या व्यक्तिमत्त्वाचं प्रभावी चित्रण 'कॅलिडोस्कोप' ह्या आपल्या कादंबरीत उतरवलंय. 'कॅलिडोस्कोप' ही एक प्रभावी कादंबरी आहे आणि आशयाच्या दृष्टीने प्रवाहीही. अच्युत बर्वे तिला 'राणी-छाप रुपयाचं' खणखणीत नाणं म्हणून म्हणत असले तरी वाचकाच्या दृष्टीने ती एकवारच वाचनीय ठरते, एवढंच निश्चितपणे म्हणता येईल आणि ह्यातच 'कॅलिडोस्कोप'च्या मर्यादा आहेत आणि यशही.

**–अशोक प्रभाकर डांगे**

**कॅलिडोस्कोप**
श्री. अच्युत बर्वे
मॅजेस्टिक बुकस्टॉल, मुबई ४
किंमत सोळा रुपये

# सौंदर्याचे व्याकरण

## सौंदर्यमीमांसेवर काही नवे विचार

आज आपल्याकडे जेव्हा सौदर्यशास्त्राचा विचार केला जातो, त्या वेळी दोन प्रवृत्ती ठळकपणे नजरेत भरतात. एक प्रवृत्ती ही पाश्चात्य सौंदर्यशास्त्रीय विचारांनी भारावलेली आहे. पाश्चात्य सौदर्यशास्त्रीय विचारांचीच परपरा उचलून त्या सदर्भात स्वत.चे चिंतन, मतप्रदर्शन करण्याची ही प्रवृत्ती महत्त्वाची आहे, हे खरे; पण कलाविषयक प्राचीन भारतीय चिंतनाकडे बघण्याचा या प्रवृत्तीच्या लोकांचा दृष्टिकोन बव्हंशी अपूर्ण किंवा पूर्वग्रहदूषित असतो. दुसरी प्रवृत्ती ही भारतीय नाट्यशास्त्र व साहित्यशास्त्राच्या परंपरेने भारलेल्या लोकांमध्ये दिसते. यात बऱ्याच वेळा परंपरावाद शिरलेला दिसतो. भरताचे अध्ययन करायचे, तर ते अभिनवगुप्तांनी केलेल्या भाष्याच्या प्रकाशात, असे इथे दिसते. त्याचप्रमाणे भारतीय सौदर्यशास्त्राचे रीतिवाद, रसवाद, अलंकारवाद अशा वेगवेगळ्या वादांमध्ये विभाजन करण्याचीही प्रवृत्ती दिसते. डॉ. बारलिंगे यांचे 'सौंदर्याचे व्याकरण' या पुस्तकातील विवेचन वरीलपैकी कुठल्याच प्रवृत्तीत समाविष्ट होत नाही. कलाविषयक प्राचीन भारतीय विचारमथनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन परंपरावादी नाही, तर पुन.स्पष्टीकरण आणि पुनर्मूल्याकन करण्याचा हा दृष्टिकोन आहे. पाश्चात्य सौंदर्यशास्त्रीय विचारांचा अभ्यास जरी डॉ. बारलिंगे यांनी केलेला असला तरी त्यांचा सौदर्यविचार पाश्चात्याळलेला नाही. जी. ई. मूरने नीतिशास्त्रात प्रस्तुत केलेली तत्त्वज्ञानपद्धती डॉ. बारलिंगे यांनी सौंदर्यविचारात वापरली हे खरे असले, तरी याचा अर्थ त्यांनी मूरच्या विचारांना मान्यता दिली किंवा मूरचे त्यांनी अंधानुकरण केले असा होत नाही; पण हेच नेमके ओळखले गेलेले दिसत नाही.

आपल्या या पुस्तकात डॉ. बारलिंगे यांनी वापरलेली तत्त्वज्ञानपद्धती कोणती, असा प्रश्न विचारला गेला तर 'विश्लेषणपद्धती' असे एकच एक उत्तर देणे धाडसाचे आहे. सुरुवातीच्या काही निबंधातून त्यानी मूरच्या विश्लेषणपद्धतीचा वापर जरूर केलेला आहे आणि अन्यत्रही त्यांनी आपल्या विवेचनात विश्लेषणाचा कस शाबूत ठेवला आहे; पण त्याचबरोबर त्यांची विवेचनपद्धती वर्णनात्मक आणि उपमानप्रधानही आहे, असे आढळून येते. कलेचा विचार करीत असताना तार्किक विश्लेषणाची पद्धती वापरून आपल्याला कलेचे व्यवच्छेदक लक्षण मिळणार नाही, याची जाणीव लेखकाला झालेली दिसते. त्यामुळे 'कला म्हणजे काय?' या नव्या आवृत्तीत समाविष्ट केल्या गेलेल्या लेखात कलाव्यवहाराचे वर्णन करणेच लेखक पसत करतो. या वर्णनात कलाव्यवहार आणि क्रीडा, कलाव्यवहार आणि आर्थिक व्यवहार याची तुलना करताना लेखकाने उपमानपद्धतीचा (Method of Analogy) वापर केला आहे आणि त्यामुळे कलेच्या तीन अवस्थाचे स्वरूप (पहिली कलाकाराच्या मनातील अव्यक्त अवस्था, दुसरी कलाकृतीची व्यक्त अवस्था आणि तिसरी रसिकाच्या मनात आस्वादाने उत्पन्न होणारी अवस्था) स्पष्ट होण्यास मदतच झाली आहे. याच लेखात लेखकाने कलाकृतीचे संप्रेषण (Communication) म्हणून स्पष्टीकरण केलं आहे आणि 'कला म्हणजे अभिव्यक्ती', हा एकातिक सिद्धात कसा तोटका पडतो, हे दाखविले आहे.

आज भारताच्या रससिद्धाताचा जेव्हा जेव्हा विचार केला जातो, तेव्हा तेव्हा रस म्हणजे आनंद, रस हा मानसिक असतो, अशासारखी भरतानंतरच्या कलामीमांसकानी मांडलेली समीकरणे गृहीत धरूनच तो केला जातो. डॉ. बारलिंगे याचा असा दावा आहे की, भरतानतरची कलामीमांसा (काही अपवाद वगळता) माध्यमिक बौद्ध, विज्ञानवादी बौद्ध व वेदान्ती दार्शनिकाच्या प्रभावाखाली असलेल्या कलामीमासकाकडून रसाचे मानसिकीकरण झाले. आजही आपल्या मनावर भरतानतर उद्भवलेल्या आणि विस्तारलेल्या चिद्वादी दर्शनाचा प्रभाव असल्यामुळे भरताचा रससिद्धात नि:पक्षपातीपणे अभ्यासणे, आपल्याला कठिण होऊन बसते एखादा कलामीमासक ज्या वेळी

कलामीमांसा करतो, त्यावेळी त्याच्या एकूण तात्त्विक दृष्टिकोनाची—विश्वविषयक आणि जीवनविषयक दृष्टिकोनाची—छापही त्याच्या कलामीमांसेवर पडू शकते. भरताच्या नाट्यमीमांसेवर तत्कालीन सांख्य व आयुर्वेददर्शनांची छाप होती. सांख्य आणि आयुर्वेददर्शनांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सत्यवादी (Realistic) होता. कलाकृतीकडे बघण्याच्या दृष्टिकोनावरही या सद्‌वादी दृष्टिकोनाची छाप पडणे अटळ होते. कलाकृती ही इतर सद्‌वस्तूंसारखीच सद्‌वस्तू आहे, ती मानवनिर्मित असते आणि मानवांनी आस्वाद घेण्यासाठी असते, असा हा भरताचा कलाविषयक दृष्टिकोन आहे. यात आस्वाद-प्रक्रियेला जसे महत्त्व आहे, तसेच कलानिर्मितीच्या प्रक्रियेलाही महत्त्व आहे. नंतरच्या 'आनंदवादी' कलामीमांसकांवर चैतन्यवादाची जी छाप होती, तीमुळे कलानिर्मिति-प्रक्रियेला त्यांच्या लेखी गौण स्थान प्राप्त झाले आणि आस्वादाला, की ज्यात आनंद हाच विषय असतो आणि आनंद हाच विषयी (आस्वादक) असतो, महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. भरतमुनींची रसमीमांसा ही या आनंदवादाला अनुकूल करून घेण्यासाठी रसाचा आनंद असा चुकीचा (भरताला अभिप्रेत नसलेला) अर्थ यातूनच केला गेला.

डॉ. बारलिंगे यांनी भरताच्या रस-सिद्धान्तावर टिप्पणी करत असताना असे जे मौलिक ऐतिहासिक मुद्दे मांडले आहेत, त्यांची विद्वानांकडून छाननी होणे अगत्याचे आहे, असे वाटते. कारण आजही बव्हंशी विद्वानांकडून जेव्हा भरताच्या रससिद्धांताचा परामर्श होतो, त्या वेळी रसाचा मानसिक भावावस्थांशी आणि विशेषेकरून आनंदाशी अद्वैतभाव प्रतिपादण्याचा प्रयत्न होत असतो. प्रश्न एवढाच उपस्थित केला जातो की, रस म्हणजे नाटककाराची भावावस्था, का नटाची भावावस्था, का प्रेक्षकाची भावावस्था? बारलिंगे यांचे विवेचन या प्रश्नांना सरळ छेद देणारे आहे. कारण त्यांच्या मते, भरताला अभिप्रेत असलेला रस म्हणजे खुद्द नाट्यकृतीच होय. भावावस्थेला दिले गेलेले ते मूर्तरूप असते. अमूर्त भावावस्था म्हणजे रस नव्हे.

'सौंदर्याचे व्याकरण' या पुस्तकाच्या आवृत्तीत समाविष्ट केला गेलेला 'नाट्यशास्त्र : रस आणि इतर संकल्पना' हा लेखही या दृष्टीने महत्त्वाचा आहे. पूर्वीच्या लेखांतील अनेक मुद्दे त्यात पुनरावृत्त झाले असले तरी त्याचबरोबर काही नवीन विचार, नवीन स्पष्टीकरणेही यात लेखकाने प्रस्तुत केली आहेत. उदाहरणार्थ, डॉ. बारलिंगे यांच्या मते, नाटक आणि नाट्य यात भरताला फरक निश्चितपणे अभिप्रेत होता. नाटक हा भरताच्या मते, रंगमंचावर नाट्यरूपाने प्रस्तुत करण्याजोग्या काव्याचा एक प्रकार होता; पण खुद्द रंगमंचावर जे प्रस्तुत केले जाते, त्याला भरताने नाटक न म्हणता नाट्य म्हटले आहे. अभिनवगुप्तांनी हा फरक न जाणता नाट्याचे विश्लेषण आणि नाटकाचे विश्लेषण एक केले. डॉ. बारलिंगे यांनी दाखविलेला अनुकृति आणि अनुकरण यातील फरकही विचारात घेण्याजोगा आहे.


लेखकाने कलाकृती, सौंदर्य याचबरोबर समीक्षा हाही विषय हाताळला आहे. वाङ्मयीन कलाकृतीची समीक्षा आणि वाङ्मयेतर कलाकृतीची समीक्षा यांमध्ये जो मूलभूत फरक पडतो, तो लेखकाने दाखविला आहे. लेखकाच्या मते, वाङ्मयीन कलाकृतीचे केवळ आकारिक विश्लेषण करणे समीक्षेच्या दृष्टीने तोकडे ठरते. कारण अशा कलाकृतीच्या अर्थाचाही विचार या समीक्षेत अपरिहार्य असतो. 'मर्ढेकरपूर्व समीक्षाशास्त्री इतर कलांना काव्यशास्त्राच्या निकषावर तोलत असत. साहित्याला मर्ढेकर इतर कलांच्या निकषावर तोलावयास लागले. एकूण दोघांचीही चूक एकच,' हे डॉ. बारलिंग्यांचे उद्गार (पृ. १५८) म्हणजे गतानुगतिक, तसेच अभिनव समीक्षापद्धतीवरील कठोर भाष्य आहे.

डॉ. बारलिंगे यांच्या पुस्तकाच्या या नव्या आवृत्तीत मुद्रणदोष कित्येक आहेत आणि शुद्धिपत्र जोडूनसुद्धा ते पुरेसे दूर होत नाहीत. तसेच काही ठिकाणी विवेचनात अनेक विषयांचा गुंता होऊन गेला आहे, असे वाटते. त्यामुळे सर्वसामान्य वाचकाच्या दृष्टीने हे पुस्तक 'सोपे' म्हणता येण्यासारखे नाही. तरीही अभिनिवेश न बाळगता, प्राचीन भारतीय सौंदर्यमीमांसेच्या व एकूण सौंदर्यमीमांसेच्या संदर्भात काही नवीन मौलिक विचार येथे प्रस्तुत केले गेले आहेत. आणि हेच या पुस्तकाचे खरे यश आहे.

**—प्रदीप प्रभाकर गोखले**

**सौंदर्याचे व्याकरण**

लेखक : डॉ. सुरेंद्र बारलिंगे
अभिनव प्रकाशन, मुंबई १४.
पृष्ठसंख्या २२४, किंमत २० रुपये



हिंदी चित्रपट

# इन्कार

सदानंद बोरसे

नव्या दमाचे दिग्दर्शक राज सिप्पी याचा पहिलाच चित्रपट 'इन्कार' पुण्यात प्रदर्शित झाला. गेले दोन आठवडे या चित्रपटाला असलेली वाढती गर्दी पाहिली की, धंद्याच्या दृष्टीने त्याच्या यशस्वितेची खात्री पटतेच; पण चित्रपटही या तरुण दिग्दर्शकाबद्दलच्या अपेक्षा वाढविणारा आहे.

'इन्कार' चित्रपट हा एका सत्यकथेवर आधारित आहे. हरिदास चौधरी (डॉ. श्रीराम लागू) या बुटांच्या बड्या कारखानदाराचा मुलगा पळविण्याचा प्रयत्न केला जातो; पण चुकून त्याच्या ड्रायव्हर सीतारामचा (साधू मेहेर) मुलगा पळवला जातो. मुलाच्या बदल्यात वीस लाख रुपयांची मागणी होते. ड्रायव्हरशी असलेल्या घरगुती जिव्हाळ्याच्या संबंधामुळे हरिदास चौधरी ती मागणी पूर्ण करतो; पण त्याने दिलेले वीस लाख रुपये त्याने आपल्या कंपनीकडून कर्जाऊ घेतले असल्याने मग त्याच्या परतफेडीसाठी त्याच्या घराचा लिलाव, ताब्राही वगैरे. शेवटी सी. आय. डी. इन्स्पेक्टर अमर (विनोद खन्ना) निरनिराळ्या धाग्यांच्या मदतीने मुलगा आणि रक्कम दोन्ही परत मिळवितो.

या सगळ्या कथेला इन्स्पेक्टर अमर आणि हरिदास चौधरीची बहीण गीता (विद्या सिन्हा) यांच्या प्रेमप्रकरणाची फोडणी. अर्थात कथेच्या गोड शेवटात या प्रेमाचीही गोड परिणती आहेच.

अशी ही kidnapping ची कथा दिग्दर्शक राज सिप्पींनी अत्यंत छान हाताळली आहे. मुलगा पळविला गेल्यापासून निर्माण होणारा ताण त्यांनी इन्स्पेक्टर अमरला मिळणारा एखादा धागा, त्यातून त्याला पुढे मिळालेली चाल व नंतर बंद होणारा मार्ग, पुन्हा (बहुधा योगायोगानेच) सापडणारी आणखी एखादी वाट, या साऱ्याचा उपयोग करून कायम राखला आहे. प्रसंगांच्या वेधक साखळीमुळे चित्रपटाची पकड अजिबात सुटत नाही. सत्य घटनेमुळे कथेतील म्हणजे गुन्हेगाराच्या शोधातील बारकावे अनायासेच मिळालेले असावेत. इतक्या सगळ्या चांगल्या गोष्टी असूनही आणि सत्यघटनेचा भक्कम आधार असूनही 'इन्कार' वास्तव रहस्यकथेच्या (काही दिवसांपूर्वी येऊन गेलेला 'शक' हा चित्रपट अशा वास्तव रहस्यकथेचे उत्कृष्ट उदाहरण.) पातळीला पोहोचत नाही. याची कारणे तीन. एक–चित्रपटात गुन्हेगाराच्या शोधासाठी घेतलेला योगायोगाचा आश्रय. अमरला तळ्यात बुडालेल्या गाडीची माहिती मिळणे, त्याने चुकीच्या टॅक्सीचा पाठलाग करूनही अखेर योग्य ठिकाणी पोहोचणे ही अशा योगायोगाची ठळक उदाहरणे. अर्थात प्रत्यक्ष घटनेतही जर असे प्रकार घडले असतील, तर बोलणेच खुंटले. अन्यथा हा प्रकार अतिशय फिल्मी वाटतो. दोन–हिरोची सर्वशक्तिमानता दाखविण्यासाठी घेतलेला स्टंटसचा आश्रय. अमरने पोलिस-व्हॅनमधून जाताना छोट्या बन्सीला वाचविण्यासाठी गुन्हेगार राजसिंगच्या पकडलेल्या साथीदारांशी केलेली हाणामारी झटकन अनेक प्रश्न उभे करते. त्या साथीदारांबरोबर अमरने एकट्यानेच एका छोट्या पोराला घेऊन जाणे योग्य होतें का? मागच्या बाजूला प्रचंड दण्णादण्णी, आदळ-आपट चाललेली असताना गाडी न थांबविणारा चालक स्थितप्रज्ञ म्हणावा की त्याच्या संवेदना नष्ट झाल्या आहेत म्हणावे? असाच प्रकार म्हणजे राजसिंगला पकडण्याचा अमरने केलेला प्रयत्न. पोलिसांनी लावलेल्या सापळ्यात राजसिंग अलगद सापडल्यानंतर अमर एकटाच त्याच्यासारख्या 'खतरनाक, चालाक' इसमाला पकडायला का गेला? हिरोचे श्रेष्ठत्व शेवटच्या राजसिंगच्या मरणातही पुन्हा एकवार सिद्ध केले आहे. तीन–चित्रपटामध्ये घुसडलेल्या काही अनावश्यक (अर्थात कथावस्तूच्या दृष्टिकोनातून) गोष्टी म्हणजे अमर-गीता प्रेमप्रकरण आणि हेलनचा एक नाच. अर्थात ही धंद्याशी निर्मात्याने केलेली तडजोड असे म्हणता येईल. तरीही वास्तव नक्कीच नाही; पण वेधक रहस्यकथा म्हणून 'इन्कार' नक्कीच प्रेक्षणीय आहे.

'इन्कार' प्रेक्षणीय बनविण्यात अतिशय महत्त्वाचा वाटा उचलला आहे, तो डॉ. श्रीराम लागू आणि अमजदखान या कलाकारांनी. या दोघांची आणि इतर कलाकारांचीही आपापल्या भूमिकासाठी दिग्दर्शकाने केलेली निवडही दाद घेऊन गेली. डॉ श्रीराम लागूंच्या 'किनारा' आणि 'घरौंदा'मध्ये नुकत्याच प्रदर्शित झालेल्या भूमिका अतिशय गाजल्या 'इन्कार' मधील त्यांची हरिदास चौधरीची भूमिकाही प्रेक्षकांच्या पसंतीची पावती मिळवील. एक इमानी विक्रेता, एक खेळकर भाऊ, प्रेमळ पती व पिता इत्यादी प्रारंभापासून दिसणारे या भूमिकेचे पैलू त्यांनी अतिशय ताकदीने उभे केले आहेत. विशेषत आपला मुलगा पळविला गेला हे समजताच वीस लाख देण्यास तयार झालेला हरिदास, ड्रायव्हरचा मुलगा हे कळल्यानंतर त्याने दाखविलेली बेपर्वाई, हृदयपरिवर्तनामुळे त्याने रक्कम देणे आणि नंतर बन्सीची न झालेली सुटका, मालमत्तेचा लिलाव या साऱ्या असह्य ताणामुळे हताश झालेला, तरीही नव्याने सारे सुरू करण्याची उमेद बाळगणारा हरिदास चौधरी ते प्रेक्षकांना भिडवू शकले आहेत. (यात कृत्रिमपणाचा एकमेव भाग म्हणजे काही हृदयपिळवटक संवादांनी हरिदासचे झालेले मतपरिवर्तन; पण त्या गोष्टीस डॉक्टरांचा इलाज नव्हता.) 'शोले' नतर बऱ्याच दिवसांनी अमजदखान त्याच्या पूर्ण सामर्थ्यानिशी राजसिंगाच्या भूमिकेत पाहायला मिळाला. राजसिंगचे क्रौर्य, खुनशीपणा आणि मायेफिरूपणा, त्यातूनही डोकावणारी त्याची धूर्तता हे सारेच त्याने एखाद्या चित्त्याला शोभेलसे उभे केले आहे त्याच्या व्यक्तिमत्त्वातील उग्रपणा व रुबाबही एखाद्या हिंस्र जनावराला शोभेसा होता आपल्या साथीदाराला जरबेत घेताना, सी. आय्. डी. इन्स्पेक्टर यादवला मारताना अथवा पाठलागावरील कुत्र्याची नरडी दाबताना दिसणारा त्याचा क्रूर आवेश, झुरळाला चटके देताना त्याच्या चेहऱ्यावर दिसणारा विकृत आनंद, आपल्यावर नजर ठेवणाऱ्या इन्स्पेक्टरकडे पाहून त्याने स्टेशनवर केलेले हास्य अशा चित्रपटात ठायीठायी विखुरलेल्या

जागा अमजदने आपल्या चेहऱ्याने जिवंत केल्या आहेत. त्याच्या खरखरीत आवाजाला त्याने त्या चित्रपटात दिलेली चढत्या हास्याची जोड तर अक्षरश: अगावर शहारा आणते. शेवटीही सुटकेचा मार्ग उरलेला नसताना त्याने जिवावर उदार होऊन केलेली धडपड हे सारे सारे एखाद्या कावेबाज, क्रूर जगली श्वापदाला शोभण्यासारखेच होते. बाकी उल्लेख करण्यासारखे कलाकार म्हणजे विनोद खन्ना, लीला चक्रवर्ती, साधू मेहेर आणि विद्या सिन्हा. साधू मेहेरचे तोंडातील तोंडात फुग्यासारखे फुटणारे बोलणे आणि extra-mobile चेहरा मात्र काही वेळा अत्यत विनोदी वाटतो. विद्या सिन्हाची बरीच कमी झालेली जाडी म्हणजे डायटिंग मानवल्याचे लक्षण आहे.

संगीतकार राजेश रोशनने दिलेलं पार्श्वसंगीत ही जमेची बाजू. अन्यथा, गीतांच्या दृष्टीने त्याच्या आणि गीतकार मजरूह सुलतानपुरीच्या कामगिरीत दम नाही आणि त्याला चित्रपटात काही महत्त्वही नाही.

सागर सरहदीचे सवादही ठीक आहेत; पण 'दिल दौलत और दुनियादारी' या विषयाच्या बाबतीत खोटी खोटी डायलॉगबाजी करण्याचा मोह त्यांनाही टाळता आलेला नाही

आणखी एका गोष्टीबद्दल आवर्जून लिहावेसे वाटते, ती म्हणजे 'इन्कार' चे छायाचित्रण. ते केले आहे अन्वर सिराज यांनी. संपूर्ण चित्रपटाचा साकल्याने विचार करायचा झाल्यास तसे छाप पाडण्यासारखे वेगळे काही आढळणार नाही, पण काही दृश्यांमधून त्यानी आपले कौशल्य प्रगट केले आहे. अमजदवर पहिल्यादा कॅमेरा येताना ओठातील सिगारेटचा घेतलेला शॉट, अमजद फोनची डायल फिरविताना केलेले चित्रण अतिशय प्रभावी आहे.

तर अशा या आपल्या सर्व वैशिष्ट्यांसह, गुण-दोषासह 'इन्कार' एकदा तरी पाहण्यायोग्य आहे खास. *

---

# जय-विजय

## काही विदुषकांचा खेळ

---

पुराणात एक कथा आहे, विष्णूच्या द्वारपालांनी-जय-विजयांनी कोण्या एका ऋषीचा अपमान केल्याने ते शापभ्रष्ट झाले आणि हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू अशा राक्षसांच्या रूपात जन्मले. त्या राक्षसजन्मात केलेल्या पापाच्या अधिकपणाची जाणीव झाल्याने थोडीशी पुण्यकृत्ये करून मुक्ती मिळविण्यासाठी त्यांनी एल. व्ही. प्रसादना 'जय-विजय' काढण्याची प्रेरणा दिली असावी. (विचारे! ही प्रेरणा देण्याचे एक पाप वाढल्यामुळे कित्येक प्रेक्षकांचे तळतळाट त्यांना भोगावे लागतील.)

असो. तर प्रेक्षकहो, जय-विजयची कथा बहुधा अशी असावी. (मी अजूनही त्या कथेच्या उकललेल्या गुंत्यातच अडकलो असल्याने 'बहुधा अशी असावी,'च्या भाषेत बोलतो.) अवतीचे महाराज धर्मपालसिंह (ओम शिवपुरी) हे एका परचक्रात पराभूत होऊन परागंदा होतात. त्यांची महाराणी आणि दोन सुपुत्र युवराज जय (जितेंद्र) व राजकुमार विजय (प्रेम किशन) या साऱ्यांचीच एकमेकांपासून ताटातूट होते. मग जय डाकू शेरसिंग, गरीब का दोस्त आणि राजकुमारी पुष्पावतीचा प्रियकर या स्थित्यंतरांमधून जाऊन पुन्हा जय बनतो, तर विजयच्या जीवनचक्रामध्ये सेनापती प्रतापचद, प्यारा दुश्मन आणि राजकुमारी पद्मावतीचा प्रियकर अशा अवस्था येतात. पैकी दोघाच्याही प्रियकराच्या कोशावस्थांमध्ये त्यांच्यात बैरागी, बंजारा, बजवय्या, गायक अशी बरीच अतर्गत स्थित्यंतरे होतात. मध्यतरी बऱ्याच अनाकलनीय, अतर्क्य आणि विसंगत पण हिंदी योगायोगाच्या नेहमीच्या मजबूत पायावर उभ्या असलेल्या नेहमीनेहमीच्याच घटना घडून नेहमीनेहमीनेहमीचाच गोड शेवट होतो.

या चित्राच्या अभिनेत्यांबद्दल काय बोलायचे? ओम् शिवपुरी, सत्येन कप्पू यांसारखे दोन-तीन अपवाद वगळल्यास सर्वांनीच अभिनय सोडून बाकी सगळे केले आहे. जितेंद्र नावाच्या अॅडमच्या पूर्वजाने नेहमीच्या अॅथलेटिक्स, जिम्नॅस्टिक, योगासने, रोबासोबा इत्यादी युक्त्या वापरून विदुषकी चाळे केले आहेत. शिवाय या चित्रपटात 'हातावर हात चोळून विद्युत्प्रवाह उत्पन्न करणे' या अद्‌भुत प्रकाराचे कोलीत त्याच्या हातात दिल्यावर काय विचारावे? प्रेमकिशन हा प्रेमनाथचा मुलगा एवढा एकमेव त्याचा अंगभूत गुण, (हासुद्धा त्याचा गुण नाहीच म्हणा, उलट त्याच्या बापाचा दोषच.) बाकी या रडक्या चेहऱ्याच्या बायकी विदुषकाजवळ काहीही नाही. शरीराच्या इतर स्नायूप्रमाणेच चेहऱ्याच्या स्नायूचीही हालचाल होते व त्यातून काही भाव-भावना प्रगट होतात, हे या विदुषकाला कोणी तरी पटवून द्यावे. (ही अवघड जबाबदारी मी या जन्मी तरी स्वीकारणार नाही.) विजू खोटे, रुपेशकुमार, पेंटल, कमल कपूर अशा आणखी किती जणांची नावे घेणार? साऱ्यांनीच ठरवून विदूषकी कामे केली आहेत. रीना रॉय व बिंदिया गोस्वामी आपापल्या भूमिकांमध्ये ठीक.

खिलौना, जीने की राह अशा काही बऱ्या चित्रपटांमुळे थोडासा माणसाळलेला वाटणारा हा निर्माता-दिग्दर्शक एकदम 'जय-विजय' काढण्याइतका पिसाळला का? (अॅंटीरेबीज लसच्या अभावाचा आणखी एक बळी? की आतापर्यंतच्या रौप्यमहोत्सवी चित्रपटांमुळे झालेल्या प्राप्तीवरील कराची फिकीर?)

हा चित्रपट सिनेमास्कोप आहे. चित्राच्या आकारात दिसणारी भव्यता जर त्याच्या चित्रणात दिसली असती, तरी 'भव्यता' या वैशिष्ट्यामुळे जुनाट कथा असूनही चित्रपट वेगळा वाटला असता. आपले होमी वाडिया नाही का त्याच त्या पुराणांवर तेच ते चित्रपट नवनव्या नटसंचात सादर करीत? पण त्यांच्याही चित्रपटात युद्धाच्या प्रसगी पाचसातशे माणूस लढतो. प्रसादसाहेबांनी त्याहून खाली जायची काही आवश्यकता नव्हती. कारण खजिन्याची खोदाई असो, लढाई असो, राजदरबार असो वा समूहनृत्य असो, गर्दीची संख्या काही पन्नास-पाऊणशेच्या वर जाताना वाटत नाही. आधीच अशी उदंड गर्दी आणि त्यात दृश्ये फारच मनोरंजक पद्धतीने घेतलेली. उदाहरणार्थ—लढाईत ही मूठभर माणसे एकमेकाशी अशा त्वेषाने लढतात की, दिवाळीतील किल्ल्यांमध्ये मांडलेल्या सैनिकांचा आवेशही अधिक वाटावा. हीच परिस्थिती सेटस्‌च्या बाबतीत. राजदरबार, राजवाडा, शयनागार सगळेच एका मोठ्या हॉलमध्ये पार्टीशन्स टाकून केले आहेत, असे वाटत होते. आणखी एक गोष्ट म्हणजे कथावस्तूचे बीज भारतीय असले, तरी हत्यारे (टोकाच्या तलवारी),

पोषाख (पायातील बूट, ग्रीकांसारखे झगे) इत्यादी बाबतीत पाश्चात्याचे अनुकरण करून एक नवी सकरित जमात पैदा करण्याचा (वा बैदा करण्याचा) उपक्रम बऱ्याच चित्रपटातून असतो, तसा तो 'जय-विजय 'ने इमाने-इतबारे चालू ठेवला आहे या साऱ्या दिखाऊ प्रकारांबाबतच हा प्रकार; तर 'दिग्दर्शन 'नामक गोष्टीबद्दल लिहू लागलो, तर एक अपशब्दकोश तयार होईल म्हणून थाबतो.

'ज्यूली' या पहिल्याच चित्रपटातील सगीताने गाजलेल्या राजेश रोशनबद्दल आज-काल भयंकर ओरड ऐकू येते की, त्याच्या सगीताचा एक टाइप बनला आहे म्हणजे ज्यूली, यही है जिंदगी, एक ही रास्ता, प्रियतमा इत्यादी चित्रपटामधील एखाद्या गाण्याचा अपवाद वगळता बाकीची गाणी म्हणजे 'शब्द वेगळे; पण सूर तेच' असा प्रकार. बहुतेक गाणी तशीच कुजबुजल्यासारखी वा घुमती, मधले गिटारचे तुकडे वा बोगोचा ऱ्हीदमही तसाच हळुवार चढत जाणारा. हे सगीत झिंग आणणारे असले तरी, अशा संगीतकाराने आपला टाइप गुणी बनवता शक्य तितकी सुखद विविधता आणावी. .राजेश रोशनमध्ये ती पात्रता आहे, हे त्याने 'स्वामी 'सारख्या चित्रपटाद्वारे सिद्ध केले आहे. 'जय-विजय' हा त्याचा तसाच आणखी एक चित्रपट असे म्हणता येईल. 'मैं ने तो लाख जतन कर' हे गाणे खास त्याच्या टाइपातील, त्यामुळे ते चांगले वाटतेच; पण 'बडी दूर से आये', 'झनक झन् झन् झन्' आणि 'तुम से बेहतर है' हे द्वंद्वगीत वेगळे काही तरी देण्याची त्याची धडपड दाखवितात. अर्थात कथेतील विनोदी प्रसंग व 'पात्रा 'चा अभिनय यांनी गाण्याची रगत कमी करण्यात वाटा पूर्णतः उचलला आहे. '*रानीजी, सोना ना*' हे नृत्यगीत तेवढे याला अपवाद. त्या प्रसंगीच्या समूहनृत्यातील सुरेख हालचालीमुळे त्याची रंगत अधिकच वाढली आहे. मजरूहसाहेबानी पुन्हा एकवार प्रसगानुरूप फटाफट गाणी पाडली आहेत.

आतापर्यंतचा चित्रपटाचा टाकाऊपणा लक्षात आल्यानंतर तुम्ही पुढे वाचणार नसालच; मग मी तरी आणखी शाई, शब्द, श्रम आणि जागा कशाला वाया घालवू? तुमचे तिकिटाचे पैसे एव्हाना वाचले असतीलच. □

## अवती-भवती : पृष्ठ ७ वरून

पृष्ठ ७ वरून

वाल्यामुळे, हे सामान्य लोक ओळखून असतात. वाचकाच्या पत्रव्यवहारामधील दोन नमुने देण्यासारखे आहेत. एक पत्र सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे आहे. कामावर असलेल्या कामगाराना सवलती मिळतात, पगारवाढ मिळते; पण ज्यानी हयातभर शासनाची सेवा केली त्याची मात्र बूज राखली जात नाही. कारण ते संघटित नसतात आणि *नाक दाबून तोंड उघडण्याचे सामर्थ्यही* त्याच्याजवळ नसते. दुसऱ्या एका पत्रलेखकाने सरकारी नोकरीमधील विविध सुविधांचा पाढा वाचला आहे वैद्यकीय सवलतीबाबत जे गैरफायदे घेतले जातात त्यावर बोट ठेवले आहे आणि वर विचारले आहे की, ही मंडळी कायम स्वत.चाच विचार करणार का? मागे एकदा अर्थशास्त्रज्ञ श्री. वि. म. दाडेकर यांनीही सघटित शक्तीवर कोरडे ओढले होते. मुख्य मंत्रीही आम्ही तळातल्या माणसाच्या कल्याणासाठी बांधले गेलो आहोत, अशी ग्वाही देतात आणि सगळाच पैसा कर्मचाऱ्यांवर खर्च केला तर जनकल्याणाची कामे कशी करायची, असा प्रश्न विचारतात. हा प्रश्न विचारताना स्वतःचे ऐसपैस पसरलेले मंत्रिमंडळ त्यांना दिसत नाही. मंत्र्याना, आमदाराना आणि आता तर निवृत्त आमदारांनाही ज्या सुविधा दिल्या जातात त्याही त्यांना दिसत नाहीत. दौऱ्यावर होणारे अवाजवी खर्च आणि बहुसख्य मंत्र्यांची शाही राहणी याकडे त्याचे लक्ष जात नाही. जमा झालेला सारा पैसा जसा कर्मचाऱ्यांसाठी नाही तसाच तो मंत्रिगणासाठीही नाही. वास्तविक हे सत्ताधीश म्हणजे विश्वस्त; पण त्यांच्या राहणीवरून तसे कधी वाटत नाही. ते मालकाच्या तोऱ्यात, मालकाच्या वैभवात राहतात आणि वाढत्या महागाईने संत्रस्त झालेल्या कर्मचाऱ्याना, सारा पैसा काही कर्मचाऱ्याना वाटून टाकण्यासाठी नाही असे बजावतात, त्या वेळी त्याच्या या विधानाला नैतिक अधिष्ठान नसल्याने त्याचे महत्त्व पातळ होऊन जाते. सपवाल्यानी दोन महिन्यांची तयारी ठेवली असली तरी तो तुटेपर्यंत ताणण हितावह नाही वसतरावानी आपले धोरण असेच ताठर ठेवले तर नोकरभरती आलीच आणि नोकरीवरून काढून टाकण्याच्या नोटिसा झळकविण्याची वेळ आली की खरा ताण वाढला. असे हे तप्त वातावरण असतानाच कॉंग्रेस आणि जनता पक्ष आणि त्यांची मित्रमडळी निवडणूकविषयक धोरण ठरवीत आहेत. यशवतरावाच्या निवडणूक-सभा चालू आहेत. *दिल्लीला गेल्यास त्यानी आजवर कधीही* घातले नव्हते इतके लक्ष ते या वेळी घालतील. राज्याच्या ग्रामीण भागातही निवडणूक तापू लागली आहे. आपल्या पक्षाचे तिकिट मिळावे यासाठी इच्छुक उमेदवार आटापिटा करू लागले की पहिली फेरी सुरू झाली असे समजावे, असा एक निवडणूकसकेत आहे. तो लक्षात घेतला तर आता हे पहिले पर्व सुरू झाले आहे. प्रत्येक मतदारसघामधील इच्छुक उमेदवाराच्या याद्या प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत. एक शंकरराव चव्हाण याचा अपवाद वगळला तर सपप्रकरणी कोणाही जबाबदार विरोधी नेत्याने अजून तोंड उघडलेले नाही. सपवाले वितीही नाही म्हटले तरी निवडणुकीची वेळ गाठून त्यांनी सप लावून धरला आहे हे विसरता येणार नाही. वसतदादा सपाला चक्क 'राजकीय' म्हणतात. संपाच्या वेळेबाबतही त्याची तक्रार आहेच परीक्षाचे दिवस आले की, विद्यापीठातून सप आणि निवडणुका आल्या की कर्मचाऱ्याकडून अडवणूक, असा परिपाठच पडून गेला आहे, असे सागून ते म्हणतात, हे कोणी तरी थावविले पाहिजे. ठीक आहे. दादा, तुम्ही थावविण्यास उभे राहताय ना— तुमचे आव्हान सपवाल्यांनी स्वीकारले आहे. राजकीय कोंडी होईल असे वाटले की आर्थिक प्रश्न पुसट करून तुम्ही वाट काढलीत तर व्यक्तिशः तुमची किंवा तुमच्या पक्षाची प्रतिमा तर उजळ होणार नाहीच आणि उलट संप राजकीय असण्याऐवजी — तुमचे धोरण राजकीय हेतूनी प्रेरित होते, असे म्हणता येईल.

□

स. प. महाविद्यालय : पृष्ठ ४ वरून

असायला हवं. त्याची पद्धत काय, याबद्दल मतभेदाला वाव आहे; पण शिक्षणाच्या सरकारीकरणाच्या धोक्याला मात्र तोच पर्याय आहे हे निश्चित ! ◘

# काही आठवणी

## श्री. नरुभाऊ लिमये

### तो प्रभाव कायम आहे !

स. प. महाविद्यालयातून बाहेर पडून नरुभाऊंना आता पन्नास वर्षे होऊन गेली आहेत. तब्बल अर्ध्या शतकानंतर आपल्या महाविद्यालयीन जीवनाकडे वळून बघताना त्याना प्रथम त्याचे शिक्षक आठवले. ते म्हणाले, 'आर. पी. सबनीस, म. शं. गोडबोले, श्री. हर्डीकर, श्री. नारळकर इ. मंडळी तेव्हा म्हणजे १९३०–३१ च्या सुमारास शिकवत असत तो काळच निराळा होता. फर्ग्युसन कॉलेजमधले प्राध्यापक लांब बंद गळयाचा कोट, डोक्यावर पगडी, पायांत बूट, अंगावर उपरणं अशा वेषात म्हणजे थोडक्यात, ना. गोखल्यासारखे दिसत; पण स. प. चे प्राध्यापक मात्र संपूर्ण खादीधारी असत. माध्यमिक शाळेत किंवा गुरुकुलात शिकवणाऱ्या शास्त्र्याप्रमाणे दिसत.'

विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील नात्याविषयी ते म्हणाले, 'शिक्षकांचं मुलाकडे शाळेतल्यासारखं लक्ष असे. मला आजही आठवतं की, सायन्सला जाणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा. नारळकर न विसरता सांगत की, इंग्रजीकडे लक्ष दे ! त्यांचा आवाज अतिशय किरटा होता; पण ते बोलू लागले म्हणजे ऐकणारे रंगून जात.' याच संदर्भात ते पुढे म्हणाले, 'मुलं आणि शिक्षक यांच्यात योग्य ते अंतर राखून, जवळीक होती. शिकवण्याबरोबरच व्यक्तिमत्त्वाचा विकास किंवा बांधणी (character building)ची परंपरा शिक्षकही जोपासत असत. याचं कारण कदाचित स. प. मध्ये येणारा प्राध्यापक हा आधी नू. म. वि. चा सुपरिंटेंडेंट असायचा, हे असू शकेल. एकूणच त्यांचं शिकवण, पोषाख, आचार-विचार इत्यादींचा विद्यार्थ्यांच्या मनावर नकळत परिणाम होत असे. राष्ट्रभक्तीची प्रेरणा विद्यार्थ्यांच्या मनात प्राध्यापकांनी आपल्या शिकवण्यातून आणि आचरणातून तेवत ठेवली होती.' याच स्पष्टीकरण देताना ते म्हणाले, 'प्राध्यापकांनी आम्हाला 'खादी वापरा' असं कधीच सांगितलं नाही; पण ते स्वत: संपूर्ण खादीधारी असत. त्यामुळे विद्यार्थीही खादी वापरीत. इतर कॉलेजांपेक्षा स. प. तले विद्यार्थी मोठ्या संख्येने चळवळीत उतरत असत, ते याच शिकवणीमुळे.'

एकूणच महाविद्यालयातील वातावरण, मुला–मुलींचे आपापसातील संबंध कसे होते, या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, 'सगळं वातावरण खेळीमेळीचं होतं. तेव्हाही स. प. महाविद्यालय 'भाऊ' कॉलेज किंवा 'भटजी कॉलेज' म्हणूनच ओळखलं जात असे. मुलींची संख्या अगदी कमी असे. वर्गात त्या पहिल्या बाकांच्या रांगेत बसत. मुला–मुलींमध्ये कसलेही संबंध नव्हते आणि समजा, कुणाचे संबंध जुळलेच तर त्याची परिणती लग्नात होई. त्या संबंधामध्ये एक प्रकारचं पावित्र्य होतं. हॉटेल किंवा कॉलेज यापुरतंच हे प्रेम मर्यादित नसे.' यानंतर साहजिकच मुलांचं कॉलेजमधील वागणं, त्यांचे छंद, आवडीनिवडी याकडे चर्चा वळली. नरुभाऊ म्हणाले, 'काळ फक्त बदललाय. तरुण वयातल्या सवयी, चेष्टा–मस्करी आजच्यासारखीच चाले. चित्रपटांचं वेड त्या काळातील तरुण पिढीलाही होतं. दारिद्र्य इतकं होतं की, चित्रपटाला जायचं असेल तर खानावळीत खाडा करायचा. वर्गातल्या एखाद्या मित्राकडे जेवायचं आणि मग आम्ही ६–६ आण्याची तिकिट काढून सिनेमा पाहायचो ! मुलींना टोपण नाव देणे, आवडत्या लाडक्या नटीचं नाव देणे इ. प्रकार तेव्हाही चालायचे. तेव्हाचा विद्यार्थी खेळकर होता. तारुण्यसुलभ चेष्टा करणारा होता. प्रसंगी उच्छृंखलपणाही करत असे; पण तो उद्दाम नव्हता.'

'गॅदरिंग व इतर functions काटकसरीने पार पाडली जात असत. मी स्वत: दोन नाटकामध्ये कामं केली. तेव्हा तालमीच्या वेळी चहा घ्यायचा झाला तरी तो कुणाच्या खर्चानं घ्यावा याचा विचार केला जात असे. आपण श्रम करून त्यातून आनंद मिळविण्यावर आमचा अधिक भर असे मोलानं काही घ्यायचं नाही, यावर कटाक्ष असे. साधी राहणी आणि राष्ट्राच्या विचाराला प्राधान्य असे. बहुतेक सर्व विद्यार्थी कनिष्ठ मध्यम वर्गातील असत. त्यामुळे कपड्यात छानछोकी दिसत नसे. इथले प्राध्यापकही तसेच असत. आणि म्हणूनच शिक्षण–महाविद्यालयीन शिक्षण-समाजाच्या अधिक खालच्या थरापर्यंत पोचलं. कारण कोणत्याही परिस्थितीतला मुलगा इथे येऊन शिकू शकत होता.

त्या वेळी विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जाणीव मोठ्या प्रमाणात होती. याचे उदाहरण देताना ते म्हणाले, 'नक्की साल आठवत नाही, पण १९३० च्या सुमारास उपोषणात जतीनदासचा अंत झाला. त्या दिवशी हॉस्टेलमधला एकही मुलगा जेवला नाही ! त्या दिवशी हॉस्टेलमध्ये चूल पेटली नाही ! राजकीय जाणिवा व्यक्त करण्यासाठी चर्चा-मंडळं वगैरे काही नव्हती; पण मुलं प्रत्यक्षच सामाजिक जीवनात, चळवळीत भाग घ्यायची.'

आज–काल आर्टस्‌ला येणारा विद्यार्थीवर्ग हा 'गाळ' असतो. इतर काहीच जमलं

नाही म्हणून ते आर्टस्‌ला जातात, असं म्हणतात. यासंबंधी बोलताना नरुभाऊ म्हणाले, 'असं काही नव्हतं. पुढे करण्यासारखं काही नाही, म्हणून शिकणारेच जास्त. त्या वेळी B. A. लाही मान होता. नोकरीची हमी होती. B. A. नतर S. T. C. ची परीक्षा दिल्यास शाळेत नोकरी सहज मिळे. एकूणच उपलब्ध नोकऱ्यांना उपयुक्त असे शिक्षण मिळत असे. त्या वेळेस नोकऱ्या मिळणं फारसं अवघड नव्हतं; पण मोठी माणसं, शिक्षक मात्र व्यवसाय करा, व्यापार करा असा सल्ला देत असत!'

आणि म्हणूनच इतक्या वर्षांनंतरही आपल्या महाविद्यालयीन जीवनाकडे वळून पाहाताना नरुभाऊ म्हणतात की, 'एस्‌ पी. कॉलेज आणि तिथले माझ्या काळातले शिक्षक यांचा impact माझ्या मनावर अजूनही कायम आहे, अस मला वारंवार जाणवतं.' ◻

# सौ. ज्योत्स्ना देवधर

ऋणानुबंध टिकून आहे.

'एस्‌. पी. कॉलेजची विद्यार्थिनी म्हणून माझा एस्‌. पी. कॉलेजशी संबध आला; पण इतर विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि मी यांच्यामध्ये मुख्य फरक होता तो वयाचा माझ्या वर्गातली सर्व मुलं–मुली माझ्याहून वयानं बरीच लहान होती. कारण मी विवाहानंतर सुमारे पधरा–सोळा वर्षांनी, म्हणजे १९५८–५९ साली हिंदी विषय घेऊन बी. ए. ला बसले; पण तरीही मला आवर्जून सांगावंसं वाटत की, ही सर्व मुलं–मुली माझ्याशी अत्यत आदरानं आणि प्रेमानं वागत असत. मला ती 'दीदी'च म्हणायची. वर्गातलं वातावरण अत्यंत निरोगी होतं.

'माझ्या काळात मुली आजच्या मानाने फॅशन खूपच कमी करायच्या. नटणं–मुरडण कमी असायचं. सर्वसाधारणपणे मुली पाच वारी साडी नेसत. हल्ली इतक हॉटेलात वगैरे जाणं तर नव्हतंच; पण सिनेमा—नाटकाची आवडही बेताचीच होती. या सदर्भात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, आज-कालच्या तरुण मुलींशी जेव्हा मी बोलते तेव्हा मला जाणवतं की, त्यांच्या तोंडात इंग्लिश शब्द फार असतात आमच्या काळात हा प्रभाव फार कमी होता, जवळजवळ नव्हताच. हे सर्व जे बदलत चाललय ते फारस स्वागतार्ह वाटत नाही. एक गोष्ट मात्र कबूल केली पाहिजे की, हल्ली महाविद्यालयातल्या मुलींचा बहुश्रुतपणा बराच वाढला आहे तसच त्यांच्या इटरेस्टची क्षेत्र आणि कक्षाही रुदावल्या आहेत. विविध क्षेत्रांत त्या विशेषत्वानं चमकताना आढळतात.

'त्या वेळी आर्टसला मुल आणि मुली यांचं प्रमाण साधारणतः समसमान होतं. मुलं आजच्याइतकी कमी नसायची. तसच, मी मगाशी म्हटलं तस मुला–मुलींचे परस्पराशी सबध खेळीमेळीचे आणि सुसस्कृत असायचे. चेष्टा–मस्करी, मुलांच्या कॉमेंटसही व्हायच्या; पण त्याला मर्यादा होती. याचं एक मजेशीर उदाहरण म्हणजे मी एका वर्षी एस्‌. पी. कॉलेजच्या 'परशुरामीय' या नियतकालिकात 'तुमसा नही देखा।' अशा शीर्षकाचा हिंदीत एक ललित लेख लिहिला होता. त्यामध्ये मी सर्वसामान्य किंवा खालच्या थरातल्या माणसांत मला घडलेल्या माणुसकीच्या दर्शनाविषयी लिहिलं होतं. याच वेळी शम्मी कपूरचा 'तुमसा नही देखा' हा चित्रपट बराच गाजत होता त्यामुळे मी जवळून जायला लागले की, मुलं ताला-सुरात सुरू करीत, 'यूँ तो हमने लाख हँसी देखे है, तुमसा नही देखा...! हे ऐकलं की, मला खरंच खूप तरुण झाल्यासारख वाटायचं.

'त्या वेळी स्नेहसमेलनात नाटकं वगैरेही सादर व्हायची. विद्यार्थीच ही नाटकं बसवीत असत.मी एका नाटकात काम केलं होतं. 'लग्नाची बेडी' या नाटकात मी यामिनीचं काम केलं होत आणि चक्क एक गाणसुद्धा म्हटलं होतं. त्या वेळी वाद–वक्तृत्व स्पर्धाही जोरात असायच्या. अखिल भारतीय पातळीवर यूथ फेस्टिव्हलमध्ये होणाऱ्या स्पर्धांत आमच्या हिंदीच्या ग्रुपनं चर्चेत प्रथम क्रमाक मिळविला. एकदा एका वादस्पर्धेमध्ये एक विद्यार्थी क्रुश्चेव्ह अमेरिकेचे आणि आयसेन हॉवर रशियाचे असं, आपल्या भाषणात वारंवार म्हणत होता; पण तरीही त्याला पहिला नंबर दिला गेला आणि मला तिसरा! मी त्या स्पर्धेत या चुकीच्या निर्णयाबद्दल मला दिलं गेलेलं बक्षीस निषेध म्हणून नाकारलं होतं. 'यूथ फेस्टिव्हल' हा प्रकार आमच्या वेळीही फार जोरात होता. तो भरपूर गाजायचा, कारण त्यामधूनच विद्यार्थ्यांच्या कला–गुणाना चागला वाव मिळत असे.

'डॉ. पु ग. सहस्रबुद्धे, डॉ. प्रभुदास भोपटकर, श्री. व. दि. कुलकर्णी यांच्यासारखे नामवंत प्राध्यापक आम्हाला शिकवीत असत. मुलंही तासाना अत्यंत निष्ठेने आणि आवडीने उपस्थित असत. त्या वेळी शिक्षकाविषयी, शिक्षणाविषयी एक प्रकारचा जिव्हाळा होता, आत्मीयता होती. आयुष्यातले हे महाविद्यालयीन शिक्षणाचे दोन–चार तास आम्हाला फार महत्त्वाचे वाटायचे. त्यांच्याबद्दल एक निराळंच आकर्षण वाटायचं. मी मारवाडात वाढल्यामुळे मला सुरुवातीला मराठी अजिबात येत नसे. नंतर–नंतरही माझ्या मराठी लिहिण्या–बोलण्यात हिंदी शब्द बरेच येत. पण 'वदि' अत्यंत सौम्यपणे अशा चुका सांगायचे. मी अजूनही गंमतीने म्हणते की, ते 'वदि'च होते म्हणून त्याच मराठी माझ्या हिंदीमुळं बिघडल नाही. माझ्या 'सुखाचा सोबती' या नभोनाटयाला आकाशवाणीतर्फे महाविद्यालयान विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या स्पर्धेत अखिल भारतात प्रथम पारितोषिक मिळालं. त्या वेळी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे आम्हाला मराठी शिकवीत असत. त्यानी मला हे बक्षीस मिळाल्याचे दुसरे दिवशी वर्गात जाहीर केलं; पण ते इतक्या धीरगभीर आवाजात की, अभ्यासाचाच काही तरी भाग ते बोलू लागले आहेत, असं सुरुवातीला वाटलं. मुल गप्पच होती. त्यावर ते परत आपल्या सथ आवाजात म्हणाले, 'अशा वेळी टाळचा वाजवायच्या असतात.' मुलानी बाकं वडविली दुसऱ्या क्षणी सर गभीरपणे 'ब्राह्मण आणि त्याची विद्या' हे पुस्तक शिकवू लागले.

पण एक सल माझ्या मनात अजूनही आहे. १९५८ साली मी कॉलेजला बरीच बक्षिस मिळवून दिली; पण कॉलेजन मात्र मला अभिनदनाच्या चार ओळी कधीही पाठविल्या नाहीत. कोणाही विद्यार्थ्याला अशा चार कौतुकाच्या शब्दांचं महत्त्व वाटत असत.

प्राध्यापकाच्या बाबतीत मला आणखी एक प्रसंग आठवतो. आमचे एक प्राध्यापक हिंदी चागल शिकवीत नसत, याबद्दल आम्ही त्या वेळचे प्राचार्य बी. व्ही. भिडे यांच्याकडे तक्रार केली आणि त्यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालून त्या प्राध्यापकाना या जबाबदारीतून मुक्त केल.

'एकंदरीत माझ्या एस्‌. पी. कॉलेजातल्या जीवनाकडे वळून बघताना मला तो काळ फार सुखद वाटतो. त्या काळातल्या अशा अनेक आठवणी आजही माझ्या मनामध्ये खोलवर आहेत. तो काळ आठवताना आजही फार बरं वाटतं.'

'प्रौढ वयात शिकल्याचा मला माझ्या पुढील आयुष्यात फार फायदा झाला. आजही

आमच्या लहानशा हिंदी ग्रुपची मुलं मला थोरल्या बहिणीचा मान देतात. ती माझ्या कुटुंबातली माणसं असावीत असा ऋणानुबंध अजूनही टिकून आहे हे मला आजच्या परिस्थितीत महत्त्वाचे वाटते. ▫

## डॉ. ग. श्री. खैर

### तो काळ फार झपाटणारा होता

'१९१६ साली या कॉलेजची स्थापना झाली आणि आम्ही प्रवेश घेतला. मी, डॉ. ना. भि. परुळेकर, मामा दाते, शिवराम लक्ष्मण करदीकर वगैरे आम्ही मंडळी या पहिल्या बॅचला होतो. त्या वेळी कॉलेजला दोन वर्षांचीच, म्हणजे एफ् वाय् आणि इंटरची परवानगी मिळाली होती. सुरुवातीला फक्त आर्टस्‌चेच वर्ग होते. नंतर दोन वर्षांनी सायन्सचे वर्ग सुरू झाले नूतन मराठी विद्यालयाच्या इमारतीचा जो पुढला भाग आहे, (पुलाच्या अलीकडचा) तिथेच आमचे कॉलेजचे वर्ग भरत असत. नू. म. वि. मध्ये शिकत असताना श्री. विनायकराव आपटे हे शाळेचे मुख्याध्यापक होते. तेच या नव्या कॉलेजचे पहिले प्राचार्य झाले. कॉलेजातही त्यांचा हेडमास्तरांचा दरारा कायम राहिला. कॉलेज म्हणजे 'अर्धशाळा'च होती. त्यामुळे इमारतीच्या मागल्या भागातून पुढल्या भागात आलो एवढाच फरक आम्हाला शाळेतून कॉलेजात आल्यावर जाणवला. कॉलेजात एकूण मुलं २५०–३०० होती. त्यापैकी मुली ५–१०. मुली नऊ वारी पातळ नेसून येत. त्या कॉलेजला येत होत्या, हाच त्यांच्या बाबतीत कौतुकाचा विषय असायचा. मुलं-मुली परस्परांशी क्वचितच बोलत. मला स्वत:ला या चार वर्षांच्या काळात एकाही मुलीशी बोलल्याचं आठवत नाही.

'हे गावातलं कॉलेज होतं, त्यामुळं इथे शिकायला येणारा विद्यार्थी हा साधारण मध्यम-गरीब वर्गातला असायचा. त्यांच्या पोषाखात साधेपणा होता. पांढरा शर्ट, धोतर, डोक्यावर टोपी असा या विद्यार्थ्यांचा पोषाख असे; पण त्या काळापर्यंत विद्यार्थ्यांनी डोक्यावर केस ठेवायला सुरुवात झाली होती; पण व्यसनाधीनता जवळजवळ नव्हतीच. सिगरेट पिणारा सहज 'मार्क' होत असे.

'आम्हाला शिकविणारे बहुतेक प्राध्यापक आमच्याहून फार तर पाच सहा वर्षांनी मोठे, चांगले तरुण होते. आमच्या आणि त्यांच्या वयात फारसे अंतर नसल्यामुळे घनिष्ठ संबंध झटकन निर्माण होत. त्यावेळी आम्हाला प्रा. ना. सी. फडके लॉजिक आणि फिलॉसॉफी शिकवत. प्रो. घारपुरे फिजिक्स शिकवित, प्रो. करमरकर संस्कृत शिकवीत, तर प्रो. लागू इंग्लिश शिकवीत. प्रा. मामा दांडेकर, प्रा. पटवर्धन, प्रा. सबनीस या मंडळींनीही आमच्या मनावर कायमचा ठसा उमटविला. त्या वेळी प्राध्यापकांना कॉलेज-विषयी आस्था आणि विद्यार्थ्यांबद्दल आपलेपणा अधिक असायचा. विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करायची त्यांची प्रवृत्ती होती. मला आठवतं, एकदा प्रा. फडके आजारी पडले. त्यामुळे ते शिकवायला येत नसत; पण त्यांनी आजारी असतानाही नोटस् लिहून काढल्या आणि डॉ. परुळेकरांना अभ्यासासाठी दिल्या. आज-काल विद्यार्थ्यांची एवढी काळजी कोण घेतो? प्रा. लागू हा एकदम कडक शिस्तीचा माणूस. थोडीही अव्यवस्था त्यांना चालत नसे. प्रा. आपटे मधल्या सुट्टीत इमारतीच्या गॅलरीत उभे रहात आणि विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवीत. विद्यार्थ्यांचं कौतुक करणारे अनेक प्राध्यापक आमच्या वेळी होते. एकदा मी विवेकानंदांसारखा पोषाख करून, त्यांचं एक भाषण जेव्हा म्हणून दाखविलं तेव्हा प्रा फडक्यांनी माझं केलेलं कौतुक मला अजून आठवतं. कॉलेज नवीनच असल्यामुळं काही लोक कुतूहलानं तर काही साशंकतेने कॉलेजकडे पाहात. कॉलेजला नाव मिळावं म्हणून विद्यार्थी-प्राध्यापक दोघंही खूप धडपड करीत असत. कॉलेजमधलं वातावरण अगदी कौटुंबिक स्वरुपाचं असायचं.कारण माणसं थोडी आणि age difference ही फार नाही.आमच्या वेळी श्री. बापट नावाचे एक क्लार्क होते. विद्यार्थ्यांशी ते फार आपलेपणाने वागत. हजेरी लावण्याच्या कामी आम्हाला त्यांचा फार उपयोग व्हायचा.

'कॉलेजात वक्तृत्व, मासिक, स्नेहसंमेलन यासारखे विविध उपक्रम चालायचे. 'तोतयाचे बंड' आणि 'भावबंधन' ही दोन नाटकं मी कॉलेजात असताना विद्यार्थ्यांनी केल्याचं आठवतं. त्या वेळी 'स्त्री–पार्ट'ही विद्यार्थीच करीत. एकदा सीन ऐन रंगात आलेला असताना एका पात्राच्या चिकटविलेल्या मिश्या गळून पडल्या आणि सबंध सभागृह हास्यकल्लोळात बुडून गेलं. त्या वेळी नाटक हाच करमणुकीचा मुख्य प्रकार होता. विद्यार्थ्यांना संगीत नाटकाची फार आवड असायची 'मानापमान'ची पदं विद्यार्थ्यांना अगदी तोंडपाठ असायची. आज विद्यार्थी व्याख्यानांना सहसा जात नाहीत. आमच्या काळात व्याख्यानं सहसा चुकवीत नसत. वसंत व्याख्यानमालेला विद्यार्थ्यांची हजेरी प्रामुख्यानं असे. लोकमान्य टिळक, शिवराम महादेव परांजपे यांची भाषणं अजूनही कानात घुमत आहेत. आमचं extracaricular शिक्षण यांनीच केलं. कॉलेजला मैदान नसल्यामुळे खेळांचे प्रमाण बेताचेच. त्या वेळी वर्तमानपत्रं फारशी नसायची. 'केसरी' हा साप्ताहिकाच्या स्वरूपात प्रसिद्ध व्हायचा तर 'ज्ञानप्रकाश' हे दैनिक होतं. 'केसरी' जहाल पक्षाचा समजला जायचा, तर 'ज्ञानप्रकाश' नेमस्तांचं मुखपत्र होतं.

'आमच्या पिढीवर लोकमान्यांचा प्रभाव अधिक होता. त्यांचा स्वदेशीचा बाणा आम्हीही अंगिकारला होता टिळकांविषयी फार अभिमान वाटायचा. आमच्या कॉलेजला 'टिळकपंथी कॉलेज' असं म्हटलं जायच, तर फर्गसन कॉलेज 'गोखले–पंथी' म्हणून प्रसिद्ध होतं. त्या वेळी 'होम रूल लीग'ची चळवळ जोरात होती. जास्तीत जास्त लोकांना या चळवळीचे सभासद करून घेण्याचं काम आम्ही विद्यार्थी करत असू. लोकमान्यांचं निधन झालं त्याच सुमारास आमच्या बॅचचा पदवीदानसमारंभ होता. कॉलेजची पहिलीच बॅच म्हणून कौतुक फार. त्या वेळी या समारंभासाठी मुंबईला जावं लागायचं. आम्ही मुंबईला गेलो; पण पदवीदानसमारंभाला गेलो नाही. मुंबईला जाऊन तिथल्या मारवाडी विद्यालयात आम्ही लोकमान्यांच्या निधनाबद्दल शोकसभा घेतली. आमचं पुस्तकी शिक्षण कॉलेजात चालायच; पण राष्ट्रीय विचाराचं शिक्षण मात्र या पुढाऱ्यांनी आम्हाला दिलं. They were schools in themselves.

'स्वातंत्र्यचळवळीचा एक भाग म्हणून कॉलेज सोडण्याचा प्रश्न आमच्या वेळी नव्हता; पण आमच्या पुढल्या बॅचला सुरू झाला. पुढे गांधीजींनी सुरू केलेल्या चळवळीत आमच्या प्रो. फडके, प्रो. घारपुरे वगैरेंनी भाग घेतला आणि विद्यार्थ्यांनाही शाळा–कॉलेजं सोडायला प्रोत्साहन दिलं; पण त्या काळी कॉलेज सोडलं तरी शिक्षण सोडू नये, हा विचार प्रभावी होता. त्या दृष्टीनं तात्यासाहेब केळकर, जनार्दन सखाराम करदीकर, चिंतामण विनायक वैद्य यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण संस्था सुरू केली. १९२१ ते १९४८ ही सत्तावीस वर्षं मी अनाथ विद्यार्थी गृह (आताचे महाराष्ट्र विद्यालय) राष्ट्रीय शिक्षणाची शाळा म्हणून स्वतंत्रपणें चालविलं.

'एकंदरीत तो काळ, फार निराळाच झपाटून टाकणारा होता. कुठल्या तरी ध्येयाने वेडी होणारी आणि इतरांना वेडी करणारी अनेक माणसं आम्हाला आमच्या एस्. पी. कॉलेजातल्या चार वर्षांच्या काळात भेटली आणि त्यांनीच आमचं जीवन घडविलं' ▫

प्रकाशनाच्या वाटेवर

## पश्चिमेचे पुत्र

रवींद्र पिंगे

ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंताची
सुंदर व्यक्तिचित्रे

प्रकाशित झाले

## टच

कालच्या
बायसिकल थीव्हजपासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी-विदेशी
चित्रपटांची
ओळख

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
दहा रुपये